# द्वितीय वर्ष कला

## सत्र - III (CBCS)

## तत्त्वज्ञान पेपर - II

# सामाजिक तत्त्वज्ञान

## पेपर कोड – UAPHI 301

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र द. कुलकर्णी,**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर, संचालक,**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक :** **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यासक्रम समन्वयक व संपादक :** **डॉ. नारायण शंकर गडदे**
सहाय्यक प्राध्यापक,
तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ.

**लेखक :** **डॉ. रामेश्वर कनसे**
सहाय्यक प्राध्यापक,
जे. एस. एस. पी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गोवेली, कल्याण.

**: प्रा. डॉ. रिना अविनाश पितळे (पुराडकर)**
सहयोगी प्राध्यापक,
आर. जे. कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज, घाटकोपर (प.).

**जुलै २०२२, प्रथम मुद्रण**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
| --- | --- | --- |
| १. | कुटूंब आणि लिंगभाव समस्या | १ |
| २. | सामाजिक जाणीव | २३ |
| ३. | न्यायीक युद्ध आणि शांततावाद | ३८ |
| ४. | विविधतेतील सौहार्दता | ४७ |


*****

# SYBA Philosophy (2018-19)
# Course Title: Social Political Philosophy
## Paper No. 2
## Semester 3: Social Philosophy (UAPHI-301)

**Unit I Family and Gender Issues** **(11 Lectures)**

Perspectives on family & marriage:

(i) Plato's perspective on marriage and family

(ii) Bertrand Russell's perspective on marriage and family.

Contemporary trends in family and marriage:

(i) single parent families,

(ii) live – in relationships,

(iii) same-sex marriages.

Gender as a construct:

(i) Feminism (Simon de Beauvoir) and

(ii) Masculinity.

**Unit II Social Awareness** **(11 Lectures)**

Economic discrimination:

(i) Gandhi's notion of trusteeship and

(ii) critique of capitalism;

Class Discrimination:

(i) Marx's theory of alienation (of proletariat) and

(ii) class conflict-bourgeois and proletariat;

Racial Discrimination:

(i) Frantz Fanon's psycho-analysis of racism and

(ii) dialectics of recognition(Hegel);

Caste Discrimination:

(i) Ambedkar's account of the problem of caste discrimination and

(ii) Ambedkar's response to it

**Unit III Just War and Pacifism** **(11 Lectures)**

Just War Theory:

(i) Justice of War (jus ad bellum)

(ii) Justice in war (jus in bello),

(iii) Justice after war (jus post bellum); types of pacifism.

**Unit IV Engaging Diversity** **(12 Lectures)**

Philosophical perspective on multiculturalism: Bhikhu Parekh; critique of multiculturalism - Brian Barry; rights of refugees and rights of immigrants – Michael Dummett; Orientalism- Post-colonial critique of the European representation of the Orient-Edward Said

**Semester End Exam Evaluation** **[100 marks]**

1. There shall be five compulsory questions
2. First four questions shall correspond to the four units
3. Question 5 shall be Short Notes (one from each unit and attempt any 2 of 4)
4. All questions shall contain internal choice
5. Each question shall carry a maximum of 20 marks

**References and reading list recommended for the course:**

**Unit I**


- Bertrand Russell Marriage and Morals Routledge Publications,1985
- Deborah Satz "Feminist Perspectives on Reproduction and the Family" Stanford
- Encyclopedia of Philosophy 2013 (on line https://plato.stanford.edu/entries/feminismfamily/)
- Barrie Thorne "Feminist Rethinking of the Family: An Overview" Rethinking the Family:
- Some Feminist Questions ed. Barrie Thorne and Marilyn Yalom Longman: New York and
- London, 1982
- Simone de Beauvoir "Introduction" The Second Sex (a new translation by Constance
- Borde and Sheila Malovany-Chevallier) Vintage: London, 2009

- Jack Sawyer “On Male Liberation” in Feminism and Masculinities ed. Peter Murphy OUP,
- Oxford 2004
- Todd Reeser, Masculinities in Theory: An Introduction chapter 1
- John Beynon, Masculinities and Culture chapter 1

**Unit II**

- M.K. Gandhi. Trusteeship Navjeevan Publication, 1990
- K. Kripalani All men are brothers, Chapter- Poverty in the midst of plenty- Navjeevan
- Publication 1960
- Franz Fanon “The Fact of Blackness” Black Skin White Masks-Grove Press 1967
- John Elster, An Introduction to Karl Marx chapter 3 and 7
- Karl Marx and Friedrich Engels A Manifesto of the Communist Party 1848
- https://www.marxists.org/archive/marx/works/download/pdf/Manifesto.pdf
- B.R. Ambedkar “Annihilation of Caste” in Dr. Babasaheb Ambedkar: Writings and
- Speeches, Vol. 1. Bombay: Education Department, Government of Maharashtra, 1979
- B.R. Ambedkar “On the way to Goregaon” in The Essential Writings of B.R. Ambedkar ed.
- Valerian Rodrigues OUP, Oxford: 2002
- “Who were the Shudras?” in The Essential Writings of B.R. Ambedkar ed. Valerian
- Rodrigues OUP, Oxford: 2002

**Unit III**

- Nicholas Fotion War and Ethics: a New Just War Theory (Continuum, 2007)
- Colin Bird, Introduction to Political Philosophy chapter 10
- Catriona McKinnon, Issues in Political Theory, chapter 3
- Stanford Encyclopedia of Philosophy (on line source) readings on war and pacificism.

**Unit IV**

- Charles Taylor "The Politics of Recognition" in Colin Farrelly (ed) Contemporary Political
- Theory: A Reader (Sage Publishers, 2004)
- Bhiku Parekh. "Equality of Difference" in Colin Farrelly (ed) Contemporary Political Theory:
- A Reader (Sage Publishers, 2004)
- Brian Barry, "Liberalism and Multiculturalism" in Ethics
- George Crowder, Theories of Multiculturalism: An Introduction, chapter 3
- Bill Ashcroft and Pal Ahluwalia, Edward said (Routledge Critical Thinkers Series) chapter 3.
- Moustafa Bayoumi and Andrew Rubin (ed.) The Edward Said Reader chapter 4.
- Michael Dummett Immigration and Refugees Routledge London and New York, 2001(chapters 1-5)

*****

# १

## कुटूंब आणि लिंगभाव समस्या

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विवाहसंस्था

१.३ प्लेटोचे कुटूंबविषयक विचार

- १.३.१ प्लेटोची कुटूंब व्यवस्था
- १.३.२ महिलांचा साम्यवाद
- १.३.३ प्लेटोच्या साम्यवादावरील आरोप

१.४ रसेलचे कुटूंबविषयक विचार

- १.४.१ कुटूंब आणि विवाहविषयक विचार

१.५ एकल पालक कुटुंब

- १.५.१ एकल पालक कुटूंबत्वाची कारणे
- १.५.२ एकल पालक कुटूंबाच्या समस्या

१.६ नातेसंबंधाने एकत्र राहणे

- १.६.१ नातेसंबंधात एकत्र राहण्याचे धोके

१.७ समलिंगी विवाह

- १.७.१ वैज्ञानिक दृष्टिकोन
- १.७.२ ऐतिहासिक संदर्भ
- १.७.३ मानसशास्त्रीय दृष्टिकोन
- १.७.४ सामाजिक दृष्टीकोन
- १.७.५ धार्मिक दृष्टिकोन
- १.७.६ चिकित्सक दृष्टिकोन
- १.७.७ आधुनिक मतप्रवाह
- १.७.८ कायद्याचे पाठबळ

१.८ स्त्रीवाद

- १.८.१ स्त्रीवादाचा विकासक्रम
- १.८.२ पुरूषप्रधानता
- १.८.३ भारतातिल स्त्रीविचार

१.९ सारांश

१.१० विद्यापीठीय प्रश्न

१.११ संदर्भ

## १.० उद्दिष्ट्ये

१. विवाह व कुटूंब म्हणजे काय समजून घेता येईल.

२. प्लेटोचा कुटूंबविषयक विचार समजून घेता येईल.

३. रसेलचा कुटूंबविषयक विचार अभ्यासता येईल.

४. विवाहस मिळालेली आधुनिक आव्हाने आणि त्यातील समस्या समजून घेता येईल.

५. स्त्रीवादी विचारप्रवाह व चळवळी समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना

तत्त्वज्ञान हा अत्यंत व्यापक असा विषय आहे. मानवी जीवनच्या सर्वच अंगांना व्यापणारा असा हा विषय आहे. त्यात केवळ अध्यात्म चर्चा नसून समाज जीवन हाही त्याचा एक भाग आहे. सामाजिक तत्त्वज्ञान ही तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. यामध्ये मानवी समाजाचा तात्त्विक अभ्यास केला जातो. समाज म्हणजे काय इथपासून तो कसा असावा या गोष्टींचा विचार त्यामध्ये येतो. केवळ व्यक्ति समुहालाच समाज असे म्हटले जाते. समाज हा नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. प्राण्यांमध्ये बुद्धीमान समजल्या जाणाऱ्या मानवाने तो गरजेतून निर्माण केला आहे.

कुटुंब वा परिवार ही समाजाची मूलभूत व महत्त्वाची संस्था आहे. परिवार हा सुद्धा मानव निर्मितच आहे. पतिपत्नि, त्यांचे आईवडिल, मुलं मिळूनच कुटूंब बनते. पति-पत्निस आई-वडिल व मुलांचा सांभाळ, जतन व संवर्धन करण्याचे कार्य करावे लागते. अर्थात ते त्यांचे कर्तव्य असते. कुटूंब केवळ स्त्री-पुरूषांच्या एकत्र येण्यातून बनत नाही तर त्यामध्ये नात्यांची घट्ट अशी वीण असते. प्रेम, वात्सल्य, माधुर्य, आपुलकी, काळजी, कर्तव्य व समर्पण या गोष्टी कुटुंबात महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

## १.२ विवाह संस्था

कुटूंब हे विवाहाच्या माध्यमातून अस्तित्वात येते. स्त्री व पुरूष यांच्या समाजमान्य, धर्ममान्य संबंधास विवाह असे म्हणतात. केवळ लैंगिक इच्छेच्या पूर्तीसाठी नसून त्यातून एकमेकांच्या भावनिक गरजा भागवल्या जातात. स्थिर कुटूंब विवाहाने शक्य होते. विवाहातून स्त्री-पुरूषांच्या शारिरिक संबंधास कायदेशीर मान्यता मिळते. पारंपारिक दृष्टीने विवाह हा एक संस्कार आहे. इस्लाममध्ये मात्र विवाहास करार असे म्हटले असून हा करार त्रिवार तलाकाने संपूष्टात येतो. विवाहातूनच कुटुंब जीवनाची सुरूवात होते. विवाह हा कायदेशीर संबंध असून त्यातून अपत्य व पालकांप्रती कर्तव्ये पार पाडली जातात. विवाहाच्या माध्यमातून कुटंब निर्माण होते तर कुटूंबातूनच समाजाचा उदय होतो. म्हणून कुटुंब ही समाजाची महत्त्वपूर्ण संस्था आहे. विवाहातून वासनापूर्ती तर होतेच परंतू वासनांना संयमित करण्याचे शिक्षण ही त्यातून मिळते. हे केवळ दोन शरीरांचे मिलन नसून दोन जीवांचे, आत्म्यांचे मिलन आहे.

विवाहातून वंशसातत्य, संस्कार सर्जन, मूल्यशिक्षण, समाजसातत्य, अर्थार्जन व त्याचे विनिमय, अपत्यसंगोपन इत्यादी गोष्टी पूर्ण होतात.

कालानुसार समाजामध्ये परिवर्तन घडत असतात. कुटुंब व विवाह यास अपवाद नाही. एकत्र कुटुंबाची जागा आज विभक्त कुटुंबाने घेतली आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. समर्पणाची जागा स्वार्थाने घेतली आहे, नात्यांमधली आपुलकी, प्रेम या ऐवजी व्यवहार प्रधानता आली आहे. विवाह पद्धतीत पण बदल होत आहे. पारंपारिक विवाहासमोर आधुनिक आव्हाने उभी ठाकली आहेत. नातेसंबंधाने एकत्र राहणे, प्रेम विवाह, इत्यादी गोष्टींचे प्रमाण वाढत आहे. विरुद्धलिंगी विवाहाऐवजी समलिंगी विवाहास काही प्रमाणात सुरूवात झाली आहे. विवाहास समाज मान्यता वा धर्ममान्यतेऐवजी कायदेशीर मान्यता असली म्हणजे झाले, असा विचार समोर येत आहे.

## १.३ प्लेटोचे कुटूंबविषयक विचार

ग्रीकमधील अथेत्स नगरीतील स़ॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल ही तत्त्वज्ञत्रयी जगप्रसिद्ध आहे. सॉक्रेटिस हा ज्ञानी, चारित्रसंपन्न, संवादपटू तसेच अथेनियनांचा व आजतागायतच्या तत्त्वजगतातील लाडका तत्त्वज्ञ. त्याच्या व्यक्तित्वाचा प्रभाव प्लेटो या त्याच्या शिष्यावर पडणार नाही तरच नवल ! इ. स. पूर्व ४९७ ला जन्मलेला प्लेटो हा राजकुमार बलदंड, सुंदर निधड्या छातीचा, धिप्पाड असा होता. त्याचे मुळ नाव ॲरिस्टॉटल सॉक्रेटिस पण त्याच्या पिळदार शरीरामुळे त्याला 'प्लेटो' असे म्हणू लागले. उपजत असणारी बुद्धिमत्ता आणि ऐन उमेदीच्या वयात सॉक्रेटिस सारख्या महात्म्याचा सहवास यामुळे त्याची प्रतिभा आणि प्रतिमा उजळून निघाली. संगीत, काव्य, चित्रकला यांच्या अध्ययनाने अभ्यासाची सुरूवात करून गणित, तत्त्वज्ञान, विज्ञान, शिक्षणशास्त्र, राजकारण इत्यादि - विषयांचे अध्ययन आणि संखोल चिंतन त्याने केले.

हे चिंतन त्याने लिहिलेल्या संवाद स्वरूपातील ग्रंथात पहावयास मिळते. फिडो, मेनो, क्रिटो, युथिडेस, क्रेटिलस, रिपालिक हे त्याचे प्रसिद्ध संवादग्रंथ. सॉक्रेटिस सारख्या साधूपुरूषाची झालेली देहदंडाची शिक्षा त्यांना असह्य झाली. त्यातूनच मनुष्याच्या अंतरंगाची चिकित्सा सुरू झाली. प्रत्येक मानवी आत्म्यात, विवेक, सतत व वासना हे तिन घटक असतात. विवेक हा मानवीच्या अंतरात्म्यातील दार्शनिक घटक असून तत्त्वजिज्ञासा व त्याचे सातत्य चिंतन यातून तो व्यक्त होतो. साहस हा दूसरा घटक याला spirited element असे म्हणतात. यात महत्त्वाकांक्षा, जिद्द, क्रोध, आक्रमकता यांचा अंतर्भाव होतो. तर मान, इच्छा, आसक्ती वासनात्मक घटकात passionate element होतो. प्रत्येक व्यक्तिमध्ये हे तिन्ही घटक असले तरी यातील एखादा घटक प्रत्येकात प्रभावी असतो. या तिन घटकांच्या प्राधान्यानूसार प्लेटो व्यक्तीचे अर्थात समाजाचे तिन वर्गात विभाजन करतो.

१) तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग

२) सैनिकांचा वर्ग

३) कामगारांचा वा श्रमिकांचा वर्ग

राजघराण्यात जन्मलेला असूनही स्वत: मात्र तो राजकारणापासून अलिप्त राहिला. त्याचे कारणही तसेच आहे. नैतिकमुल्यांना सर्वोच्च स्थान देणारा प्लेटो राजकारणातील स्वार्थ, संकुचितता व भ्रष्टाचार पाहुन विटला होता. मात्र त्याचे राजकीय चिंतन मात्र थांबले नाही. राजकारणातील या समस्यांचे मूळ शोधून त्यावरील उपाय योजनाही त्याने सुचविली ती आपल्या लॉज व रिपब्लिक या ग्रंथात समाविष्ट आहे.

प्लेटोच्या मते समाजाला वरील तिन वर्गात विभागले तर आदर्श राज्य निर्माण होईल. हे तिन वर्ग जन्मांवर नव्हे तर गुणांवर आधारित असावेत.

**तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग:**

प्लेटोंच्या मते ज्यांच्यामध्ये विवेक हा घटक प्रधान आहे, असा वर्ग तत्त्वज्ञांचा वर्ग होय. अशा वर्गातील व्यक्तीच राज्यकर्ता असावयास हवेत. या संदर्भात प्लेटोची 'तत्त्वज्ञ राजा' (philosopher King) ही संकल्पना प्रसिद्ध आहे. त्याच्या मते, तत्त्वज्ञ राजा हा असा शासक असतो ज्याला शहाणपणाविषयी आस्था असते, साधे जीवन जगणे त्याला आवडत असते. तो म्हणतो, Philosopher must become king… or those to whom called kings must genuinely and adequeately philosophise भारतामध्ये या संदर्भात 'राजर्षी' ही संकल्पना होती. तर शिवाजी महाराजांना जाणता राजा असे म्हणत असत.

**सैनिक वर्ग :** समाजातिल ज्या व्यक्तिमध्ये साहस, धैर्य, महत्त्वाकांक्षा अधिक आहे अशा व्याक्तिंचा सैनिक वर्ग निर्माण करावयास हवा. अशी माणसे ही संख्येने कमीच असतात.

**श्रमिक वर्ग :** ज्याच्यामध्ये वासनाप्रधानता आहे. भौतिक गरजा भागवण्यातच ज्यांचे मन रमते अशांचा हा वर्ग असावा. प्लेटोच्या मते राज्यकर्ते व सैनिक यांच्या तुलनेत श्रमिक वर्ग मोठा असेल. कारण सामाजातिल बहुतांश वर्ग हा वासनाप्रधान असतो. यामध्ये कष्टकरी, कामगार व कारागिर यांचा समावेश होतो.

विवेकशील व्यक्ति फारच थोड्या असतात. म्हणून तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग सर्वात लहान असतो. त्याच्या ठिकाणी समाजाला मार्गदर्शन करण्याची क्षमता असते. प्लेटो यांस पालकवर्ग असे म्हणतो.

ज्या समाजाचे विभाजन अशा पद्धतीने केले जाते त्या समाजात ‘न्याय’ या सद्गुणाची प्रस्थापना होते. पण अशा पद्धतीची समाजरचना शक्य आहे का? विशेषत: न्यायी, सद्गुणी, कर्तव्य दक्ष राजा वास्तवात येऊ शकतो का?

राज्यकर्त्यांच्या भ्रष्ट, संकुचित, स्वार्थी वृत्तीचे मूळ समाजव्यवस्थेत विशेषत: कुटूंब या मूलभूत सामाजिक संस्थेत आहे, असे प्लेटो म्हणतो. म्हणून आदर्श राज्य बनवायचे असेल तर कुटूंबव्यवस्था बदलली पाहिजे तो म्हणतो. पण यासाठी जे विचार त्याने मांडले ते अव्यवहार्य असल्याचे अनेकांचे मत आहे.

### १.३.१ प्लेटोप्रणित कुटूंबव्यवस्था :

प्लेटोचे कुटुंबविषयक विचार हे विषमतेवर आधारित आहे. पण ही विषमता समाजासाठी व आदर्श राज्य निर्मितीसाठी उपकारक आहे असे त्याचे मते आहे. यामध्ये तो फक्त श्रमिक वर्गाला कौटुंबिक बंधन व विवाहाची आवश्यकता असते. वासनाप्रधान असल्याने सामान्यजनांना विवाहाद्वारे कुटुंबजीवनाची आवश्यकता असते. हा वर्ग फार मोठा असतो. त्यांच्यामध्ये इच्छा, आकांक्षा, अपेक्षा आदि अधिक प्रमाणात असून बुद्धी, साहस, सेवा, समर्पण हे सद्गुण अभावानेच सापडतात. कुटूंब ही त्यांची गरज आहे. या बहुसंख्य समाजात न्याय प्रस्थापित होणे गरजेचे असल्याचे तो म्हणतो. ते कार्य तत्त्वज्ञ राजकर्त्यांकडे सोपवतो.

राज्यकर्ते व सैनिक यांना मात्र विवाह व कुटुंब बंधनात तो अडकवत नाही. सामान्यांप्रमाणे त्यांची ही कुटूंब असतील, तर ते तटस्थपणे, न्यायाने, निस्वार्थपणे, समर्पित होऊन राज्यकारभार चालवू शकणार नाहीत. विवेकाचा भाग अधिक असल्याने त्यांच्यासाठी हे अशक्यमात्र नाही. राजकर्ते व सैनिक यांचे कुटुंबच मुळात त्यांना स्वार्थी व संकुचित बनवून भ्रष्ट बनवतात. म्हणून त्यांना कुटूंबच नाकारले की प्रश्न मिटतो. असे केल्यास तत्त्वज्ञ राज्यकर्ते आदर्श राज्याची स्थापना करू शकतात.

प्लेटो या दोन वर्गांना कुटुंब आणि विवाहाचे बंधन नाही हे सांगत असले तर शिथिल स्वैराचाराचे समर्थन करत नाही. स्त्री-पुरूषांचे परस्परांबद्दल नैसर्गिक आकर्षण तो नाकारत नाही. त्यासाठी तो वेगळी व्यवस्था करू पाहतो.

### १.३.२ महिलांचा साम्यवाद:

या दोन वर्गासाठी प्लेटोने महिलांच्या साम्यवादाची संकल्पना मांडली. या दोन्ही वर्गांची व्यक्तीगत कुटूंबे त्याने नाकारली आहेत. राज्यकर्त्यांना व सैनिकांना विवाह करण्यास व खाजगी मालमत्ता बाळगण्यास तो नकार देतो. असे केल्यास त्यांचे मन कुटुंब व मालमत्तेत गुंतून राज्याच्या कल्याणाकडे दुर्लक्ष होईल असे तो म्हणतो.

**महिला साम्यवादाची वैशिष्ट्ये:**

१) या साम्यवादात दीर्घकालीन विवाह नाकारला आहे.

२) वैयक्तिक कुटूंबाऐवजी राज्यकर्त्या सर्वच स्त्रीपुरूषांनी एकत्र रहावे अशी तरतूद केली आहे.

३) सुयोग्य जोडीदार निवडून फक्त वर्षभरासाठी स्नेहपूर्ण शारिरिक, भावनिक संबंध स्विकारला आहे.

४) अपत्यप्राप्तीनंतर मात्र जोडप्याने विभक्त होऊ मुलांना शासनाच्या ताब्यात द्यावे, म्हणजे या अपत्यास आई वडिलास आपली मुले कोणती, हे समजणार नाही.

५) सर्व मुले भातृभावाने एकत्र राहतील अशी व्यवस्था व शिकवण द्यावी.

६) छोटे कुटुंब नाकारले असले तरी या दोन वर्गांचे एकच पण मोठे असे कुटूंब बनेल, अशी योजना आहे.

७) या मध्ये स्वार्थत्याग, समपर्ण, देशभक्ती याची शिकवण मिळेल. व्यापक दृष्टिकोन बनेल.

८) विवाहाचे वय सुद्धा यामध्ये विचारात घेतले असून पुरूषांसाठी किमान २५ वर्षे तर कमाल ५५ वर्षे, तर स्त्रियांसाठी किमान २० तर कमाल चाळीस ही वयोमर्यादा घातली आहे.

प्लेटो स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कर्ता होता. शारिरिक क्षमता वगळता बुद्धि व सद्गुण या बाबतीत स्त्री-पुरूषात फारसा फरक नाही. संधी अभावी स्त्रिया मागे राहतात. स्त्रियांना शिक्षण, राजकारण, अर्थार्जन अशा विविध क्षेत्रात संधी दिली पाहिजे. एवढेच नव्हे तर स्त्रीया या सुद्धा तत्त्वज्ञ व राज्यकर्त्या होऊ शकतात असे प्लेटो म्हणतो. म्हणून उत्तम राज्यकर्ती संताने व्हावीत यासाठी उत्तम स्त्री-पुरूषांच्या मिलनाची संकल्पना तो मांडतो. चूल आणि मूल यात अडकून पडल्याने स्त्रीयांच्या सद्गुणांचा व कर्तृत्वाचा उपयोग राज्याला होत नाही, असे मत प्लेटो मांडतो.

### १.३.३ प्लेटोच्या साम्यवादावरील आरोप :

मुळातच जगावेगळा विचार माडल्यामुळे प्रस्थापित व तत्त्कालिन लोक प्लेटोला विरोध करतात, यात नवल नाही.

१) अशा पद्धतीची समाजरचना हे केवळ स्वप्नरंजन असून त्यांचे व्यवहारिकरण अशक्य असल्याचे काही विचारावंतांनी म्हटले आहे.

२) व्यक्तिच्या लैगिक स्वातंत्र्यावर निर्बंध घालणे ही गोष्ट राज्यासाठी अनैतिक आहे, असे काहींचे मत आहे.

३) प्लेटोंचा साम्यवाद हा फक्त उच्चभ्रूंसाठी असल्याची टिकाही होते.

खुद्द प्लेटोचा शिष्य म्हणवला जाणार ग्रीक, तत्त्वचिंतक ॲरिस्टॉटल प्लेटोचा याबाबतीत कडाडून विरोध करतो. खर तर गुरूवादाच्या दोषापासून वाचण्यासाठी व गुरू शिष्याच्या निकोप संबंधासाठी ॲरिस्टॉटल हा एक आदर्श आहे. या बाबतीत तो म्हणतो. - ‘Plato is my friend, Philosopher and guide but truth is my divinity’ प्लेटो माझा मित्र, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक असला तरी सत्य माझ्यासाठी सर्वोच्च आहे. प्लेटोच्या महिलाविषयक साम्यवादाला तो 'जाहिर आणि अधिकृतपणे कुंटुंबखाना चालवण्यास प्रोत्साहन देणारा अनैतिक विचार' असे म्हणतो. त्याच्या मते पति पत्नींचे संबंध हा प्राण्यांसारखा असू शकत नाही. त्यामध्ये भावनेला महत्त्व असल्याने आजन्म टिकणारा विवाह महत्त्वाचा ठरतो. स्त्री-पुरूषांचे एकत्र येणे हे फक्त अपत्यप्राप्तीसाठी नसून त्यामध्ये नात्याची घट्ट वीण असते. ॲरिस्टॉटलच्या मते प्लेटोप्रणित महिलांचा साम्यवाद समाजव्यवस्था बिघडवणारा आहे.

ॲरिस्टॉटल म्हणतो, या प्रकारच्या व्यवस्थेत मुलांवर वैयक्तिक लक्ष देणारे कोणी नसते जे काम सर्वांचे ते कोणाचेच नाही. ही मानसिकता बळावते, परिणामी मुलांची आबाळ होते. तसेच अशा प्रकारच्या संबंधामुळे जवळच्या नातेवाईकांत अनैतिकता वाढण्याची भीती

राहते. उलट अशा साम्यवादामुळे तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग दु:खी राहील आणि त्याकडून समाजकल्याणाची अपेक्षा करता येणार नाही.

प्लेटोच्या या साम्यवादातील काही ठळक दोषही सहज दृष्टीस येतात. आई -वडिल व मुले या दोघांना एकमेकांविषयी आपुलकी, ममता, वात्सल्य असते. त्यातून त्यांची भावनिक गरज भागवल्या जाते. कुटुंबच नाकारल्याने हे शक्य होणार नाही. कुटूंब ही भावनिक व नैतिक विकासाची, संस्कार सर्जनाची प्रथम शाळा आहे. ती हिरावून घेणे अयोग्य आहे. राज्यव्यवस्थेत कुटुंबामुळे येणारे दोष नाहीसे व्हावेत व आदर्श राज्य निर्माण व्हावे हा प्लेटोचा हेतू जरी चांगला असला तरी त्यासाठी त्याने सुचवलेला उपाय हा जाचक व अव्यवहार्य असा आहे. हे कुणाही विचारी मानवाच्या सहज लक्षात येते.

## १.४ रसेलचे कुटुंबविषयक विचार

पाश्चिमात्य तत्त्वज्ञ रसेल २० व्या शतकातील महान विभूति होय. तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा व तत्त्वमिमांसा यावर मौलिक विचार मांडणारा तत्त्वतेत्ता असला तरी तो प्रसिद्ध होण्याचे कारण आहे नैतिक, सामाजिक, अर्थिक व राजकीय समस्यांवर त्याचे लिखाण. त्याचा जन्म स्वातंत्र्यप्रिय उदारमतवादी उमराव घराण्यात झाला (इ.स. पूर्व १८७२). रसेल विश्लेषक तत्त्वज्ञानाचा जनक म्हणून प्रसिद्ध आहे. तो शांततावादी, उदारमतवादी, व समाजवादी म्हणूनही ओळखला जातो. ‘मॅरेज आणि मॉरल्स’ या आपल्या ग्रंथात त्याने विवाहासंबंधी विचार मांडले. हा तत्त्वज्ञ नोबेल पुरस्कार विजेता असून अभिव्यक्ती स्वातंत्र्य व मानवतावादी विचार त्यामुळे तो अधिकच प्रसिद्ध झाला. रसेल हा केवळ तर्किक काथ्याकूट करणारा विचारवंत नव्हता तर **कृतीशील तत्त्वज्ञ** होता. व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता आणि आंतरराष्ट्रीय शांतता यासाठीच्या आंदोलनांत त्याने सक्रिय सहभाग नोंदवला. धार्मिक व विरक्त वृत्तीच्या, खंबीर वृत्तीच्या आईच्या शिकवणीमुळे त्याचे नैतिक जीवन पूष्ट झाले होते. मुळातच उदारमतवादी भूमिका स्विकारल्यामुळे, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास व त्याची सुखदु:खे यांना समाज, राष्ट्र, धर्म, जात यापेक्षा अधिकचे महत्त्व देतो.

### १.४.१ कुटूंब आणि विवाहविषयक विचार:

व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता असल्याने त्याच्या कुंटूंबविषयक विचारांवरसुद्धा याचा परिणाम दिसून येतो. व्यक्तिला साधन नव्हे तर साध्य मानणारा रसेल प्रस्थापित नैतिक संकल्पनांपेक्षा वेगळा विचार मांडतो. 'मॅरेज अण्ड मॉरल्स' हा त्यांच्या ग्रंथ अशाच स्वरूपाचा आहे. कुटूंब जीवनाला आदर्श मानूनही लैंगिक स्वातंत्र्याची भाषा करणारा रसेल सामाजिक उन्नतीसाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा बळी देण्यास नकार देतो. लैंगिक गोष्टी, कृती या खुल्या मनाने व्हावयास हव्यात असे तो मानतो. म्हणूनच दांभिक सज्जनता त्याला आवडत नसे. लैंगिक बाबतीत मानवी भावनांचे वास्तव मान्य करत माणसाने प्रामाणिक जीवन जगावे असे त्याला वाटे, 'छूपा रूस्तम' होणे त्यास कदापि मान्य नव्हते. विवाहबाह्य शारिरिक संबंधात गैर असे काही त्यास वाटत नव्हते. हे स्वातंत्र्य पति व पत्नी दोघांसही असावयास हवे असे त्याचे मत होते. यामध्ये कुठल्याही प्रकारच्या मालकी भावास तो नकार देतो. पण पति-पत्नितील निखळ प्रेमाचा तो पुरस्कर्ता होता. व्यक्तिस्वातंत्र्याचा उपभोग घेतांना कुटूंबाकडे

दूर्लक्ष होऊ नये, कुटूंब विवाहावर अवलंबून असून अपत्यसंगोपन हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे म्हणून पति-पत्निनी अपत्यांची जबाबदारीपासून पळ काढू नये असा विचार तो मांडतो.

चिकित्सक वृत्तीचा असल्याने तत्कालिन शिक्षण व समाजाची चिकित्सा तो करतो. म्हणूनच पारंपारिक शिक्षणावर आरोप करतांना हे शिक्षण समीक्षाविरोधी असल्याचे तो म्हणतो. स्त्री हा समाजाचा अविभाज्य भाग आहे. तिच्याकडे व्यक्ति म्हणून पाहिले पाहिजे. पण त्याच्या मते व्हिक्टोरियनकालिन स्त्रिया मनाने बंदिस्त होत्या. लैगिकतेविषयी मोकळ्या मनाने त्या बोलत नसत. लैंगिक बाबतीत कमी उत्सुक असणाऱ्या स्त्रीया पुरूषांहून अधिक नैतिक समजल्या जात. विवाहबाह्य संबंधांना तेव्हा वाईट मानल्या जात, जे रसेल अमान्य करतो.

रसेल लैंगिक शिक्षणावर भर देतो. बालक-पालक संबंध निकोप राहण्यासाठी, लैंगिकते बद्दलची उत्सुकता कमी करण्यासाठी व लैंगिकतेबद्दल सकारात्मकता निर्माण करण्यासाठी लैंगिक शिक्षणाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन रसेल करतो. रसेल म्हणतो लैंगिकता ही एक सहज प्रवृत्ती आहे आणि तिचे समाधान होणे गरजेचे आहे. असे न करता त्यात अडथळा आणल्यास नैतिकदृष्टया व्यक्ती अवनत बनते. त्याच्या मते तत्कालिन मुलांचा विवाह व विरुद्धलिंगी व्यक्तिकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला नव्हता.

रसेलच्या मते विवाह ही एक पारंपारिक संस्था असून त्यामध्ये धर्मिक, आर्थिक व सहजप्रवृत्ती हे घटक महत्त्वाचे आहेत. विवाहास धर्मिक मान्यता आहे. अर्थ ही विवाहातील महत्त्वाची बाब आहे. त्याचा विधायक तसेच विध्वसंक असा दोन्ही प्रकारचा परिणाम विवाहावर होत असतो. धर्मामुळे कुटूंबातील सदस्यांमध्ये कर्तव्यभावना निर्माण होण्यास सहाय्य होते. तत्कालिन कुटूंबव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान अधोरेखित करतांना तो म्हणतो, पुरूषप्रधानतेमुळे स्त्रीला संपत्ती व साधन मानल्या जाते. घटस्फोटाच्या बाबतीत पण पुरूषाला मोकळीक असते. तर स्त्रीला मात्र असा निर्णय घेणे जिकरीचे व अशक्यप्राय होऊन जाते. म्हणून स्त्रियांच्या चांगुलपणामुळे पितृप्रधान कुटूंबव्यवस्था टिकून असल्याचे तो म्हणतो. रसेल म्हणतो स्त्रीसाठी विवाह हा जीवन जगण्याचा आधार आहे. त्यामध्ये लैंगिकतेला महत्त्व दिले जाते. प्रेम ही त्यातील सहजप्रेरणा आहे. अबोल असणारी प्रेमभावना प्रेमविवाहास उत्तेजना देते. असे विवाह रसेलच्या मते आनंददायी ठरतात. त्यातून व्यक्ति जीवन समाधानी होते आणि त्याचा समाजावरही विधायक परिणाम दिसु लागतो. लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा असला तरी अनियंत्रीत जीवनाचे समर्थन करत नाही. संवेगावर नियंत्रण ठेवूनच जीवनाचा आनंद घेण्याचा सल्ल्ला तो देतो.

रसेल दोन प्रकारच्या विवाहाचे समर्थन करतो.

१) तात्पुरता विवाह २) सहचार्य विवाह

तात्पुरत्या विवाहाचे समर्थन करतांना रसेल म्हणतो की यातून सहज संवेगातिल अडथळा दूर होतो. अस्वस्थ बैचैनीतून मुक्ती मिळते. समाजाच्या भीतीने लपुन - छपून लैंगीक भुक भागवण्यापेक्षा खुले आम असे संबंध ठेवावेत असे रसेल म्हणतो. अशा विवाहात अपत्यप्राप्तीची अपेक्षा नसल्याने अपत्य संगोपनाची जबाबदारी राहत नाही व व्यक्ती मुक्त जीवन जगू शकते.

मात्र ज्या विवाहाद्वारे अपत्यप्राप्तीची अपेक्षा आहे, अशा जोडप्याने लैंगिक व्यभिचारापासून दूर रहावे. मुलांवर वाईट परिणाम होईल असे वर्तन करू नये. विवाहसंस्था हा दोन जीवांना जोडणारा दुवा आहे. त्यातून सुखप्राप्ती, प्रजोत्पादन, सामाजिक संबंध परिपक्व होतात.

घटस्फोटाच्या बाबतीत संतान नसलेल्यांना तो सहज असल्याचे तो म्हणतो. रसेल म्हणतो पती-पत्नीतील प्रेम नाहिसे झाल्यावर त्यांच्या सोबत राहण्याला अर्थ उरत नाही.

रसेल मुक्त प्रेमाचा उद्गाता असूनही कुटुंबसंस्थेला महत्त्व देतो. त्याच्या मते विवाहाद्वारे निर्माण होणारी कुटुंबसंस्था ही समाजाची महत्त्वपूर्ण संस्था आहे. पालकांनी बालकांचे संगोपन करावे हा तिचा हेतू आहे. रसेल कुटुंबात प्रेम, त्याग, आत्मियता, कर्तव्यभावना, समर्पण, सुख व समाधान महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करतो. रसेल पति-पत्नितील प्रेमाचे महत्त्व सांगतांना म्हणतो की, एकमेकांचा विचार करणारी जोडपी असतील तर ते समाज मान्य वर्तनच करतील. पण सर्वत्र अशी परिस्थिती असेलच असे नाही. रसेल वास्तवापासून दूर जात नाही, तो म्हणतो वैविध्यपूर्ण समाजात सर्वच विवाहित स्त्रीपुरूष समाधानी असतात असे म्हणता येत नाही. कदाचित सुरवातीला ते सुखी असतीलही पण नंतर ते दु:खी बनतात. त्या समाजाची संस्कृती, सभ्यता याचा परिणाम त्यांच्यावर होत असतो. सामाजिक रूढींचाही यास हातभार लागतो. परंपरेविरूद्ध जाऊन निर्णय घेण्यास बहुतांश लोक धजत नाहीत.

रसेलच्या मते लैंगिक शिक्षणाचा अभाव व अज्ञान हे दु:खी विवाहास कारणीभूत ठरतात. अज्ञान हे वैवाहिक सुखी जीवनातील अडथळा आहे. जाणीवपूर्वक लैंगिक ज्ञानापासून मुलांना दूर ठेवणे योग्य नाही. अतिदक्षता घेऊन ज्या मुलांना शिकवले जाते त्यांचे जीवन अडचणीचे बनते.

पती पत्नी जर परस्परांस नजरकैदेत ठेवत असतील तर त्यांच्या जीवनातील सुखाचा अभाव ठरलेला आहे असे समजा. प्राचीन काळी मात्र पत्नी पतीची मर्जी सांभाळीत असे पण ती स्वत:च्या मर्जीने जीवन जगत असे. स्त्रीयांमध्ये आधुनिक कालीन स्वत्व जागृत झाल्याने फारच तडजोडीस ती तयार नसते.

समलैंगिक कामवर्तनाचा पुरस्कारही त्याने केलेला दिसतो अर्थात त्याने व्यक्तिस्वातंत्र्याला दिलेले महत्त्वच त्यातून दिसून येते. अशा प्रकारे व्यक्ति स्वातंत्र्य आणि सामाजिक सौहार्द याचा मेळ घालण्याचा प्रयास रसेलच्या विचारांमध्ये दिसून येतो.

## १.५ एकल पालक कुटुंब (SINGLE PARENT FAMILY)

स्वातंत्र्यपूर्वकाळी व स्वातंत्र्यानंतर काही दशक आपण एकत्र कुटुंब पाहिली आहेत, ज्यामध्ये आई-वडिल, मुलं, काका-काकी, चुलत भावंड, आजी-आजोबा असा विस्तार असायचा. कालांतराने कुटुंब विभक्त होऊ लागली आणि कुटूंब षटकोनी म्हणजे मुल, आई-वडिल आणि फार झालेतर आजी-आजोबा एकत्र राहू लागले. त्यानंतरच्या काळात तर आई-बाबा आणि मुलं असा कुटुंबाचा आकार बदलला. आजी-आजोबा स्वतंत्र राहू लागले किंवा कधी एका मुलाकडे तर कधी दुसऱ्याकडे अशी त्यांची भटकंती सुरू झाली. आज तर

कल्पना करता येणार नाही इतका काळ बदलला आहे. विभक्त कुटुंबाची ही जागा एकल पालक कुटुंब घेत आहे. काय आहे हे एकल पालक कुटुंब ?

एकल पालक कुटूंब अशा कुटुंबास म्हणतात ज्यामध्ये १८ वर्षे वयाखालील मुलांसोबत त्याच्या आई-वडिलांपैकी कोणीतरी एकच जण राहतो. यामध्ये शक्यतो मुलांसोबत माता पालक असणाऱ्या कुटूंबाची संख्या जास्त आहे.

दिवसेंदिवस अशा कुटुंबाची संख्या वाढत आहे. शक्यतो पाश्चिमात्य देशांमध्ये एकल पालक कुटूंब अधिक प्रमाणात पहावयास मिळतात.

Pew Research Centre च्या सर्वेक्षणानुसार जगामध्ये USA येथे सर्वाधिक एकल पालक कुटूंबे दिसून येतात. १९१८ मध्ये USA तील १८ वर्षे वयाखालील मुलांपैकी २५टक्के मुल एकल पालक कुटुंबातील आहेत. रशियामध्येही याचं प्रमाण जास्तच आहे. पाश्चिमात्य संस्कृतिच्या प्रभावाने त्याचे लोण हळू हळू जगभर पसरत आहे.

### १.५.१ एकल पालक कुटूंबत्वाची कारणे:

या पद्धतीच्या कुटुंबनिर्मितीस काही नैसर्गिक अपरिहार्य कारणे देखील आहेत. जसे पति - पत्निपैकी एखाद्याचा मृत्यू होणे. परंतु काही कारणे काळाचा परिणाम म्हणून, विचारांतील बदलामुळे, अस्मितावृद्धि, स्वत्वाची जाणीव, अहंकाराची टक्कर, तडजोडीच्या मनोवृत्तीचा अभाव अशी देखिल आहेत.

एकमेकांशी न पटणे, चारित्र्यावरिल संशय, जबाबदारीपासून पाठ फिरवणे वा जोडीदाराकडे दुर्लक्ष करणे  या व अन्य कारणांमुळे घटस्फोटाचे प्रमाण हल्ली वाढत आहे. त्यातून अशी कुटूंबे उदयास येतात. पूर्वी पतिकडून पत्नीस घटस्फोटाचे प्रमाण अधिक होते, आता परिस्थिती बदलली आहे. कौटुंबिक हिंसाचाराला स्त्रीया पूर्वीपासूनच बळी पडत आल्या आहेत पण शिक्षणाने स्वत्वजागृती, अन्यायाला प्रतिकार करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊन शक्यतो तडजोडीचा प्रयत्न करणारी स्त्रीसुद्धा परिस्थिती हाताबाहेर गेली आहे, असे वाटल्यास घटस्फोटाचा निर्णय घेते.

कधी-कधी एखाद्या स्त्रीला लग्नाअगोदर अनैतिक प्रसंगास सामोरे जावे लागते व त्यातून जर अपत्यप्राप्ती झाली तर  विवाहाअभावी ती एकटीच त्या अपत्याचा सांभाळ करते. स्त्रीचा परित्याग करणे हे सुद्धा एकल कुटुंबाचे एक कारण आहे. हल्ली तरी ब्रेकअप ही फॅशन होत आहे व त्यातून एकल पालकत्वास सामोरे जाणारे सुद्धा दिसून येतात.

### १.५.२ एकल पालक कुटूंबाच्या समस्या:

कारण काहीही असो पण अपत्य असणारे पती-पत्नी जेव्हा विभक्त होतात. तेव्हा आपल्यासोबत मुलांबाळांसमोर अनेक समस्या उभ्या करून ठेवतात. सुरूवातीच्या काळात आयांच्या भरवशावर मुले टाकली म्हणजे आपण मोकळे अशी मानसिकता असते. पण नंतर त्यातूनही प्रश्न सुटत नाही याची जाणीव व्हायला वेळ लागत नाही. ज्या ठिकाणी अर्थाजन, अपत्यसंगोपन, त्यांचे शिक्षण, भविष्याची तरतूद यासाठी दोघांचा हातभार लागत असे त्या ठिकाणी ही जबाबदारी एकट्यावर पडते. म्हणजे सिंगल पालकत्व पण डबल जबाबदारी

अशी अवस्था होते. अर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. अशा वेळी समाज ही अशा कुटुंबास सहकार्य करण्यास धजावत नाही. एकवेळ पती व पत्नीच्या निधनाने निर्माण झालेल्या कुटूंबास तरी सहानभूति मिळते पण इतर कारणांनी निर्माण झालेले एकल पालक कुटुंब मात्र समाजाच्या द्वेषास, हेटाळणीस नाहीतर असहकार्यास तरी सामोरे जाते. अर्थात काही ठिकाणी अपवाद नाकारता येत नाही. याचबरोबर विवाहासाठी (पुनर्विवाह) समाजाकडून मानसिक दबाव ही निर्माण होतो. त्यातही आधीच पोळलेली ही व्यक्ति असा निर्णय घेण्यास कचरते. परिणामी अशा व्यक्तिमध्ये मग ती स्त्री असो वा पुरूष एकाकीपणा वाढतो. आत्मविश्वास रहात नाही, तिच्यामध्ये स्वत:बद्दल नकारात्मक भावना उत्पन्न होते. त्यातूनच समाजात मिसळणे, वावरणे कमी होऊन जाते. काही प्रसंगी अशा व्याक्तिंमध्ये मानसिक विकृतीही निर्माण होतात व त्यांचा वर्तनव्यवहार बदलून जातो.

अशा पालकांचे कधी कधी मुलांकडे दुर्लक्ष होऊ लागते. घरी त्यांचे मन रमत नाही. स्वैरपणा वाढू लागतो. घराबाहेर आपापले आधार शोधणे सुरू होते. स्वत:चे दु:ख लपवण्यासाठी मग अशा व्यक्ती व्यसनांचा आधार घेतात. फुटकळ कारणांतून जर घटस्फोट झाला असेल तर अशा व्यक्ति पश्चात्ताप करत स्वत:लाच दोष देत बसतात.

एकल पालकत्त्वाचा परिणाम मुलांवरही झाल्याशिवाय रहात नाही. फारच सद्गुणी मुलं असतील तर आई नाही किंवा बाबा नाही म्हणून अधिक जबाबदारीने रहतात, पालकांना कामात सहकार्य करतात व शिक्षणातही अग्रेसर राहतात. पण सर्वसाधारणता सर्वांच्याच बाबतीत असे घडत नाही. एक पालक मुलांवर लक्ष देण्यास पुरत नाही. परिणामी अशा मुलांची शैक्षणिक गुणवत्ता घसरते, बेशिस्तपणा अंगी बळावतो. आईच्या ममत्वास पारखे झालेलं अथवा बाबांच्या करारीपणास मुकलेलं मुलं एकांकी बनतं. त्याच्यात भावनिक समस्या निर्माण होतात, बौद्धिक विकास खुंटतो. काहीच्या बाबतीत तर परिस्थिती जास्त विकोपास जोते. काही मुले तुसडेपणाने वागायला लागतात, शिक्षण सोडून देतात. प्रसंगी व्यसनाधीन बनून अट्टल गुन्हेगारही बनतात.

अशा पद्धतीचा कुटूंबाचा परिणाम मुलांच्या दोन्ही बाजूच्या आजी-आजोबांवर सुद्धा होतो. त्यांचे मानसिक खच्चीकरण होते. सामाजिक पत जाते, वृद्धपणीचा आसरा कमी होतो. एवढेच नाही तर अशा कुटूंबाचा परीणाम येणाऱ्या पिढीला सुद्धा भोगावा लागतो.

काही विचारवंत एकल पालक कुटुंबाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात. त्यांच्या मते अशा कुटुंबामुळे निर्णयासाठी एक दूसऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही. व्यक्ति एकटी असल्याने तिला निर्णय स्वातंत्र्य मिळते. वादविवादाचा प्रश्नच उरत नाही; कारण भांडणासाठी दुसरा नसतोच. व्यक्तिला स्वतंत्रता मिळते व जबाबदारी पडल्याने तिचा विकास होतो.

पण या दुसऱ्या बाजूचा विचार काही ठराविक परिस्थितीत योग्य ठरतो, असे वाटते. दोघांचा संसार करणे जर अशक्यच असेल, त्यातून मोठी हानी घडत असेल तर एकल पालकत्व कुटुंबाकडे सकारात्मक पाहणे रास्त ठरते अन्यथा दुहेरी पालकत्वामध्ये जो आनंद, माधुर्य, भाव आहे, जबाबदारीचे वितरण आहे, भावनिक आधार आहे, मागील पिढीचे समाधान व येणाऱ्या पिढयांसाठीची व्यवस्था आहे, आदर्श आहे. या आणि यासारख्या अन्य बाबींचा विचार केल्यास पती-पत्नीने सामंजस्याने एकत्र राहणे श्रेयस्कर असल्याचे जाणवते. आई-

बाबा होणे सुंदर संकल्पना आहे. संसार केवळ दोघांचा नसतो तर त्यावर भावी पिढ्यांची नैतिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जडण-घडण अवलंबून असते. अशा व्यापक दृष्टिकोनातून विचार करूनच योग्य तो निर्णय घ्यावयास हवा आणि आधुनिकतेच्या या प्रवाहावर कसे स्वार व्हायचे ते ठरवायला हवे.

## १.६ नातेसंबंधाने एकत्र राहणे (LIVE IN RELATIONSHIP)

विवाहातून कुटूंबाची स्थापना करणे, ते दीर्घकाळ टिकवणे, अपत्यसंगोपन, अपत्यावर संस्कार करून त्यांना समाजात सदाचरण करत राहण्यास लायक बनवणे, आई-वडिलांची कृतज्ञ भावाने सेवा करणे इत्यादी गोष्टी आपणास पारंपरिक विवाह व कुटूंब पद्धतीत दिसून येतात. यात जबाबदारीची जाणीव व ती उचलण्याची तयारी असते. समाजाला सक्षम नागरिक पुरवण्याचे कार्य खऱ्या अर्थाने कुटुंबव्यवस्था करत असते. विवाह जमवण्यापासून ते व्यक्तिच्या अंतापर्यंतच्या सर्वच महत्त्वाच्या प्रसंगी घरचे आणि नातेवाईक, हितचिंतक अशा सर्वांचा हात असायचा. त्यामध्ये एकमेकांप्रतीची कर्तव्ये, आपुलकी, समाजभान, माधुर्य, इत्यादी सर्वच गोष्टींचा समावेश असायचा.

काळ बदलला, परिस्थिती बदलली, व्यक्ति स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले, बंधने व जबाबदाऱ्या नकोश्या झाल्या त्याचा परिणाम विवाहसंस्थेवरही झाला. Live in Relationship च्या गोंडस नावाखाली विवाह बंधन आणि जबाबदारी याशिवायही आम्ही एकत्र राहू शकतो, हा विचार डोकं वर काढू लागला. विवाहसंस्थेसमोर नवीन आव्हान उभे राहिले.

खरं तर Live in Relationship ही पाश्चिमात्य जगताची देण आहे. पाश्चिमात्य देशात हा प्रकार बऱ्याच दिवसांपासून आहे. आज जवळ-जवळ तिथे विवाहीत जोडप्यांपैकी २/३ जोडपी लग्नापूर्वी अशा संबंधाने एकत्र राहिलेली आहेत.

काय आहे हा प्रकार? लिव्ह -इन- रिलेशनशिपला मराठीमध्ये नातेसंबंधाने एकत्र राहणे असे म्हणतात. या मध्ये अविवाहित स्त्री-पुरूष विवाहाशिवाय दीर्घकाळ एकत्र राहतात. विवाह न करता पण विवाह सदृश्यच एकत्र राहण्याला नातेसंबंधाने एकत्र राहणे असे म्हणतात. बऱ्याच पाश्चिमात्य देशांत अशा संबंधांना कायदेशीर मान्यता आहे. पण अशा संबंधाना सर्वच ठिकाणी समाजमान्यता असेलच असे नाही. धार्मिक तर याला Live in Sin म्हणजे पापाने एकत्र राहणे असे म्हणतात. भारतात अशा संबंधाला समाजमान्यता नसली तरी तो बेकायदेशीर मात्र नाही. शक्यतो महानगरांमधून आणि उच्चभ्रू (तथाकथित) समजल्या जाणाऱ्यांमध्ये असे प्रकार पहावयास मिळतात. चित्रपटसृष्टी हे याचे उदाहरण सांगता येईल. ग्रामीण भारतात मात्र अशा संबंधाना घृणास्पद, धर्मविरोधी, समाजविघातक अन् संस्कृती भ्रष्ट करणारे मानले जाते. ग्रामीण भागात असा निर्णय जर कोणी घेतला तर त्या व्यक्तिच्या कुटुंबाला त्याचे परिणाम भोगावे लागतात. बाकी राहिलेल्या भावंडांची लग्ने दुष्कर होऊन जातात.

अशा प्रकारच्या नातेसंबंधाच्या समर्थनार्थ काही युक्तिवाद दिले जातात. त्यात प्रामुख्याने पारंपारिक विवाहातील दोष दाखवले जातात. जसे की, पारंपारिक विवाहात कुटूंबाची जबाबदारी अंगावर पडते. यामध्ये जोडीदाराचा स्वभाव लवकर लक्षात येत नाही. उशीराने

स्वभावदोष आढळल्यास काही निर्णयही लवकर घेता येत नाही. शक्यतो कुटुंब टिकवण्यासाठी असा विवाह कायम टिकवण्यावर भर असतो. फारच असह्य झाल्यास अंतिम उपाय म्हणून गोष्ट घटस्फोटावर येऊन थांबते. पण कायदेशीर घटस्फोट घेण्याची प्रक्रिया सुद्धा किचकट असते.

Live In Relationship मध्ये एकत्र येण्यालाही कायद्याची, धर्माची वा समाजाची गरज नसते व बाजूला होणे ही सोपे असते. म्हणून हा नवीन पर्याय निवडणे काहींना परवडणारे वाटते.

व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार या संबंधाच्या समर्थनार्थ मांडला जातो. एकाकी विधूर अथवा विधवा यांच्यासाठी हा पर्याय चांगला असल्याचे बोलले जाते. घटस्फोटितांचाही यात समावेश केला जातो.

Live In RelationShip ला Cohabilation असेही म्हणतात. हा दीर्घकाळ असणारा संबंध भावनिक तसेच शारिरिक स्वरूपाचा असतो. केवळ स्त्री व पुरूषच नव्हे तर दोन स्त्रिया वा दोन पुरूषही अशा प्रकारचे संबंधात राहू शकतात. मात्र सर्रास कोणीही व कसेही अशा स्वरूपाने एकत्र रहावेत यास न्यायालय मान्यता देत नाही. न्यायालयाचे या संबंधात काही निकष आहेत:

१) सोबत राहणारे जोडपे हे विवाहयोग्य असावेत.

२) अशा प्रकारचे नातेसंबंध हे पति-पत्निसमान असावेत.

३) या जोडप्याने दीर्घकाळापर्यंत एकत्र रहावयास हवे.

४) अशा प्रकारच्या संबंधासाठी कुठला कायदा नसला तरी अडचणीच्या काळात कौटुंबिक हिंसाचार कायदा हा एकमेव कायदा स्त्रीयांना उपयुक्त ठरतो.

या संबंधात राहणारे जोडपे हे एका छताखाली एकत्र असणे आवश्यक आहे.

### १.६.१ नातेसंबंधात एकत्र राहण्याचे धोके:

वर वर आकर्षक वाटणारे हे संबंध वाटतात तितके सोपे नाही.

१) असे संबंध स्त्री पुरूषांनी स्वत: लिखित केलेल असल्याने त्याच्या भविष्याची जबाबदारी त्यांच्यावरच येऊन पडते.

२) कुटुंबात ज्येष्ठ व्यक्तिंचा अभाव असल्याने मार्गदर्शकाचा अभाव जाणवतो.

३) दोघांचे जीवन म्हटल्यावर वृद्धांचा विचार यात होत नाही. स्वार्थी व एककल्ली जीवनावर यात भर असतो.

४) मुलांना पैतृक संपत्तीत वाटा मिळत नाही तर फक्त दोघांच्या मिळकतीचाच तो वाटेदार असतो.

५) आजी-आजोबा व नातवंडे या संबंधास मुकावे लागते.

६) कायद्याचे बंधनही नको आणि कायद्याचे संरक्षणही हवे, अशा दोन बाजूंवर आंदोलित होणारे हे संबंध आहेत.

७) 'सर्वकाही हवे पण जबाबदारी नको' हे तत्त्वच आधारहिन व मुक्ततावादाला अतिप्रोत्साहन देणारे ठरते

८) न्यायालयाचे निकष हे जर विवाहसंस्थेच्या तत्त्वांचाच पुरस्कार करणारे असतील तर मग अशा संबंधात राहण्यापेक्षा विवाहांचे बंधन काय वाईट आहे ?

## १.७ समलिंगी विवाह (SAME SEX MARRIAGES)

दोन पुरूषांमधील वा दोन स्त्रीयांमधील शारिरिक संबंधास समलिंगी संबंध असे म्हणतात. विचार करण्यास काहीसा विचित्र असा हा प्रकार वाटत असला तरी हे समाजातिल वास्तव आहे, ते नाकारून चालणार नाही. या समलिंगी संबंधाची परिणिती मात्र जेव्हा विवाहात होते. तेव्हा त्यावर साधक-बाधक विचार करणे गरजेचे ठरते. समलिंगी विवाह हा पारंपारिक विवाहसंस्थेसमोरील उभे असलेले विचित्र आव्हान आहे. काहींना तर अशा प्रकारचेही संबंध असू शकतात, यावर विश्वास बसत नाही. तेव्हा त्यास मान्यता देणे तर दूरच. समलिंगी संबंधास Homosexual असे नाव दिले आहे. हा शब्द मुळात ग्रीक भाषेतील असून Homos या शब्दापासून त्याची उत्पत्ती झाली आहे. Homos म्हणजे समान होय. समलिंगी कामवर्तन मानवांप्रमाणेच इतर प्राण्यामध्येही दिसून येते अर्थात ही गोष्ट कधीतरी सहजरित्या निदर्शनास येते. समलिंगी पुरूष वा समलिंगी स्त्री यासाठी दोन शब्द प्रचलित आहेत. अशा पुरूषास Gay म्हणतात. तर स्त्रीला Lesbian असे म्हटले जाते. हे दोन्ही शब्द रिचर्ड वॉन क्रॉफ्ट - ९ बिंग यांनी आपल्या सायकोपॅथिया सेक्युलिस या ग्रंथात प्रथम वापरले आहेत. यासाठी अनैसर्गिक संबंध हा शब्द लोकभाषेत प्रसिद्ध आहे. अर्थात विषमलिंगी संबंधास नैसर्गिक असे संबोधल्या जात असल्याने ठराविक स्त्रीया व ठराविक पुरूषांमध्ये घडणाऱ्या संबंधास अनैसिर्गक संबंध असे म्हटले जाते. याही पेक्षा एक वेगळा प्रकार म्हणजे उभयलिंगी कामवर्तन (Bisexuality) यामध्ये तर एखादा पुरूष जसा स्त्रीकडे आकर्षित होतो त्याचप्रमाणे तो पुरूषाकडेही आकर्षित होतो. उभयलिंगी कामवर्तनात स्त्रीकडूनही असेच घडते. पुरूषाप्रमाणेच ती स्त्रीकडेही आकर्षित होते आणि पुढील व्यवहार करते. LGB या संक्षिप्त रूपाने या तिन्ही संबंधाची ओळख होते. LGb म्हणजे Lesbian, Gay and Bisexual. या संबंधांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते.

### १.७.१ वैज्ञानिक दृष्टिकोन:

अशा प्रकारची वेगळी लैंगिकता कशी उत्पन्न होते याबाबत वैज्ञानिकांमध्ये एकमत नसले तरी याचे कारण देताना जीवशास्त्रीय स्पष्टीकरणावर विशेष भर दिला जातो. जनुकीय आणि गर्भांतर्गत असे बदल यास कारणीभूत असल्याचे म्हटले जाते. अशा प्रकारच्या वर्तनास अनुकरण अर्थात पालकांचे व आप्तेष्टांचे, जबाबदार असल्याचे दिसत नाही. मात्र स्त्रीयांच्या समलैंगिकतेला तिला मिळालेल्या संगतीचा परिणाम काही अंशी कारणीभूत होत असल्याचे म्हटले जाते. समाजात अशा प्रकारच्या संबंधांना अनैसर्गिक म्हटले जाते याचे कारण असे लोक इतरांपेक्षा भिन्न असतात, हे आहे. मात्र संशोधन असे सांगते की असा संबंधसुद्धा नैसर्गिक असून तो मनुष्याच्या सामान्य आणि नैसर्गिक भिन्नतेचा आविष्कार आहे. असे

संबंध अशा व्यक्तिचे नैसर्गिक वेगळेपण आहे. अर्थात अशा वेगळेपणातून अशा व्यक्ति सामाजिक दृष्ट्या हिन मानल्या जातात. परंतु यामध्ये समाज त्यांच्या नैसर्गिक वेगळेपणाकडे दुर्लक्ष करतो. त्यातूनच समलैंगिकता ही पातकासमान मानली जाते.

### १.७.२ ऐतिहासिक संदर्भ:

समलैंगिकता नव्याने उदयास आलेली गोष्ट नक्कीच नाही. अनेक देश व तेथील संस्कृतीमध्ये समलैंगिकतेचे अस्तित्व पहावयास मिळते. प्राचीन साहित्य, शिल्प, कला व लोककथा आदिंमधून त्यांचे पुरावे सापडतात. फरक एवढाच की अशा संबंधावर पूर्वी खुलेआम चर्चा होत नसे. तो एक अंतर्गत कुजबूजीचा भाग होतो. Diagnostics and statistical Manual of Disorder या अमेरिकन नियतकालिकात समलैंगिकता हा मानसिक दोष नाही हे स्पष्ट केले आहे. यामध्ये समलैंगिक व्यक्ति, बौद्धिक, नैतिक दृष्टिने इतरांसारखीच असते हे दाखवून दिले आहे. या संशोधनानंतर समलैंगिक व्यक्ति मोकळ्या मनाने राहू लागल्या व समाजाकडूनही त्यांचा स्विकार होऊ लागला. तरीही विषमलैंगिक लोकांकडून अशा व्यक्तिंना होणारा मानसिक त्रास हे अशा लोकांना स्वत:ची ओळख दडवून ठेवण्यास कारणीभूत ठरते.

### १.७.३ मानसशास्त्रीय दृष्टिकोन:

समलैंगिकतेची मानसशास्त्रीय चिकित्सा झालेली आहे. मानवी वर्तनावर त्याच्या मानसिकतेचा फार मोठा परिणाम असतो. मनोविश्लेषक सिग्मण्ड फ्राइड तर म्हणतो की मानवी व्यक्तिमत्त्वावर लैंगिक प्रेरणेचा मोठा प्रभाव असतो. समाज, धर्म, संस्कृती यामुळे व्यक्ति लैंगिक वासनांचे दमन करण्याचा प्रयत्न करते. पण त्यातूनच पुढे या वासना वेगवेगळ्या रूपाने उफाळून येतात व शारिरिक मानसिक विकारांचे कारण बनतात. फ्राइडच्या मते खरं तर लैंगिक वासना ही मानसिक उर्जा आहे, ती एक जन्मजात प्रेरणा असून फ्राईड तिला 'सुखतत्त्व' असे नाव देतो. त्याच्या मते मानवी शरीराचे प्रत्येक अंग सुख देत असते परंतु लोकं फक्त ओठ आणि जननांगाचाच अधिक विचार करतात. समलैंगिकतेच्या बाबतीत तो म्हणतो, समलैंगिक असणे हे वाईट-ही नाही आणि विकृतीही नाही. त्याच्या मते सामाजिक शिष्टाचारामुळे लोकं अशा संबंधांना वाईट मानतात. म्हणूनच त्याने १९३०मध्ये समलैंगिकतेच्या विरूद्ध असलेल्या कायद्याविरोधात आवाज उठवला होता.

### १.७.४ सामाजिक दृष्टीकोन:

स्थळकाळापरत्वे अशा संबंधाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. व्यक्ति हा समाजाचा मुलभूत घटक आहे. समाजविचाराचा परिणाम अर्थातच त्याच्यावर होत असतो. काही समाजात समलैंगिक संबंधांना अनैसर्गिक समजून त्याकडे घृणास्पद नजरेने पाहिले जाते. पाश्चिमात्य काही देशांत मात्र हा संबंध नैसर्गिक ठरवत त्याकडे सहजरित्या पाहिले जाते. शक्यतो मुलतत्त्ववादी, धार्मिक प्रवृत्तीचे लोक याकडे निषेधात्मक दृष्टिने पाहतात. त्यांच्या मते असे संबंध हे अशा व्यक्तिंचे उपजत गुणदर्शक असतात. यामध्ये बदलाव अशक्य असतो.

### १.७.५ धार्मिक दृष्टिकोन:

याबाबत सर्वच धर्मांची मते सारखी नाहीत. इस्लाममध्ये समलैंगिकता एक अपराध मानला आहे. कुराणात तसे उल्लेख सापडतात. हदिस मध्ये महिलांच्या समलैंगिकतेचा निषेध केला आहे. बहुतेक मुस्लिम राष्टांत अशा व्यक्तिंना फाशीची शिक्षा दिली जाते.

ऋग्वेदांत मात्र अशा संबंधांना अप्राकृतिक मानूनसुद्धा हे संबंध प्रकृतीचाच एक भाग असल्याचे म्हटले आहे. अशा लोकांचे अस्तित्व हिंदू धर्मात मान्य केले आहे. कोणार्क, जगन्नाथपूरी व खजूराहोंच्या लेण्यांमध्ये समलैंगिक संबंधदर्शक मूर्ति पहायला मिळतात. मंदिरातिल या मुर्त्यांचे स्थान तत्कालिन लोकांच्या सहिष्णूतेचे निदर्शक आहे.

ईसाई धर्मात या बाबतीत मिश्र विचार दिसून येतात. कॅथोलिक चर्चनुसार असा संबंध पापसंबंध आहे. तर आर्थोडॉक्स चर्च अशा संबंधांना मान्यता देतात. अशा संबंधांना विरोध करणे मानसिक स्वास्थ्यास  हानिकारक असल्याचे त्यांचे मत आहे. प्रोटेस्टंट चर्चसुद्धा याबाबतीत उदारमतवादी असून ते समलैगिंक विवाहास सुद्धा प्रोत्साहन देतात.

बौद्ध धर्मियांनी खरं तर आध्यात्मिक उद्दिष्ट गाठण्यासाठी शारिरिक संबंधापासून दूरच रहायचे म्हटले आहे. पण समलैंगिक संबंधांना विशेषकरून विरोध दर्शवलेला नाही. जैन धर्मियांनी यौनसंबंधांना संतानोत्पत्तीसाठी स्विकारले असल्याने आनंद म्हणून केवळ असणाऱ्या समलैंगिक संबंधांना स्पष्ट विरोध दर्शवला आहे. शीखधर्मात याबाबतीत उल्लेख आढळत नाहीत.

### १.७.६ चिकित्सक दृष्टिकोन:

समलैगिकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन कालानुरूप बदलत आहे. त्यात वैज्ञानिक संशोधनाचा महत्त्वाचा वाटा आहे. समलैंगिकता ही विकृती नाही हे संशोधनाने सिद्ध झाल्यावर त्यांच्याकडे बघण्याची मानसिकता बदलू लागली. लैंगिक संबंधाची निवड ही जैविक व पर्यावरणातील गुंतागुंत आहे. मानवी लैंगिक वर्तनातील बदलामुळे समलैंगिकता  घडून येते.

लेस्बीयन, गे उभयलिंगी वा ट्रान्सजेण्डर व्यक्तिसुद्धा इतरांसारखे मानसिक आरोग्य देण्यास व सामाजाशी जुळवून घेण्यास लायक असतात. अशा व्यक्तिंबद्दल तिरस्कार वाटणे, भेद करणे वा अशांची टिंगल-टवाळी करणे चुकीचे आहे. अशामुळे विनाकारण समलिंगी व्यक्तिमध्ये अपराधी मनोवृत्ती निर्माण होते. समाजाच्या या चुकीच्या दृष्टिकोनामुळे अशा व्यक्तिचे घरचे व नातेवाईकसुद्धा त्यांच्याकडे ‘नकोशा’ भावनेने पाहतात. त्यांचे आहे तसे अस्तित्व स्विकारले म्हणजे ते सर्वांमध्ये सर्वांसारखे मिळून-मिसळून आपल्या जबाबदा-या पार पाडू शकतात. समलैगिंकता ही काही व्यक्तिंना मिळालेली निसर्गाची देण आहे, तिला नाकारणे म्हणजे एका अर्थाने निसर्गाला नाकारणे होय.

### १.७.७ आधुनिक मतप्रवाह:

आधुनिक विचारक या संबंधाकडे उदारमतवादी दृष्टिकोनातून पाहतो. त्यांच्यामते समलैंगिकता विकृती वा अनैसर्गिक नाही. ते निसर्गाचा भिन्न अविष्कार आहे. जे आहे ते

आहे, थोडक्यात वास्तव स्विकारण्याची तयारी असायला हवी. समलिंगी सुद्धा विषमलिंगीप्रमाणेच आपले जीवन सुखासमाधानाने जगू शकतात.

जागतिक पातळीवर समलिंगी व्यक्तिसुद्धा आहेत आणि केवळ मानव या एकाच ओळखीवर त्यांना इतरांप्रमाणे हक्क, सुविधा, मिळाव्यात यासाठी प्रयत्न होवू लागले. कायद्याचे पाठबळ अशा व्यक्तिंना मिळावे या दृष्टीने एकोणीसाव्या शतकात जागतिक चळवळ उभी राहिली.

### १.७.८ कायद्याचे पाठबळ:

समलिंगी संबंधास त्याचबरोबर अशा विवाहास शासकीय मान्यतेचा विचार होऊ लागला. नेदरलॅण्ड या राष्ट्राने प्रथमत: समलिंगी विवाहास मान्यता दिली. पश्चिमेकडील बऱ्याच राष्ट्रांनी  त्यानंतर अशा विवाहास मान्यता दिली जसे, नार्वे, कॅनडा, डेन्मार्क, बेल्जियम, अर्जेंटिना, पोर्तुगाल, आइसलॅण्ड, दक्षिण आफ्रिका, अमेरिकेतील तुरळक राज्ये. भारत मात्र यास अपवाद आहे. अद्याप भारतात अशा विवाहास मान्यता नाही. परंतु असे असले तरी दिल्ली उच्च न्यायालयाने प्रौढ व्यक्तिमध्ये असणाऱ्या अशा संबंधास गुन्हा ठरवले नाही. काही पौर्वात्य राष्ट्रे मात्र या संबंधास नाकारतात. एवढेच  नाही तर अशा व्याक्तिंना शिक्षा सुद्धा फर्मावतात.

## १.८ स्त्रीवाद

वर्चस्ववाद हा मनुष्याचा स्वाभाविक गुण आहे. तो सर्वकाळी व सर्वस्थळी वेगवेगळ्या पातळीवर दिसून येतो. वर्णभेद, वर्गभेद, वंशभेद, धर्मभेद, जातिभेद, लिंगभेद आदि त्याची अपत्ये होत. स्त्रीयांना जगभरात प्राचीन काळापासून मिळालेले दुय्यम स्थान हे त्यातूनच आले आहे. स्त्रियांचे शोषण, त्यांच्यावरिल बंधने आणि अन्य स्त्रीविषयक समस्या या बहुतांशी पुरूषी वर्चस्ववादातून निर्माण झालेल्या दिसून येतात. पण जेव्हा व्यक्तिमध्ये स्वत्वाची जाणीव होते, अन्यायाची चीड यायला लागते तेव्हा मात्र ती बंड करून उठत असते. स्त्रीवाद ही अशाच स्वरूपाची एक विचारधारा व चळवळ आहे.

स्त्रीवादी विचारप्रवाह लिंगभेदास थारा देत नाही. त्याचबरोबर स्त्री-पुरूष समानतेसाठी प्रयत्नरत असतो. स्त्रीवादी चळवळ स्त्रियांना मिळालेले दुय्यमस्थान उजेडात आणून स्त्री-शोषण संपवण्याचा प्रयत्न करते. साधारणत: स्त्रीवादी विचारधारेचा उगम पाश्चिमात्य देशात झाल्याचे सांगितले जाते. पण ही संकल्पना अन्य अनेक ठिकाणी विभिन्न कालखंडात आढळून येते. यातूनच अनेक स्त्रीवाद असल्याचे दिसून येते. भारतातील महाराष्ट्र राज्यातील ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्री-पुरूष तुलना' हा निबंध लिहिला. स्त्रीयांवर होणाऱ्या अनेकविध अत्याचारांवर त्यांनी त्यातून वाचा फोडली.

पाश्चिमात्य जगतात जो स्त्रीवादी विचार उभा राहिला त्यामध्ये अनेक मतप्रवाह आहेत. जसे उदारमतवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, मूलगामी-स्त्रीवाद वगैरे. उदारमतवादी स्त्रीवाद व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देतो. प्रत्येक व्यक्तिला समान वागणूक मिळायला हवी. लिंग, वंश, वर्ण, जाती, वर्ग आदि कारणांनी त्यांच्यात भेद करायला नको.

समाजवादी स्त्रीवाद स्त्रीयांना समान वेतन मिळावे, संपत्तीत समान वाटा व कामाच्या ठिकाणी समान वर्तणूक आदिंचा पुरस्कार करतो. समाजवादी स्त्रीवादाचा समाजसुधारणेवर भर आहे.

मुलगामी स्त्रीवादामध्ये वैयक्तिक व कौटुंबिक समानतेला महत्त्व दिले आहे. सर्व समस्यांचे कारण लैंगिक शोषणच आहे अशी त्यांची मान्यता आहे.

या विभिन्न मतप्रवाहानुसार स्त्रीवादाचे टप्पे पडलेले आहेत.

**१.८.१ स्त्रीवादाचा विकासक्रम:**

**स्त्रीवादी विकासाचा प्रथम टप्पा:**

उदारमतवादी विचारांच्या प्रभावाने अठराव्या शतकात स्त्रीयांना व्यक्ति म्हणून दर्जा मिळावा व तिला व्यक्ति म्हणून संपत्ती व कराराचा अधिकार असावा, याची मागणी होऊ लागली. स्त्री, तिची अपत्ये –- पुरूषाच्या मालकीचा विरोध होऊ लागला. हुंडाविरोध, मताधिकार, राजकीय व कायदेशीर अधिकार यावर या टप्प्यात भर देण्यात आला. मेरी वोलस्टोनक्राफ्ट, जे. एस. मिल्ल या विचारवंताचा प्रभाव या स्त्रीवादाच्या प्रथम चरणावर राहिला.

**द्वितीय चरण:**

१९६० ते १९७० हे दशक स्त्रीवादी विचारांचा दुसरा टप्पा होय. समाज परिवर्तनातून स्त्रीमुक्ती असे या दशकातील स्त्रीयांचे प्रयत्न होते. यामध्ये मानव जीवनातील सर्वच क्षेत्रांत स्त्रीयांना मुक्तता मिळावी यावर भर होता.

या पर्वावर विशेषता बेटी फ्रिडनच्या 'दि फेमिनाइन मिस्टिक' व सिमॉन दि बोव्हरच्या 'द सेकण्ड सेक्स' या पुस्तकांचा प्रभाव दिसून येतो.

सिमान दि बोव्हर ही फ्रेंच विदुषी राजकारणी, लेखिका व स्त्रीवादी चळवळीत अग्रभागी असणारी होती. झां पॉल सार्त्रच्या अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव तिच्यावर होता. सार्त्रच्या 'बीइर्ग अँड नथिंगनेस' या पुस्तकात शेष राहिलेले, नीतीतत्त्वाचे विवेचन सिमॉन दि बोव्हर ने केले, ते 'एथिक्स ऑफ ऑम्बिग्यूइटी' या पुस्तकाच्या माध्यमातून. या पुस्तकात तिने म्हटले आहे की, स्वत:चे स्वातंत्र्य जपण्यासाठी गरज आहे, इतरांचे स्वातंत्र्य जपण्याची. एवढेच नाही तर ते आपले कर्तव्यच आहे. स्वातंत्र्य हे एक 'नैतिक बंधन' आहे व यातूनच इतरांचे स्वातंत्र्य हिराहून घेण्याची वृत्ती नाहीशी होईल, असा विचार त्यांनी मांडला, अर्थात तो सार्त्रच्या विचारांचाच परिपाक होय. स्वत:चे स्वातंत्र्य व इतरांचे स्वातंत्र्य दोन्ही मिळून खरे स्वातंत्र्य प्रस्थापित होते, हा विचार त्यांनी या पुस्तकात मांडला. या विचारांचाच परिणाम त्यांच्या स्त्रीवादी विचारांवरही दिसून येतो.

'दि सेकण्ड सेक्स' हे सिमॉन बोव्हर यांचे प्रसिद्ध पुस्तक. या पुस्तकावर झां पॉल सार्त्रच्या अस्तित्ववादाचा परिणाम दिसून येतो. येथे त्याने स्त्रीयांच्या बाबतीत अस्तित्ववादाचा सिद्धांत मांडला आहे. स्त्री व पुरूष असा केला जाणारा भेद यातून त्या स्पष्ट करतात. त्या म्हणतात 'कोणतीही व्यक्ति स्त्री म्हणून जन्मास येत नाही, तिला स्त्री म्हणून घडवल्या जाते'.

थोडक्यात स्त्रीत्व ही स्त्रीला मिळालेली सामाजिक देण आहे, असे तिला म्हणावयाचे आहे.

स्त्रीला दुय्यमत्व निसर्गाने नव्हे तर समाजाने बहाल केले आहे. समाज तिला स्त्रीत्वाबरोबर गौणत्व देतो.

गुणांमध्ये सुद्धा स्त्रीयांचे गुण व पुरूषांचे गुण असा भेद केलेला आहे. स्त्रीला ती स्त्री आहे याची वारंवार जाणीव करून दिली जाते. स्वतंत्रता, आत्मविश्वास, निर्णायकता व तर्कनिष्ठता हे स्त्रीचे नव्हे तर फक्त पुरूषांचेच गुण आहेत, असे मानून ते स्त्रीयांवर रूजवल्या जात नाहीत. पुरूषप्रधानता, पुरूषकेद्रिंता यामुळे स्त्रीयांचे शोषण, त्यांना दुय्यम स्थान देणे, स्त्री-पुरूष भेदभाव आदि गोष्टी घडून येतात.

यामध्ये बदल घडून यावा यास्तव सिमॉन दि बोव्हर यांनी काही उपायही सुचवले आहेत. मुळात तिच्या मते स्त्रीने अगोदर स्वत:च स्वत:ला कमजोर, दुय्यम समजू नये. तिला आपण स्त्री आहोत याचा अभिमान असावयास हवा. मानसिकतेत जर असा बदल झाला तर ती तिच्यावर येणाऱ्या प्रत्येक समस्येचा सामना करू शकते. स्त्रियांच्या सुखाचा विचार केला जातो पण त्याहूनही महत्त्वाचे आहे तिला स्वातंत्र्य असणे असे सिमान दि बोव्हरला वाटते. स्त्री-पुरूषात नैसर्गिक फरक अमान्य करता येत नाही, पण त्यास अवास्तव महत्त्व देऊ नये असे सिमॉनला वाटते.

स्त्रीवादामध्ये सिमॉनचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. स्त्रीवादी चळवळीस दिशादर्शक ठरतील असे तिचे विचार आहेत. स्त्रियांना राजकीय, आर्थिक हक्क नाकारण्यास तिचे सामाजिक स्थान जबाबदार आहे हा वेगळा विचार तिने मांडला.

सिमॉन दि बोव्हर यांचे 'दि सेकण्ड सेक्स' हे पुस्तक स्त्रीविषयक समस्यांचे आकलन व त्यावरिल उपाययोजनेस पुरक ठरले आहे.

सिमॉन दि बोव्हरचे टिकाकार म्हणतात की सिमॉनने पुरूषांच्या स्त्रीविषयक भूमिकेत कोणता व कसा बदल व्हावा याचा विचार केलेला नाही. अर्थात तिच्यामध्ये असणाऱ्या त्रुटी मान्य केल्या तरी तिचे स्त्रीवादी विचारांतील योगदान महत्त्वाचे आहे हे मात्र नाकारता येत नाही.

स्त्रीवादाचे दुसरे चरण हे प्रामुख्याने पुरूष प्रधान व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणार होते.

### १.८.२ पुरूषप्रधानता:

जीवनातील सर्वच क्षेत्रात स्त्रीयांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. असे या टप्प्यातील स्त्रीवाद्यांचे मत होते. कुटूंब समाज, सार्वजनिक व वैयक्तिक क्षेत्र आदि सर्वच ठिकाणी पुरूषांनाच प्राधान्य आहे. समाजरचनाच पुरूषांना प्राधान्य देणारी आहे. स्त्रीयांचे कार्यक्षेत्र हे वैयक्तिक व फार फार तर खाजगी क्षेत्रापुरते मर्यादित मानले जाते. तर पुरूष मात्र कला, साहित्य, रोजगार, राजकारण, समाजकारण,धर्म, अर्थार्जन आदि ठिकाणी मुक्त विहार करतो. राजकारणाचा व्यापक अर्थ करत असतांना या पर्वातील विचारवंत म्हणतात, की राजकारण केवळ देशपातळीवरच नसते तर ते कुटूंब, समाज व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात

असते आणि त्यातही पुरूष प्रधानता असते. पती-पत्नीमध्ये पतीच सत्ता गाजवतो. पालक व पाल्य संबंधसुद्धा राजकीयच असतो. कुटूंबात पुरूषांची दडपशाही असते.

स्त्री-पुरूषातील जैविक भेदही पुरुषप्रधानतेस कारणीभूत ठरतो. प्रजननक्षम स्त्री दुय्यम गणल्या जाते. समाजपरिवर्तनातून स्त्री-पुरूष समानता शक्य असल्याचे या टप्प्यातिल विचारवंतांचे मत आहे.

**तिसरा टप्पा:**

समकालिन स्त्रीवादाचा म्हणून ओळखला जाणारा हा टप्पा आहे. १९९० च्या दशकातील हा टप्पा असून लिंगभेद विरहित व्यक्तित्व असावे असे यातिल विचारवंतांचे मत होते.

या टप्प्यातिल विचारवंतांचे विचार थोडेशे वेगळे आहेत. स्त्री-पुरूषांमध्ये परस्परांचे गुण आढळतात असे त्यांचे मत आहे. पण स्त्रीयांनी मात्र पुरूषी होण्याच्या नादी लागू नये तर स्त्रीसुलभ गुणांचा विकास करून स्त्रीने उत्तम स्त्री व्हावे. आपण स्त्री आहोत याचा अभिमान बाळगावा. असे या टप्प्यातिल विचारवंताचे मत होते.

थोडक्यात स्त्रीयांनी पुरूषांशी अवास्तव स्पर्धा करू नये. स्त्री-पुरुषातिल शारिरिक व मानसिक फरक मान्य करून, उत्तम व परिपूर्ण स्त्री बनण्याकडे लक्ष द्यावे, असा काहीसा या पर्वाचा सूर होता.

**१.८.३ भारतातिल स्त्रीविचार:**

प्राचीन काळापासूनच भारतात स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार असल्याचे म्हटले जाते. महाकाव्यांच्या कालखंडात पती निवडीचा अधिकार स्वयंवराच्या माध्यमातून मिळत असे, हे सर्वज्ञात आहे. द्रौपदी, सीता ही त्याची बोलकी उदाहरणे. पुढे मात्र स्मृती काळांत विशेषत: मनुस्मृतीनंतर परिस्थिती बदलली.

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात श्रीमती ताराबाई शिंदे यांचे भारतीय स्त्रीवादातील योगदान उल्लेखनीय आहे. 'स्त्री-पूरूष तुलना' या आपल्या निबंधात त्यांनी स्वतंत्र स्त्रीवादी विचारांची मांडणी केली व स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारला. ताराबाईच्या मते सावित्रीचा आदर्श स्त्रीयांसमोर ठेवला जातो. मात्र सावित्रीने स्वत:चा पती स्वत:च निवडला होता, हे मात्र दुर्लक्षिल्या जाते. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

फुले, आंबेडकर, शाहू महाराज, आगरकर इत्यादी सुधारकांनी स्त्रीमुक्तीचा विचार मांडला. एवढेच नव्हे तर त्यासाठी ठोस उपाययोजनाही केल्या. आंबेडकरांनी कायद्याद्वारे स्त्रीयांना संरक्षण व हक्क प्रदान करण्याचा प्रयत्न केला. जागतिक व देशपातळीवरील विचारवंत, सुधारक आदिंच्या प्रयत्नांचा परिपाक म्हणूनच आज स्त्रिया जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भरारी घेतांना दिसून येतात. क्रिडा, राजकारण, समाजकारण शिक्षण, उद्योग, कला इत्यादी क्षेत्रात त्या आपला ठसा उमटवत आहेत.

## १.९ सारांश

सामाजिक तत्वज्ञान ही तत्वज्ञानाची महत्वपूर्ण शाखा आहे. कुटूंब ही समाजाची मूलभूत संस्था असून विवाहाने कुटूंबाची सुरूवात होते. स्त्री-पुरूषांच्या समाजमान्य, धर्ममान्य संबंधास विवाह म्हणतात. विवाह केवळ दोन शरीरांचे मिलन नसून आत्म्यांचे मिलन आहे. त्यातून अनेकविध कर्तव्ये पार पाडली जातात. अशा या विवाहसंस्थेसमोर आधुनिक काळात अनेकविध आव्हाने उभी झाली आहेत. पाश्चिमात्य काही तत्वज्ञांनी विवाहविषयक पारंपारिक मतास छेद देत विवाहाचे व तयातून निर्माण होणा-या कुटूंबाचे स्वरूप काय असावे याबद्दल आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज्यकार सुरळ ीत चालावा यास्तव तर प्लेटो तत्वज्ञ व सैनिक या दोन वर्गांचा कुटूंबच नाकारतो. स्त्री-पुरूषांचे नैसर्गिक आकर्षण मान्य करत तो त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था सुचवतो. यातूनच त्याची महिलांचा साम्यवाद ही संकल्पना उद्यास आली. अर्थात प्लेटोच्या या आर्दशवादास खुद्द त्याचा शिष्य ॲरिस्टॉटल सहित इतर अनेकांनह समाचार घेतला.

शांततावादी, उदारमतवादी व समाजवादी असणारा रसेल कुटूंब जीवनाला आदर्श मानूनही लैंगिक स्वातंत्रयाचे समर्थन करतो. कुटूंबात परस्पर प्रेम, वात्सल्य, अपत्य संगोपन, त्याग, कर्तव्य, सुख व समाधान आदिंना तो महत्वाचे मानतो. व्यक्तिस्वातंत्रय आणि सामाजिक सौहार्द याचा मेळ घालण्याचा प्रयास त्याच्या विचारांतून दिसून येतो.

एकल पालक कुटूंब, नातेसंबंधाने एकत्र राहणे व समलिंगी विवाह ही पारंपारिक विवाह व कुटूंबसंस्थे समोरील आव्हाने होत. यातील धोके आणि त्याचा येणा-या पिढीवर होणारा परिणाम पहात असतानाच अपवादात्मक परिस्थितीत याचा विचार करणे भाग पडते. आधुनिकतेच्या नावाखाली आपली आशयघन परंपरा या पिढीकडून दुर्लक्षित होते की काय, असा प्रश्न मनात येतो. समलैंगिकांचे नैसर्गिक वेगळेपणा लक्षात घेऊन त्यांचे अस्तित्व आदराने मान्य करणे गरजेचे असले तरी समाज याकडे विधायक दृष्टिने पाहिल काय, हा प्रश्नच आहे.

जेव्हा व्यक्तिमध्ये स्व:ताची जाणीव होते व अन्यायाची चीड येऊ लागते, तेव्हा मात्र ती बंड करून उठते, स्त्रीवाद ही अशा स्वरूपाची चळवळ व विचारधारा आहे. पाश्चात्य जगात उभं राहिलेल्या स्त्रीवादामध्ये अनेक मतप्रवाह आहेत. या भिन्न मतप्रवाहातून स्त्रीवादाचे तीन टप्पे पडले. प्रथम टप्प्यावा उदारमतवादी विचारांचा प्रभाव असून द्वितीय टप्प्यामध्ये पुरूषप्रधानते विरूद्ध आवाज उठवलेला दिसून येतो. समाजपरिवर्तनातून स्त्रीमुक्ती, असे या चरणातील स्त्रीयांचे प्रयत्न होते. या टप्प्यावर सिमॉन दि बोव्हर यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. एकूणच स्त्रीवादात तिचे योगदान महत्वाचे आहे. स्त्रियांनी पुरूषांसारखे होण्यापेक्षा स्त्री सुलभ गुणांचा विकास करून उत्तम स्त्री व्हावे, असा महत्त्वपूर्ण विचार स्त्रीवादाच्या तिस-या टप्प्यात मांडलेला दिसून येतो. भारतातही प्राचीन काळापासून स्त्रीयांना अधिकार असल्याचे म्हटले जाते व त्यासाठी स्वयंवराचे उदाहरण दिले जाते, त्याचबरोबर स्मृतीकाळात परिस्थिती बदलल्याचेही मान्य केले जाते. 19 व्या शतकात मात्र ताराबाई शिंदे यांनी स्वतंत्र स्त्रीवादाची मांडणी केलेली आढळते. सुधारकांनी, विचारवंतानी स्त्रीमुक्तीचा जागर येथे केलेला दिसून येतो. सर्वांच्याच प्रयत्नांचे फळ म्हणून आज स्त्री विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे.

## १.१० विद्यापीठीय प्रश्न

१. प्लेटोचे कुटूंबविषयक विचार स्पष्ट करा.

२. रसेलचे कुटूंबविषयक विचार स्पष्ट करा.

३. एकल पालक कुटूंबाची कारणे व परिणाम सविस्तर लिहा.

४. 'नातेसंबंधाने राहणे' यावर साधक-बाधक चर्चा करा.

५. समलिंगी व्यक्तिंकडे बघण्याचे विविध दृष्टिकोन सविस्तर लिहा.

६. स्त्रीवादी प्रवाहांची सविस्तर माहिती लिहा.

७. सिमॉन दि बोव्हर यांचे स्त्रीवादातिल योगदान स्पष्ट करा.

८. टिपा लिहा.

अ) महिलांचा साम्यवाद- प्लेटो

ब) एकल पालकत्व

क) नातेसंबंधाने एकत्र राहणे

ड) समलिंगी विवाह

इ) पुरूषप्रधानता

ई) भारतीय स्त्रीवाद/स्त्री-पुरूष तुलना- ताराबाई शिंदे

## १.११ संदर्भ

१. गोसावी, आपटे, देव, पाश्च्यात्य राजकीय विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, २०१२.

२. बाचल वि.भा. आणि स. प. गोळवळकर, पाश्च्यात्य राजकीय विचारवंत, सविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९७८.

३. वाडेकर देविदास, मराठी तत्त्वज्ञान महाकोश.

*****

# २

## सामाजिक जाणीव

भारताची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती जाणून घेण्यासाठी दक्षिण आफ्रिकेहून आलेला भारतीय बॅरिस्टर भारतभर फिरतो, गाव, वस्ती, वाड्यांपर्यंत जाऊन लोकजीवन पाहतो. अशातच आदिवासी पाड्यावरील अपुरे कपडे असणारी महिला पाहून कळवळतो व संकल्प करतो जोपर्यंत माझ्या सर्व देश बांधवांना पुरेपूर अंग झाकण्या इतका कपडा मिळत नाही, तोपर्यंत मी ही सर्वांगावर एकच वस्त्र परिधान करीन. सूट-बूट उतरवून तेव्हापासून शेवटच्या श्वासापर्यंत फक्त एक पंचा परिधान करतो. हा महान आत्मा अर्थातच मोहनदास करमचंद गांधी, महात्मा गांधी म्हणून जगप्रसिद्ध होतो. दुसऱ्याची वेदना ती स्वतःचीच वेदना समजणारा हा महापुरुष खरतर अद्वैताचे आणि जीवनाभिमुख तत्त्वज्ञानाचं मूर्तिमंत स्वरूप होय. वसुंधरेवरील सर्व संपत्ती सर्वांची आहे, कारण ईश्वराची आहे आणि सर्व ईश्वराची लेकरं आहेत. हा ईशावास्य उपनिषद, भगवद्गीता आदी ग्रंथातील विचार त्यांचा जीवन मंत्र होता. महात्मा गांधीजींच्या सामाजिक आर्थिक विचारांना अध्यात्मिक, सांस्कृतिक विचारांची पार्श्वभूमी होती. एकदा हे विश्व ईश्वराचे आहे आणि सर्व त्याची संताने आहेत हा विचार दृढ झाला तर विश्व कुटुंब ही भावना आपसूकच येते. मग त्यातून समानता नव्हे तर समता जन्म घेते, अंगवळणी पडू लागते व सदाचरण सहज घडू लागते. गांधीजींच्या बाबतीत हेच झाले. त्यांचे विचार हे तत्वज्ञान व भावना यांच्या सुरेख समन्वयातून आलेले आहेत. विश्वस्त संकल्पना याचेच एक उदाहरण होय.

मा. महात्मा गांधींनी 'अहिंसेला' आजन्म महत्व दिले आहे. म्हणूनच त्यांचा जन्मदिवस (२ ऑक्टोबर) जागतिक अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वस्त संकल्पना सुद्धा याच विचारातून जन्मास आली आहे.

**विश्वस्त संकल्पना:**

दुसऱ्या महायुद्धानंतर अर्थव्यवस्थेचा नेमकं कोणतं मॉडेल स्वीकारावं, हा जगातील प्रत्येक राष्ट्रा समोरील प्रश्न होता. त्याकाळात दोन विचारधारा प्रसिद्ध होत्या. भांडवल वाद आणि समाजवाद (साम्यवाद) पैकी भांडवलवाद व्यक्तीला हवे तितके अर्थार्जन करण्याचे व त्यावर मालकीचे स्वातंत्र्य देतो तर साम्यवाद संपत्तीच्या समान वितरणाची बाजू घेतो. गांधीजींना या दोन्ही संकल्पना त्रुटी पूर्ण वाटत होत्या. अतिरेकी संचय आला स्वातंत्र्य देणारा भांडवल वाद तर त्यांना घातकच वाटत होता. पण वरपांगी चांगला भासणारा साम्यवाद पण त्यांना धोक्याचा व हिंसक जाणवला. त्यांच्या मते संपत्तीच्या समान वितरणासाठी साम्यवादात हिंसेला स्थान आहे. यामध्ये दोष असा आहे की 'आहे रे' वर्ग म्हणजेच भांडवलदारांचा वर्ग स्वच्छेने समाज उद्धाराच्या कार्यात सहभागी होत नाही. बलपूर्वक त्यांना याकामी आणावे लागते. हा अमानुषपणा आहे.

यासाठी गांधीजी तिसराच मार्ग सुचवतात आणि तो म्हणजे 'विश्वस्ताचा'. यामध्ये ते संपत्तीची खाजगी मालकी नाकारतात. संपत्ती ईश्वराची आहे म्हणून सर्वांची आहे हा

यामागचा गाभा होय. पण म्हणून ती संपत्ती वाहनांकडून हिसकावून घ्यायला नको तर त्यांनी आपली संपत्ती स्वच्छेने समाजासाठी वापरली पाहिजे आणि स्वतः विश्वस्त म्हणून असायला हवे. अहिंसेचा पिंड असणाऱ्या गांधींचा व्यक्तीच्या हृदय परिवर्तनावर भर होता. विचार परिवर्तनातून हृदय परिवर्तन शक्य आहे असा त्यांचा विश्वास होता. प्रत्येक माणसात दैवी अंश आहे. म्हणून अहिंसक मार्गाने त्याच्यात परिवर्तन सत्य आहे. असे ते म्हणत. अहिंसा तत्व ते व्यक्ती तसेच समाज दोन्हींना लागू करतात.

संपत्ती वाहनास विश्वस्त बनवण्याची गांधीजींची संकल्पना खरतर युरोपिया ठरावी अशीच आहे याची जाणीव खुद्द गांधीजींना पण होती. पण त्यांच्या मते संपत्तीच्या वितरणाचा याहून श्रेष्ठ व अन्य मार्ग असू शकत नाही.

**विश्वस्त सिद्धांतातील काही महत्त्वपूर्ण बाबी:**

१. विश्वस्त संकल्पनेतून भांडवलवादी व्यवस्था समतावादी व्यवस्थित परिवर्तित होते. येथे संपत्तीचे समान वितरण नाही तर गरजेप्रमाणे वितरण आवश्यक आहे. भांडवल वाद्यांना सुधारण्याची संधी मिळते. माणूस बदलू शकतो असा विश्वास यामागे आहे.

२. यामध्ये संपत्तीच्या खाजगी मालकी समान्य केले असले तरी विशिष्ट मर्यादेपर्यंत समाज यास मान्यता देऊ शकतो.

३. यामध्ये संपत्तीच्या मालकीची व विनीयोगाच्या कायदेशीर नियमनाची मनाई नाही.

४. राज्य नियंत्रित विश्वस्त मध्ये कोणीही व्यक्ती आपल्या निजी स्वार्थासाठी समाज हिताविरुद्ध संपत्तीवर अधिकारासाठी व विनियोगासाठी स्वतंत्र असणार नाही.

५. व्यक्तीच्या कमीत कमी व जास्तीत जास्त उत्पन्नातील तफावत ही न्यायपूर्ण असावी.

६. उत्पन्नाचे स्वरूप समाजाच्या लहरीनुसार वा लालसेनुसार नसून गरजेनुसार निश्चित व्हायला हवे.

**- प्यारेलाल-हरिजन, २५-१०-५२**

ईश्वराची उपासना करताना मनुष्याने ईश्वरा प्रमाणे व्हावे, हा भाव विश्वस्त संकल्पनेत आहे. सर्वशक्तिमान असल्याने ईश्वरास संग्रहाची आवश्यकता नाही. याचप्रमाणे आज रोजी पुरेल एवढाच संचय माणसाने करायला हवा. गांधीजींना वाटते की, हे जर जीवनात आले तर विश्वस्त ही एक वैध संस्था होईल. विश्वस्त ही भारताने विश्वाला देण्यासारखी संकल्पना आहे.

विश्वस्त संकल्पनेवर गांधीजींचा अपार विश्वास होता. म्हणूनच ते म्हणतात, हा क्षणिक टिकणारा व धोकादायक सिद्धांत नसून शाश्वत असा आहे. या पाठीमागे धैर्य आणि तत्वज्ञानाचे सामर्थ्य आहे. धनिकांनी हा सिद्धांत अंगीकारला नाहीतर तो खोटा ठरत नसून धनिकांची कमजोरी त्यातून दिसून येते. या सिद्धांत या व्यतिरिक्त अहिंसेसोबत इतर सिद्धांताचा मेळ बसत नाही असे त्यांचे मत होते.

गांधीजी या बाबतीत वास्तववादी विचार ही करतात. ते म्हणतात, 'जर लोकांनी स्वतःच विश्वास था सारखे वर्तन केले तर मला आनंदच होईल पण ते जर असे करत नसतील तर मला वाटते की', राज याद्वारे कमीत कमी हिंसेचा वापर करून त्यांची संपत्ती घ्यायला हवी. खरतर गांधीजींना शक्ती केंद्रित व्हावी हे मान्य नव्हते. यापेक्षा विश्वस्त भावनेचा विकास व्हायला हवा, असे त्यांना वाटत होते.

गांधीजींच्या मते धनिकांनी भरपूर कमवायला हवे पण कमावलेला सर्व पैसा लोककल्याणार्थ वापरायला हवा. यासाठी ते उपनिषदांच्या ' तेन व्यक्तेन् भूंजीथा' या मंत्राचा दाखला देतात. 'त्यागुन भोगा' असे हा मंत्र सांगतो. सर्व कल्याणकारी नवजीवन पद्धती आचरावयाची असेल तर त्यास 'विश्वस्त' हाच एक अभिनव मार्ग आहे.

गांधीजींच्या मते जर आम्ही, आमच्या तात्कालिक गरजेपेक्षा अधिकचे होत असू तर आम्ही चोर आहोत, जर प्रत्येक व्यक्ती आपल्या गरजे इतकीच स्वीकारेल तर जगात कोणी गरीब राहणार नाही. ही प्रकृती रोज तितकेच देते जितकी आपणास आवश्यकता आहे . गांधींचे प्रसिद्ध वचन आहे 'Earth is enough for everybody's need and not for everybody's greed'.

गांधीजी स्वतःला समाजवादी समजत नव्हते व म्हणूनच कोणाकडून बळजबरीने संपत्ती घेण्यास त्यांचा नकार होता. कारण तसे करणे हे त्यांच्या अहिंसा तत्त्वाच्या विरोधी होते. गांधीजींना चिंता होती ती लाखो अर्धपोटी जगणाऱ्यांची. म्हणूनच ते म्हणतात आमच्या जवळ जे काही आहे त्यावर आम्हास तोपर्यंत काही अधिकार नाही जोपर्यंत या लोकांना पुरेसे कपडे व अन्न मिळत नाही. म्हणूनच आपण आपल्या गरजा नियंत्रित करायला हव्यात.

गांधीजी म्हणतात, आर्थिक समानतेच्या मुळात ट्रस्टीपण आहे. या आदर्शानुसार धनिकांचा आपल्या शेजाऱ्यांन पेक्षा एक कौडी पण जास्त ठेवण्याचा अधिकार नाही. परंतु त्या कडून ते हिंसक मार्गाने मिळवण्यापेक्षा त्यांनी स्वतःलाच आपली आवश्यकता पूर्ण झाल्यावर जे शिल्लक राहील त्याचा प्रजेकडून ट्रस्टी बनवायला हवे. ते जर प्रामाणिकपणे विश्वस्त बनतील तर ते जे कमावतील त्याचा सदुपयोग ही करतील. मनुष्याच्या कमाईत शुद्धता तेव्हाच येईल जेव्हा तो स्वतःला समाजाचा सेवक समजेल, समाजासाठी धन कमावेल, समाज कल्याणास्तव खर्च करील.

मुद्दा असा आहे की, अशाप्रकारे मनुष्य स्वभावात परिवर्तन शक्य आहे का? हा प्रश्न सर्वांनाच पडतो आणि तो साहजिकच आहे. गांधीजींना याबद्दल कल्पना होतीच. याबद्दल ते म्हणतात, व्यक्तीजीवनात अशा प्रकारचे परिवर्तन झालेले आहे. हे सिद्ध करता येत नाही थोडक्यात अहिंसेचा प्रयोग व्यापक प्रमाणात झालेला नाही. पण गांधीजींना अहिंसेचा प्रयोग व्यापक स्तरावर करावयाचा होता. अहिंसा सामाजिक स्तरावर शक्य आहे हे मुळात त्यांना समाज मनावर बिंबवायचं होत. त्यांच्या मते हे कठीण असले तरी अशक्य मात्र नक्कीच नाही. मुळात गांधीजींची अहिंसेवर अपार श्रद्धा असल्याने ते म्हणतात, ' अहिंसेच्या क्षेत्रात याहूनही मोठे साहस शक्य आहे. यास्तव ते विविध धर्मांच्या इतिहासाचा दाखला देतात.

**परात्मभाव:**

**काल मार्क्स:**

समाजवादी विचारसरणीचा प्रणेता, समाजशास्त्रज्ञ, साम्यवादी क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा मूळ प्रणेता, धर्म चिकित्सक अशी अनेक विश्व विशेषण ज्याला लावता येतील असा कार्ल मार्क्स, महान व्यक्ती होता. डॉक्टर एस. जी. निगळ त्याला, 'धर्मनिरपेक्ष महात्मा' असे संबोधतात. धर्म समाजाला गुंगीत ठेवतो असे म्हणत समाज उन्नतीसाठी झटणारा हा माणूस महात्मा या उपाधी योग्य ठरतो.

मार्च चा विचार मानवकेंद्रीय आहे. त्याची माणसा ची संकल्पना त्याच्या सर्व सिद्धांताचा पाया आहे. माणसाने केवळ भौतिक सुखाच्या मागे असावे असे त्याचे मुळीच म्हणणे नाही. पण त्याची आवश्यकताही तो नाकारत नाही. अर्थ ही मानवाची मूलभूत गरज आहे, त्यासाठी श्रम अनिवार्य असते. पण वर्गभेद यामुळे श्रमिक कहा भांडवल वाद्यांच्या हातचे बाहुले बनतो, अधिकाधिक श्रम व कमीत कमी मोबदला यातून त्याची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक होते. अधिक वेळ कामामुळे तो समाजापासून हळूहळू दूर होतो. वैयक्तिक कौटुंबिक जीवनातील आनंदाला मुकणार हा माणूस एकाकी जीवन जगू लागतो. यंत्रासमान काम करत राहिल्याने माणूस म्हणून जीवन जगणे त्याला अशक्यप्राय बनते. आपल्या अशा अवस्थेची कारणे जेव्हा त्याच्या लक्षात येतात तेव्हा मात्र तो खडबडून जागा होतो. आपल्या अर्थपूर्ण अस्तित्वासाठी, हक्कासाठी तो संघर्ष करू लागतो. हा संघर्ष असतो सर्व हरलेल्या अशा सर्व हारातील आणि शोषक अशा भांडवल दारातील. हा **दोष-**शोषक संघर्ष आहे. मार्क्स याला वर्गसंघर्ष (Class Conflict) असे नाव देतो. या ठिकाणी आपण कामगारांच्या मनू भूमिकांचे यथोचित चित्रण करणारी ' परात्मभाव' (Alienation) व त्याने केलेल्या बंडाचे चित्र करणारी ' वर्ग संघर्ष' या दोन संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत.

**परात्मभाव:**

मानवाचा अभ्यास करत असताना कार्ल मार्क्स मानवा जातीचा इतिहास आणि त्यामध्ये असणारे मानवी संबंध, मग ते मानवाचे निसर्गाशी असो, मानवाचे परस्परांशी असो, की मानवाचा स्वतःशी असो याचे सूक्ष्म अध्ययन करतो. तेव्हा त्याच्या लक्षात येते की जेव्हा मानव समूहात वर्ग निर्माण झाले, तेव्हा मानवाच्या संदर्भात ' परात्मभाव' या संकल्पनेचा जन्म झाला.

परात्मभाव (Alienation) ही भांडवल वादी समाजाची देण आहे.

परात्मभाव ही सर्व हारा वर्गाची मनोदशा आहे. परात्मभाव हा या वर्गातील लोकांच्या मनात उत्पन्न झालेला भाव आहे. हा भाव उत्पन्न होण्यास कारणीभूत ठरलेला घटक म्हणजे भांडवलदार ! जो पुंजी पती वा **बुजरा** या नावाने ओळखला जातो. तो 'पुंजी' चापती म्हणजेच मालक असतो तर सर्व हाराचा श्रमिक हा, ही पुंजी जमा करण्याचे साधन. श्रमिकाला त्याने केलेल्या श्रमाचा योग्य तो मोबदला मिळत नाही. तो आर्थिक दृष्ट्या कमजोर बनत जातो तर भांडवलदार मात्र त्याच्या लाभावर मोठा होत राहतो. या पेचातून शमिकाच्या मनामध्ये वेगवेगळ्या संदर्भात उत्पन्न झालेला भाव म्हणजे ' परात्मभाव'

परात्मभाव ही संकल्पना वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या स्वरूपात मांडली आहे:

**दुर्खीमच्या मते,** जेव्हा सामाजिक एकतेत शीथीलता येते आणि सामूहिक जीवन नियंत्रणात राहत नाही व्यक्तीच्या शक्तीचा त्रास होऊ लागतो. अशा स्थितीत परात्मभाव म्हणतात.

**मर्टन म्हणतो**, जेव्हा समाजात सांस्कृतिक उद्दिष्टांची प्राप्ती संस्थागत साधनांद्वारे केली जात नाही तेव्हा परात्मभावाची स्थिती येते.

**पार्सनच्या मते,** 'विचलित व्यवहार' हा पर आत्मभाव अवस्था दर्शवितो.

**टॉकिया व्हेली म्हणतो**, पूंजीवादी व्यवस्थे प्रति जेव्हा परात्मता जेव्हा श्रमिकांत वाढते तेव्हा परात्मभाव येतो.

**एरिक फॉर्म चा मते,** परिस्थितीवशता हे परात्मभावाचे कारण आहे.

कार्ल मार्क्स या संदर्भातील विचार काहीसे वेगळे आहेत. कार्ल मार्क्स म्हणतो, परात्मभाव ही व्यक्तीची अशी अवस्था आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपल्या कामाला दुसऱ्याचे काम मानू लागतो. थोडक्यात जे काम तो करतो ते स्वतःच्या मर्जीने, आनंदाने न करता यंत्रवत अगतिकतेने वा दबावाने, पोट भरण्यासाठी म्हणून करत असतो.

मार्क्स च्या मते मनुष्य हा सुद्धा सृजनशील प्राणी आहे. भांडवलवादी व्यवस्थेत तेच काम करत राहिल्याने त्याची सृजनशीलता मारली जाते. त्यामुळे त्याच्यामध्ये कामाप्रती अरुची, उदासीनता निर्माण होते.यातूनच अलगाव परात्मभावाचा जन्म होतो.

भांडवलवादी समाजव्यवस्थेत मानव समूहाचे श्रमिक व पुंजीपती असे विभाजन होते. या अपरिहार्य समजल्या जाणाऱ्या श्रमविभाजनाची अडचण म्हणजे भांडवलदार पुंजीपती श्रमिकांना योग्य तो मोबदला देत नाही. कामही योग्यतेनुसार मिळत नाही, एकाच प्रकारचे काम वारंवार करावे लागते उत्पादित वस्तूंची प्रत्यक्ष किंमत व निर्माण करणारा जो श्रमिक आहे, त्याला मिळणारी रक्कम यात फार मोठी तफावत असते. याला अतिरिक्त मूल्य असे म्हणतात. (Surplus Value) .

मूल्य आयते भांडवलदारांच्या घशात जाते हा सगळा प्रकार उघड्या डोळ्याने पाहणारा श्रमिक अस्वस्थ, बेचैन, उदासीन होतो .अडचण समजत असूनही उपाय सापडत नाही. म्हणून अगतिक होतो. परिणामी या श्रमिकांच्या मनामध्ये 'परात्मभाव' निर्माण होतो.हा परात्मभाव वेगवेगळ्या स्तरावर निर्माण होतो.

१. **कामाप्रती परात्मभाव:** श्रमिक जे काम करत राहतो, निर्माण होते. हे आपले नसून मालकाचे आहे, आपली रोजी-रोटी यातून चालते म्हणून ते करावे लागत आहे, सोडता येत नाही अशी त्याची मनस्थिती बनते. या त्याच्या कामाप्रतीच्या मनोदशेला परात्मभाव म्हणतात.

२. **उत्पादित वस्तू:** कलकारखान्यांतून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवर कामगाराची कुठली ओळख नसते. त्या वस्तूचा अप्रत्यक्ष तोही अत्यल्प मोबदला त्याला मिळत असतो. ग्राहक आणि कामगार याचा संबंध येत नाही. वस्तूचा अधिकचा नफा बुजुर्आस

मिळतो. यातूनच वस्तू निर्माता असूनही ही मालकाची वस्तू आहे, माझी नाही असा भाव त्याच्या मनात निर्माण होणे साहजिकच आहे.

३. **सहकार्यांप्रती परात्मभाव:** संजय पळशीकर म्हणतात, 'माणसाचे म्हणून जे जे काही वैशिष्ट्य आहे ते भांडवलशाही समाजात निव्वळ साधन बनवण्याचे दिसते. त्यामुळे समाज हे एक सहजीवन न उरता आपापल्या गरजा भागवण्यासाठी एकत्र येणाऱ्या सुट्ट्या व्यक्तींचा पुंजका बनतो. ' यानुसार सहकार कामगार त्याच्या गरजेसाठी आणि मी माझ्या गरजेसाठी येथे आलो आहे असा परात्मताभाव एकमेकांत प्रति निर्माण होतो.

४. **स्वतःबद्दलचा परात्मभाव:** कार्ल मार्क्स च्या परात्मभावाच्या कल्पनेतील हे सर्वात भयानक रूप आहे. स्वतःच्या मनाप्रमाणे काम करता येत नाही आवडत नसताना काम करावे लागते, मोबदलाही मिळत नाही, अन् काम सोडताही येत नाही या सगळ्यांच्या परिणाम म्हणून कामगाराच्या मनात स्वतः बद्दलच शेवटी घृणा वाटायला लागते. कागज कलम कुटुंब पण त्याला पारखे व्हायला लागते. कामाच्या अधिक तासान मुळे आणि कामाच्या त्रासामुळे कुटुंबाला त्याला वेळ देता येत नाही. वेळ असला तरी त्याच्या डोक्यात कुटुंब नाही तर काम राहते मिळणाऱ्या वेतनातून कुटुंबाच्या गरज आहे भागत नाही, अशा प्रकारे स्वतःपासून व स्वतःच्या माणसां पासून तो परात्म बनतो

कृतार्थता, समाधान आणि आनंद यावरून ठरवल्यास परात्मभावा पासून श्रमिक वाचू शकतो असे मार्क्स म्हणतो. पर आत्म भावामुळे माणसाची सर्जनशीलता मारली जाते. त्यामुळे तो नष्ट करा व करावयाचा असेल तर उत्पन्न व उत्पादनाचे वाटप प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेनुसार आणि प्रत्येकाला त्याच्या कामानुसार व्हायला हवे. तरच समतेवर आधारित समाज निर्मिती होईल, अशी आशा मार्क्स व्यक्त करतो. या संकल्पने वरून कार्ल मार्क्सचे द्रष्टेपण सिद्ध होते. मार्क्सची परात्मभावाची संकल्पना मानवाला आत्मभान देणारी आहे.

**मार्क्सचे वर्ग संघर्ष संकल्पना:**

साम्यवादाचा जाहीरनामा (Communist Menifesto)

**वर्ग संघर्षाच्या तत्त्वज्ञानाने सुरू होतो. यामध्ये कार्ल मार्क्स म्हणतो:**

मानवी समाजाचा इतिहास हा कार्य संघर्षाचा इतिहास आहे. मालक व मजूर स्वतंत्र माणसे व गुलाम श्रीमंत आणि गरीब, जमीनदार आणि कुळ, कारखानदार, आणि कामगार, थोडक्यांत शोष्य आणि शोषक हे दोन्ही वर्ग आपापसात संघर्ष करीत आले आहेत.हा संघर्ष कधी गुप्त तर कधी उघडपणे सतत चालूच आहे. या संघर्षात कधी क्रांती होऊन नवा समाज निर्माण झाला, तर कधी दोन्हीही वर्गनष्ट होऊन समाजव्यवस्था निर्माण झाली.

मार्क्सच्या वर्ग संघर्षाची बीज हेगेलच्या विचार द्वंद्व वादात दिसून येतात. ज्याला तो भौतिक द्वंद्व वादाचे स्वरूप देतो. मार्क्सने भिन्न-भिन्न वर्ग काळाच्या ओघात निर्माण झाल्याचे म्हटले आहे, त्यामध्ये प्रामुख्याने सुरुवातास निर्माण झालेला ज्याचा आधार आर्थिक तत्त्व

आहे असा मालक आणि नोकराचा वर्ग होय. पुढे त्यातुनच स्वतंत्र माणसे आणि गुलाम असा वर्ग निर्माण झाला. श्रीमंत आणि गरीब हा आर्थिक विषमता दर्शक वर्ग जमीनदार आणि कुळ हा मालकी हक्काधारित वर्ग तर कारखानदार आणि कामगार हा औद्योगिक प्रगती नंतर चा भांडवल वाद्यांच्या प्रभाव काळातील वर्ग असे कालपरत्वे निर्माण झालेले वर्ग तो अधोरेखित करतो.

मार्क्सच्या मते या सर्वच वर्गांमध्ये कमी अधिक, स्पष्ट सोपा असा संघर्ष तर दिसतोच पण या संघर्षाला औद्योगिकीकरणानंतर तीव्र स्वरूप प्राप्त झाले. खरतर हा संघर्ष 'आहे रे' (Haves), आणि ' नाही रे' (Have Not) यांच्यातील होता. भांडवलवादी अर्थव्यवस्थेत श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातो तर गरीब अधिक गरीब होत जातो. एवढेच नाही तर आपला स्वार्थ साधण्यासाठी श्रमिक वर्ग गरीब वर्गाला जाणीवपूर्वक गरीब ठेवतो. हा छुपा हेतू एक ना एक दिवस गरीब वर्गाच्या लक्षात येतो. त्याचा वर्तमान त्याला असह्य होतो, भूतकाळाचे स्मरण वेदना दायक ठरते आणि भविष्यातही हे असेच चालू राहणार का? हा प्रश्न त्याला अस्वस्थ करतो. म्हणून मार्क्स म्हणतो, हा वर्ग संघर्ष करू लागतो यात आश्चर्य असे काही नाही. हे आर्थिक विषमतेवर आधारित वर्ग कधी कारखानदार-मजूर, जमीनदार-शेतमजूर अशा स्वरूपाचे असतात. पण या संघर्ष या कडे मार्क्स विधायक दृष्टीने पाहतो हे महत्त्वाचे आहे.

या संघर्षातूनच क्रांतिकारक परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त करतो. हे परिवर्तन समाजवादी-साम्यवादी समाजव्यवस्थेला जन्म देईल अशी खात्री त्याला वाटते.

कार्ल मार्क्स चा वर्ग संघर्षाच्या तत्त्वज्ञानाने जगभरात वर्ग जाणीव व निर्माण होण्यास सहाय्य झाले. पुढे त्याची परिणीती क्रांतीमध्ये झाली. अनेक ठिकाणी अशा क्रांत्या झाल्या असल्या तरी वर्ग विरहित समाजाची कार्ल मार्क्स ची संकल्पना एक आदर्शवादी संकल्पनाच ठरली. पण यामुळे कार्ल मार्क्स च्या वर्गविरहित समाजाच्या विचाराचे महत्व कमी होत नाही.

वर्ग संघर्षाच्या या प्रक्रियेमध्ये मार्क्सचा मते ' नाही रे' वर्ग गरज वं तांचा वर्ग असल्याने त्यांच्यामध्ये समस्यांची समानता ( समदु:खी) असल्याने तो संघर्ष करण्याच्या हेतूनेच संघटित होतो. तर भांडवलदारांचा वर्ग असंघटित स्वरूपाचा असतो. पण या वर्गाकडे संपत्ती एकवटलेली असते. 'नाही रे' मध्ये दारिद्र्य वाढीस लागते, भांडवलदार कामगारांचे शोषण करू लागतात. 'बळी तो कानपिळी' जंगली न्याय, येथे प्रत्यक्षात येतो.

भांडवलदारांची आपापसातील स्पर्धा देखील कामगार वर्गाच्या मुळावरच येते. भांडवलातील वाढ हा एकमेव उद्देश ठेवून चालणारे कल कारखाने, उद्योग कामगारांच्या हिताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. पण भांडवलदारांनी मध्ये असणारा अंतर्विरोध हाच त्यांच्या विनाशाचे कारण ठरतो, असे मार्क्स म्हणतो.

**संघर्षातील विषमता:**

तुल्यबळ व्यक्ती वा व्यक्ती समूहातील संघर्ष समजण्यासारखा असतो. असा संघर्ष हाच प्रामुख्याने होत असताना दिसून येतो. पण येथे भांडवलदार व कामगार यांच्यात कमालीची आर्थिक विषमता दिसून येते. या लढ्यात आर्थिक संपन्नते मुळे साधनांच्या बाबतीत भांडवलदार सरस ठरतात. त्यामुळे त्यांची विजयाची शक्यता अधिक असते. मार्क्सला

तरीही असे वाटते की कामगार संघटनेच्या माध्यमातून हक्कासाठी संघर्ष करील आणि विजयीही होईल. कामगार संघटनांची ताकद मार्क्स ओळखून होता.

वर्गसंघर्ष होऊन राज्य विरहित, वर्ग विरहित समाज जरी प्रत्यक्षात आला नसला तरी कार्ल मार्क्सने वाजवलेली ही धोक्याची घंटा भांडवलदारांच्या कानात खणखणू लागली. कामगारांचे संघटन आणि त्यातून होणारा संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी आपले अस्तित्व अबाधित राहण्यासाठी कामगारांच्या गरजा, मागण्या यांकडे अगतिकतेने का होईना, भांडवलदारांना लक्ष घालावे लागले. जगभरात कामगार विषय झालेले कायदे यामध्ये मार्क्सच्या विचारांचा मोलाचा वाटा आहे.

**शोषणमुक्त समाजासाठी वर्गसंघर्ष:**

समतेवर आधारित असणारा समाजच शोषण रहित असतो. पण समतेवर आधारित समाज रचना ही काळाची देणं असून त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा, संघटन आवश्यक असते. यासाठी सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता असते. वर्गसंघर्ष अशा परिवर्तनास बळ देतात. समाजात मूलभूत बदल घडवण्यासाठी राजकीय सत्ता महत्त्वाची ठरते . म्हणून सत्ता संपादनार्थ सुद्धा संघटित संघर्षाची आवश्यकता असते. असे न झाल्यास राजसत्ता भांडवल वाद्यांच्या इशाऱ्यावर नाचते व परिणाम 'नाही रे' वर्ग दाबला जातो. म्हणून राजकीय सत्ता हस्तगत करुन कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करणे आवश्यक आहे, असे मार्क्स म्हणतो.

**वर्गसंघर्ष प्रयत्नपूर्वकच:**

वर्ग संघर्ष हा आपोआप होणारी काळाच्या ओघाल घटना नसून त्यासाठी रचनाबद्ध, विचारपूर्वक प्रयत्नांची आवश्यकता आहे. कामगारांनी लोकांच्या मनात संघर्षाची आवश्यकता उभी केली पाहिजे. बलाढ्य व्यक्तींशी हा संघर्ष आहे म्हणून हतबल न होता, या संघर्षातून झाला तर फायदाच होईल नुकसान नाही, हे विचारात घेणे आवश्यक आहे. या संदर्भात मार्क्स कामगारांना म्हणतो, ' Workers of the world, unite ! You have nothing to lose but your chains !

अशा प्रकारे जगातील कामगारांना संघटित होऊन संघर्ष करण्यास प्रवृत्त करणारा मार्क्स म्हणतो, गमावण्यासारखे काय आहे तुमच्याकडे उलट तुम्ही गुलामीचा साखळदंडातुन मुक्त व्हाल. वर्ग संघर्षातूनच समाज वर्ग विरहित आणि राज्य विरहीत बनेल. व्यक्तीला सुखी, समाधानी व न्यायपूर्ण जीवन यातूनच मिळू शकते, असे मार्क्सला वाटते.

## वंशभेद- फ्रान्ट्ज फॅनन

वंश आणि जात या दोन श्रेण्या आहेत. वंश सुरुवातीला समान भाषा बोलणाऱ्या लोकांच्या एकत्रित समूहातून विकसित झाला आणि नंतर राष्ट्रवादाच्या इतर नवजात कल्पनेत मिसळला. भाषिक आणि राष्ट्रीय वांशिक ओळखींनी जैविक वंशाच्या कल्पनेला मार्ग दिला. 'आर्यन' या संकल्पनेची उत्क्रांती यासाठी एक उत्तम उदाहरण देते- इंडो-आर्यन भाषा कुटुंबाशी संबंधित भाषा बोलणाऱ्या लोकांसाठी ही संज्ञा म्हणून सुरुवात झाली परंतु 20 व्या शतकापर्यंत ती राष्ट्रीय बनली आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे जैविक श्रेणी. नाझी

जर्मनीमध्ये ज्यू हे आर्य लोकांच्या बरोबरीचे नव्हते असे नाही तर ते जर्मन राष्ट्राचाच एक भाग होण्यासाठी अयोग्य असल्याचे मानले जात होते. आफ्रिकन लोक युरोपियन लोकांपासून कसे वेगळे झाले हे जैविक शर्यतीचे दुसरे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण पाहिले जाऊ शकते. प्रत्येक वंश ओळखताना त्यांच्या त्वचेच्या रंगावर भर दिला जात होता आणि हे प्रत्येक वंशासाठी - पांढरा, काळा, तपकिरी असे स्वीकृत नामकरण होईल.

फ्रँट्झ फॅनॉनचे मुख्य कार्य 'ब्लॅक स्किन, व्हाइट मास्क' हा एक अनोखा उपक्रम आहे ज्यामध्ये मनोविश्लेषणाच्या आधारे वांशिक संबंधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जातो, एक द्रुष्टी जी सामान्यतः कौटुंबिक आणि लैंगिक संबंधाचा अभ्यास करण्यासाठी राखीव होती. फॅनॉनच्या वसाहतवादी विषयाच्या अनुभवामुळे त्याला त्याच्या युरोपियन शिक्षणातून मिळालेले ज्ञान उलटे करता आले आणि ते आतापर्यंत टी च्या कक्षेबाहेर असलेल्या वस्तूवर लागू केले. तत्त्वज्ञान आणि मनोविश्लेषण हे विषय त्यांनी हाताळले. फॅनॉनसाठी सत्ताशास्त्र स्वतःच, काळ्या व्यक्तीची स्थिती व्यक्त करण्यासाठी अपुरी होती, कारण ती काळ्या माणसाच्या जिवंत अनुभवाचा विचार करत नव्हती. केवळ गोरे पुरुष (आणि काही स्त्रिया) होते ज्यांनी सत्ताशास्त्राबद्दल लिहिले आणि म्हणूनच हा विषय त्यांच्या पूर्वाग्रहाने डागलेला होता. या पूर्वाग्रहाचा प्रतिकार करण्यासाठी, फॅनॉन 'निग्रो स्टेट ऑफ बीइंग' च्या वैशिष्ट्यांवर विस्ततृ पिणे चर्चा करतो.

फॅनॉनसाठी, “सभ्य बनने” ही स्वतःच एक शिस्तप्रिय श्रेणी बनली आहे. तो म्हणतो, “अँटिल्समध्ये अधिकृतपणे बोलली जाणारी भाषा फ्रेंच आहे; मुलांनी क्रेओल वापरत नाही याची खात्री करण्यासाठी शिक्षक त्यांच्यावर बारीक नजर ठेवतात ... असे दिसते, मग समस्या अशी आहे: अँटिल्समध्ये, ब्रिटनीमध्ये, एक बोली आहे आणि फ्रेंच भाषा आहे. पण हे खोटे आहे, कारण ब्रेटन लोक स्वतःला फ्रेंच लोकांपेक्षा कनिष्ठ समजतात. ब्रेटन लोक कधीच गोऱ्या माणसाने सुसंस्कृत झाले नाहीत.” अँटिलिसची वसाहत आणि ब्रिटनीच्या फ्रेंच प्रदेशातील फरक हा राजकीय आहे आणि संबंधित बोलींना ज्या पद्धतीने वागवले जाते त्यावरून ते खोलवर प्रतिबिंबित होते. कृष्णवर्णीय माणसाची भाषा आणि काळ्या माणसाला संबोधणे हे वर्णद्वेषी आणि वसाहतवादी पूर्वकल्पनांद्वारे कसे विचलित केले जाते यावर फॅनॉन पुढे निरिक्षणे नोंदवतात - गोरा माणूस कृष्णवर्णीय माणसाला कसे अर्भक बनवतो आणि प्रौढांप्रमाणे त्याच्याशी कसे बोलतो; गोरा माणूस काळ्या माणसाच्या विरोधात “त्याला वर्गीकरण करण्याच्या, त्याला तुरूंगात टाकण्याच्या, त्याला आदिम बनवण्याच्या, त्याला भ्रष्ट बनवण्याच्या” पद्धतीने भाषा वापरतो.

एका सुशिक्षित कृष्णवर्णीय माणसाने एक चांगला काळा माणूस म्हणून वागणे अपेक्षित आहे- जसे की पांढऱ्या माणसाने परिभाषित केले आहे. तर, भाषा, संस्कृती आणि वंश (संस्कृतीचा मार्ग म्हणून भाषा, आणि वंशाचे चिन्हक म्हणून संस्कृती) यांच्यातील त्रिवार संबंध कृष्णवर्णीय माणसाला दडपून ठेवण्यासाठी, स्वत:बद्दल अनिश्चित आणि दास्य ठेवण्यासाठी एकत्रित होतात. गोऱ्या माणसाच्या मानकांविरुद्ध या सातत्यपूर्ण बदनामी आणि निर्णयाबद्दल काळ्या माणसाचा प्रतिसाद म्हणजे फॅनॉन ज्याला 'पासिंग' म्हणतो ते करणे – ज्यामध्ये एखाद्या अत्याचारित वंशातील व्यक्तीने तो प्रबळ वंशातील आहे, असे वागण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून त्याला मान्यता मिळेल व अधिक आदर मिळेल. फॅननच्या मते, यासाठी सर्वात उपयुक्त साधन म्हणजे प्रभावी वंशाची भाषा शिकणे (येथे,

गोऱ्या माणसाची). फॅनॉन दोन वंशांमधील संबंधाचे वर्णन कसे करतात हे समजून घेण्यासाठी उत्तीर्ण होणे ही एक मध्यवर्ती संकल्पना आहे; कृष्णवर्णीय लोकांद्वारे अनुकरण करणे हे गोरेपणा टिकवून ठेवण्याचे कारण आहे. पांढऱ्या आदर्शांची पुष्टी करून आणि त्यांच्याशी जुळवून घेऊन, गोरेपणा हा प्रभावी राहतो आणि गोऱ्यांसाठी सत्तेत प्रवेश प्रदान करतो, तर काही कृष्णवर्णीय लोक त्यातला वाटा मिळवू शकतात.

फॅनॉनला असे दिसून आले की कृष्णवर्णीय पुरुष आणि स्त्रिया गोऱ्या प्रेमींना घेऊन वांशिक अंतरावर मात करण्याचा प्रयत्न करतात. अनुभव आणि सिद्धांत यांच्या आधारे, तो असा युक्तिवाद करतो की आंतरजातीय प्रेम बहुतेक वेळा कृष्णवर्णीय लोकांच्या निम्न दर्जाच प्रतिबिंबिध करते, जे उच्च संस्कृतीचे प्रवेशद्वार म्हणून त्यांच्या श्वेत भागीदारांकडे पाहतात. तथापि, त्यांचे सततचे प्रयत्न त्यांच्या काळेपणाची वस्तुस्थिती लपवू शकत नाहीत आणि ही वस्तुस्थिती कृष्णवर्णीय लोकांसमोर वारंवार येते, ज्यामुळे त्यांना मोठा त्रास होतो आणि त्यांच्यातील स्वाभिमान गमवला जातो. गोऱ्यांसाठी काळ्याची इच्छा, तसेच काळ्यासाठी गोयागची इच्छा ही नेहमीच वांशिक भेदांवर उपाय असू शकत नाही. हे बहुधा असे एक थिएटर आहे जिथे  वांशिक वर्चस्व गाजते. फॅनॉनचे निराशावादी मूल्यांकन असे आहे की वांशिक जीवनातील सर्वात खाजगी इंटरस्टीस देखील वंशापासून मुक्त नाहीत.

एम. मॅनोनी यांच्या प्रॉस्पेरो आणि कॅलिबन: सायकॉलॉजी ऑफ कॉलोनायझेशनच्या दिशेने टीका म्हणून लिहिलेल्या 'द सो कॉल्ड डिपेंडन्सी कॉम्प्लेक्स ऑफ कॉलोनाइज्ड पीपल्स' शीर्षकाचा पाठ, कृष्णवर्णीय माणसाला त्याच्या अग्निपरीक्षेसाठी दोष देणाऱ्या युक्तिवादांना संबोधित करतो - की त्याने गुप्तपणे वसाहत केली होती, वर्चस्व गाजवायचे होते किंवा तो अक्षम होता म्हणून. फॅनॉन येथे ज्यू आणि नीग्रोच्या स्थितीत अनेक समांतरता निर्माण करतो, सार्त्रवर रेखाटतो. ज्यू आणि ब्लॅक मॅन या दोघांची व्याख्या गोऱ्या माणसाने त्यांना कशी पाहावी लागेल त्यानुसार केली जाते; ज्यू आणि कृष्णवर्णीय बदनामी होणाऱ्या माणसाच्या ओळखीचे आवश्यक घटक आहे. काल्पनिक प्रतिमा ज्यांच्या विरोधात तो स्वतःला परिभाषित करतो, गोऱ्या माणसाच्या स्वत:च्या फसविकृतीतून निर्माण झालेल्या या काल्पनिक प्रतिमा काहीवेळा ज्यू आणि कृष्णवर्णीय स्वत: स्वीकारतात. ते त्यांच्याबद्दलच्या पांढऱ्या माणसाच्या कल्पनांना आंतरिक बनवतात आणि त्यांनी जे आंतरिक केले आहे ते पार पाडतात, ज्यामुळे एक दुष्टचक्र निर्माण होते जिथे पांढऱ्या माणसाची काल्पनिक प्रतिमा खरी ठरते.

कृष्णवर्णीय माणसाला सतत आठवण करून दिली जाते की तो प्रथम आणि सर्वात महत्त्वाचा काळा आहे, आणि नेहमीच माणूस नाही. त्याला पर्यायाने अविकसित, कनिष्ठ म्हणून, पशुवादी म्हणून, वर्चस्वाची गरज म्हणून चित्रित केले आहे. अशा संकल्पनांमधून कृष्णवर्णीय माणसाच्या पौरुषत्कव, मूर्खपणा , पाशवीपणा इत्यादींबद्दलच्या कथा येतात. गोरेपुरुष काळ्या पुरुषांना “अन्य” करतात आणि त्यांच्याबद्दल सोयीस्कर समिकांचा शोध लावतात ज्यामुळे त्यांना कृष्णवर्णीय पुरुषांचे “इतर” म्हणून त्यांचा दर्जा टिकवून ठेवता येतो, त्यामुळे त्यांची ओळख पटते.

फॅनन म्हणतात, निकृष्ट म्हणून चित्रित केल्यामुळे, कृष्णवर्णीयांनी स्वतःहून कनिष्ठतेची भावना विकासित केली आहे. स्वातंत्र्य कृष्णवर्णीयांना गोऱ्यांपासून मुक्त करेल आणि

कृष्णवर्णीयाची मुक्ती आहे जी गोऱ्यांना त्यांची ओळख काळ्यापासून वेगळी करू देईल. तेव्हाच गोऱ्यांना स्वतःला विरूद्ध परिभाषित करण्यासाठी कृष्णवर्णीयांची गरज उरणार नाही.

फॅननच्या मते, जे काही वंशांना वश करतात आणि त्यांना अमानवीय बनवतात, त्यांच्यासाठी विद्यमान वांशिक संबंधांचे उच्चाटन हा एकमेव मार्ग आहे ज्याद्वारे खरे स्वातंत्र्य वापरले जाऊ शकते. किंबहुना, या यंत्रणांचे अस्तित्व हेच स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचे लक्षण आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हे ज्या व्यवस्थेखाली व्यक्ती जगते त्या प्रणालीशी वंशासारख्या दडपशाहीच्या बाबतीत बंधनकारक आहे.

**जातीव्यवस्था डॉक्टर आंबेडकर:**

मला असे सांगण्यात आले की स्वातंत्र्य,  समता व बंधूतेशी अनुरूप अशा धर्म तत्त्वासाठी बाहेरच्या मार्गांनी उसनवारी करण्याची आवश्यकता नसून ती तत्त्वे तुम्ही उपनिषदांततून काढू शकाल.**- डॉक्टर आंबेडकर.**

हिंदू समाज हा जेव्हा जातीविरहित समाज बनेल तेव्हाच त्याला त्याचे स्वतःचे संरक्षण करण्याइतपत सामर्थ्य प्राप्त होण्याची आशा करता येऊ शकेल, अशा आंतरिक शक्ती वाचून हिंदूंसाठी 'स्वराज्य'  हे गुलामगिरी कडे टाकलेले पाऊल ठरेल.**- डॉक्टर आंबेडकर.**

जात नाही ती 'जात'  असं जे म्हटलं जातं दारुण वास्तव दर्शक आहे.  कारण तिला पाठबळ मिळालं आहे ते धर्माचं, धर्मशास्त्राचं, सनातन्यांच, परंपरांचं, अभिमान आणि अस्मितेचं,  जात सोडून देखील दुष्कर होत चाललं आहे.  कामाची विभागणी म्हणून जातिकडं पाहिलं जातं. जातीनिहाय कामाकडे धर्म म्हणून पाहिलं जातं.  समाजाच्या विविध आवश्यकता पुरवण्यासाठी ची व्यवस्था म्हणून पाहिलं जातं.  जा तिकडे बघण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत,  अनेक असू शकतात.  विधायक आहेत तसेच  विध्वंसकही आहेत.जातीयता वा जातिभेद ही जातीची नकारात्मक बाजू.  जातीची उतरंड हे त्याचंच एक रूप.  जातीभेदाची भयानकता सर्वज्ञात आहे.  पण असे असले तरी ते म्हणतात ना, ' ज्याचं जळतं त्यालाच कळतं'  जातीची दाहकता ज्यांनी प्रत्यक्ष अनुभवली आहे त्यांची जातीबद्दल,  जाती व्यवस्थेबद्दलची मत अर्थातच स्वानुभवातून आलेली,  वेदनेतून आलेली म्हणून काहीशी धारदार अशी असतील तर त्यात आश्चर्य नाही.  डॉक्टर आंबेडकर हे याचे ज्वलंत उदाहरण होय.  पण आंबेडकरांची जातिव्यवस्थेचे बद्दलची मते ही केवळ जिवनानुभवातून  आली नाहीत,  तर या मतांतून त्यांचे समाजशास्त्र, इतिहास,  धर्मशास्त्र आदींचे सखोल अध्ययन दिसून येते.

त्यामुळेच आंबेडकरांच्या विचारांनी मध्ये संदिग्धता नाही तर स्पष्टता,  भावना विषयच नाही तर तर्क कुशलता दिसून येते.  आंबेडकरांनी जातीची अनावश्यकता व भयानकता जगासमोर मांडली ती ऐतिहासिक आणि वर्तमानातील घटनांच्या संदर्भासहित. पण एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर जाती विध्वंसनांसाठी ठोस उपाययोजनांची तरतूदही त्यांनी केली. जात, जातिभेदनष्ट करण्यासाठी चे जे काही प्रयत्न सर्व स्तरातील लोकांकडून झालेत त्याची आंबेडकरांनी दखल घेत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलीच पण तोवर असे

या संदर्भातील उपाय कसे तात्पुरते, जुजबी आणि कधी-कधी जातिव्यवस्थेला पुन्हा नव्याने, नव्या स्वरुपात टिकवणारे आहेत हेही दाखवून दिले.

डॉक्टर आंबेडकरांची जातीविषयक मते ही त्यांच्या भाषणांतून व्यक्त झालेली आहेत. पैकी 'ॲनिहीलेशन ऑफ कास्ट' हे आंबेडकरांचे असेच एक भाषण पडल हे न झालेले भाषण आहे. १९३६ मध्ये लाहोरच्या जात-पात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेसाठी आंबेडकरांनी हे तयार केले होते, परंतु या भाषणात व्यक्त झालेली मते परिषदेला मानवणार नाहीत या कारणास्तव स्वागत समितीने रद्द केले होते. या नंतर पब्लिश झालेल्या या पुस्तकात आंबेडकरांनी जात काय आहे, तिचा उगम, जातीव्यवस्था, जातिभेद निर्मूलनासाठीचे अनेकविध प्रयत्न आणि जातीचे मुळासकट उच्चाटन करण्याच्या उपाययोजनांची सविस्तर मांडणी केली आहे.

**जातीव्यवस्था:**

आंबेडकरांच्या मते हिंदू धर्मात असणारी जात ही जन्मजात अशा स्वरूपाची आहे. श्रमाचे विभाजन केले आहे असे म्हटले जाते. पण या ठिकाणी फक्त समाजाचेच नाही तर श्रमिकांचे विभाजन केलेले आढळते. हे विभाजन साधारण असून जलबंद कप्प्यांप्रमाणे (Water tight Compartment) आहे. यामध्ये एकास दुसऱ्याचा व्यवसाय करण्याची व्यवस्था नाही आणि मुभाही नाही. जातींमध्ये समानता नसून उतरंड आहे. या उतरंडीमुळे वरच्या श्रेणीत असणाऱ्यांमध्ये जातीय अभिमान आहे तर इतर जाती धान बद्दल तेढ, तिरस्कार व हलकेपणाची भावना आहे. आंतरजातीय विवाह होत नाही व आंतरजातीय सहभोजने सुद्धा होत नाही. क जात दुसऱ्या जातीपासून कायमची दूर राहील अशी पद्धतशीर रचना केलेली आहे. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य या जाती व्यवस्थेत नाही, व्यवसाय बदलण्याची मोकळीकही नाही. परिस्थितीनुसार व्यवसाय बदलता येत नसल्याने तोच तो व्यवसाय करणाऱ्यांवर बऱ्याचदा उपासमारीची वेळ येते. त्यामुळे बेकारीच्या कारणांपैकी जातिव्यवस्था हे एक महत्त्वाचे कारण आहे.

आंबेडकर म्हणतात, आईवडीलांचा सामाजिक दर्जा जातीवरून निश्चित होतो, गुणवत्तेवरून नाही. जातीव्यवस्थेत श्रमांचे विभाजन हे गुणवत्तेवर, क्षमतेवर वा आवडीवर अवलंबून नसून जन्मावर आधारित असल्याने व्यक्तीच्या कलागुणांना, क्षमतांना त्यामध्ये जागा नाही.

माणूस ज्या जातीत जन्मला त्या जातीला दिलेली कामे करणे हे त्याला त्याच्या दहिवा वरून मिळाले आहे, असे समजले जाते, व तसे बिंबवल्या जाते.

जातीव्यवस्थेत असणारी श्रेणीबद्धता ही जातीय श्रेष्ठ-कनिष्ठत्वास कारणीभूत आहे. प्रत्येक जात स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानण्यात धन्य मानते. अशा प्रकारे आंबेडकरांच्या मते, जन्माद्वारे प्राप्त होणारे अनेक व्यवसाय हिंदूंनी तुच्छ मानलेले आहेत. आला का त्याचा परिणाम या व्यावसायिकांच्या मनावर होतो. म्हणून आंबेडकरांच्या मते जातीव्यवस्था ही घातक व्यवस्था आहे.

**वर्णव्यवस्था:**

खरंतर जातिव्यवस्थेचे मूळ म्हणून आंबेडकर वर्ण व्यवस्थेकडे पाहतात. वर्णव्यवस्थेचे मध्ये चार वर्ण असल्याने यास चातुर्वर्ण्य असे म्हटले जाते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रअशी ही वर्णे असून यामध्ये कामांची विभागणी केलेली आढळते. ज्ञानग्रहण व ज्ञानदान हे ब्राह्मणांचे काम, संरक्षण करणे, राजकारभार पाहणे क्षत्रीयांचे कार्य. शेती, व्यापार उदिम इत्यादी वैश्य वर्णाची कामे असून त्रैवार्णिकांना सेवा पुरविणे हे शूद्रांचे काम समजले जात असे. चारही वर्णे जन्मावर नाहीतर गुणांवर व कर्मांवर आधारित असल्याचे सांगितले जाते. आर्य समाजाची मंडळी चारहजार जातींपेक्षा या चार वर्णांना आपला समाज संघटनेचा आदर्श मानतात.

आंबेडकरांना मात्र वर्णव्यवस्था ही गुणांवर आधारित होती जन्मावर नाही हे मान्य नाही. चातुर्वर्ण्यावर ते भावनात्मक नाहीतर तार्किक हल्ला करतात. चातुर्वण्यांमध्ये कशी एकमेकांचा व्यवसाय करण्याची बंदी होती जर एखाद्याने असा इतरांचा व्यवसाय केल्यास विशेषतः शूद्र वर्णाने, त्याच्यासाठी कशी धर्मशास्त्रात शिक्षेची तरतूद करण्यात आली होती याचा संदर्भ ते देतात. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत स्त्रियांचा विचार केलेला आहे का ? असा प्रश्न ते उपस्थित करतात. मॅनेजर पुरुषाला म्हणजे तिच्या पतीला जन्माने मिळालेला व्यवसायच करावा लागत असेल तर चातुर्वण्य गुणांवर आधारित अशी व्यवस्था होती, या मतास अर्थ उरतं असल्याचे ते नमूद करतात.

**जातीचे दाहक रूप:**

जातिभेद व त्यातून निर्माण झालेली उच्च-नीचता याची काही उदाहरणे आंबेडकर देतात.

पेशवे काळाची स्थिती ते दर्शवितात. आंबेडकर म्हणतात हिंदू समाजव्यवस्थेने पंच अंश असणाऱ्या देशातील जनतेला अस्पृश्य (Untouchable) बनवले आहे. पेशवे काळात या अस्पृश्यांना चुकून स्पर्श होऊ नये म्हणून व आपण विटाळले जाऊ नये म्हणून त्यांच्या ओळखीस्तव त्याला काळा दोरा गळ्यात मनगटात बांधण्याचे सांगितले जायचे. रस्त्यावरून जाताना पाऊल उमटू नये म्हणून कमरेला खराटा बांधला जायचा.

अस्पृश्ययाने रस्त्यावर थुंकले तर विटाळ होईल म्हणून त्याच्या गळ्यात मडके बांधले जायचे, जेणेकरून तो मडक्यात थुंकेल

मध्यभारतातील बलाई नावाच्या अस्पृश्य जमातीवर लावलेल्या कठोर निर्बंधांचा आंबेडकर उल्लेख करतात. कोणते कपडे घालावे, काय करावे, काय करू नये यासंदर्भात निर्बंध होते. निर्बंध मान्य नसतील तर गावाबाहेर काढणे. असे प्रकार होत होते. शिक्षणाची सुद्धा बंदी होती.

गुजरात मधील काही घटनांचा संदर्भ देत अस्पृश्यांनी धातूची भांडी वापरू नये एवढेच नाही तर सवर्णांचा सारखे मिष्ठान्न, तूप बगैर यांनी युक्त भोजन खाणे व खाऊ घालने मुजोरपणाचे आहे, असे समजणाऱ्या वर्गाच्या मानसिकतेवर आंबेडकरांनी प्रकाश टाकला.

स्वतः आंबेडकरांना शिक्षण घेत असताना, नोकरी करत असताना पदाने कमी असलेल्या सवर्णांकडून मिळालेली वागणूक सुद्धा याचे उदाहरण आहे.

त्यामुळे आंबेडकर म्हणतात, जातिव्यवस्थेने हिंदूंना विघटित केले व अनैतिक बनवले आहे. जाती पद्धती सामूहिक कृतीला प्रतिबंध करते आणि सामूहिक कृतीला प्रतिबंध केला गेल्यामुळे तिने हिंदूंना एकात्मिकृत जीवन जाला गेली आणि स्वजनांविषयी जाणीव असलेला एक समाज होण्यास प्रतिबंध केला आहे. भावी पिढ्यांबद्दल काळजी व्यक्त करताना ते म्हणतात की, जातीचे अस्तित्व आणि तिची जाणीव व येत्या पिढ्यांमध्ये पूर्व ग्रहाचे वातावरण निर्माण करील व त्यातून सामाजिक ऐक्याला तडे जातील.

जातीला साधन बनवून उच्च जातीतील हिंदूंनी निम्न समजल्या जाणाऱ्या जातींचा सांस्कृतिक स्तर सुधारण्यास अडथळा आणला आहे. सुधारणे विरुद्ध जात हे सनातन्यांच्या हातातील हत्यार बनले आहे.

एवढेच नाही तर आंबेडकर पुढे असेही म्हणतात की, हिंदूंनी आपल्या जातीतील हितसंबंधांना महत्व देऊन देशद्रोह केला आहे.

**जातिव्यवस्थेचे समर्थन:**

जात चांगली आहे असे म्हणणारे व त्यासाठी युक्ती वादक करणारेही आहेत. श्रमविभाजन म्हणून जात आवश्यक असल्याचे मत मांडले जाते. त्यानुसार ते म्हणतात की, कुठल्याही सुसंस्कृत समाजात श्रमविभाजन जर आवश्यक असेल तर जाति प्रथेमध्ये गैर काही नाही. आंबेडकर याला नाकारताना हे समाजाचेच नाही तर श्रमिकांचे ही विभाजन असल्याचे दाखवून देतात.

जीवशास्त्रीय दृष्ट्या वंशवृद्धी व रक्तशुद्धी याची जपणूक करणे हा जातीचा उद्देश असल्याचे म्हटले जाते. यासंबंधी श्री डी. आर. भांडारकर यांचा दाखला देत आंबेडकर म्हणतात, शुद्ध वंशाची माणसे कोठेच अस्तित्वात नसून जगातील सर्व भागांमध्ये सर्व वंषांचे मिश्रण झालेले आहे. याच बरोबर ते म्हणतात की, ' जे शास्त्रज्ञ शुद्धीवर विश्वास ठेवतात ते शास्त्रज्ञ देखील वेगवेगळे वंश हे माणसांच्या वेगवेगळ्या जाती घडवितात असे खात्रीपूर्वक सांगत नाही.

**जातीचे विध्वंसन :**

जाती नाशासाठी जुजबी उपाय कुचकामी ठरतात म्हणून त्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात असे आंबेडकर म्हणतात. पोट जाती चा नाश केल्याने जात नष्ट होईल असे म्हणणे योग्य नसून त्याने जाती अधिक बळकट बनतील व असा उपाय अव्यवहार्य आहे, असे ते म्हणतात, तर अंतरजातीय भोजने हा जातीभेद अन्नाचा अपुरा उपाय असून सह भोजनातून जातीची जाणीव व नाहीशी न झाल्याचा अनुभव ते सांगतात.

जाती नाशाचे दोनच उपाय प्रभावी असल्याचे आंबेडकर म्हणतात

१. आंतरजातीय विवाह

२.धार्मिक सुधारणा

आंतरजातीय विवाहाने रक्ताची नाती निर्माण होऊन शत्रुत्व, वेगळेपण नाहीसे होईल म्हणून विवाहांची अशा हिंदू समाजाला अत्यंत आवश्यकता आहे असे आंबेडकर म्हणतात.

धार्मिक सुधारणांची गरज व्यक्त करताना ते म्हणतात की, हिंदू अमानुष आहेत म्हणून जात चाळत नसुन त्यांच्यामध्ये ती धर्माने बिंबवली आहे. म्हणून धर्म शास्त्रांच्या पावित्र्यावरील श्रद्धा नष्ट करणे आवश्यक आहे. बुद्ध, गुरुनानक यांनीही शास्त्र प्रामाण्य नाकारले आहे.

जात नष्ट करण्याचे उपाय सांगून आंबेडकर थांबत नाहीत. तर आदर्श समाज कसा असावा यावरही त्यांनी मत व्यक्त केले आहे. आंबेडकरांच्या मते स्वातंत्र्य, समता व बंधूता यावर आधारीत असलेला समाज हाच आदर्श समाज आहे. असा आदर्श समाज निर्माण करण्यासाठीचा विचार उपनिषदांत सांगितलेला आहे असे आपणास कळाले असल्याचे ही आंबेडकर म्हणतात.स्वातंत्र्य, समता व बंधुता त्याची तत्वे उपनिषदांत मिळतात, असे आपणांस कळाले असल्याचे आंबेडकर आवर्जून सांगतात.

*****

# ३

## न्यायिक युद्ध आणि शांततावाद

**घटक रचना**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ युध्दाचे दोन प्रकार न्याय आणि अन्याय

३.३ युध्द आणि नीतिमत्ता

३.४ न्यायिक युध्दाची तत्त्वे

३.५ Jus ad bellum (नैतिकदृष्ट्या युध्द कसे लढले गेले पाहिजे ?)

३.६ Jus in bello (लष्कराचे युध्दात आचरण कसे असावे ?)

३.७ Jus Post Bellum (युध्द समाप्तीनंतर कशाप्रकारे शांती प्रस्थापित करावी ?)

३.८ शांततावाद (Pacrbism)

३.९ शांततेची नीतीमिमांसा

३.१० शांततावादाचा विरोध

३.११ सारांश

३.१२ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

### ३.० उद्दिष्ट्ये

१) न्याय आणि अन्याय युध्दाचे प्रकार समजून घेता येतील.

२) युध्द आणि नीतिमत्ता ह्यातील संबंध लक्षात येईल.

३) न्यायिक युध्दाची तत्त्वे समजून घेता येतील.

४) शांततावाद म्हणजे काय ? त्याचा अभ्यास करता येईल.

### ३.१ प्रस्तावना

मानवी जीवन संघर्षातून विकसित होत असते. परंतु, अशा संघर्षातूनच अनेक विध्वंसही घडून येतात. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत जगावर अनेक युद्धाचे प्रसंग उध्दभवले काही युद्धे काही प्रदेशापुरती मर्यादित असतात, तर काही जागतिक स्वरूपाची असतात. मर्यादित युद्धे भारत - पाकिस्तान, अमेरिका - इराक, इराण - इराक, भारत - चीन, अमेरिका - अफगाणिस्तान, सीरिया- पॅलेस्टिन अशी होती, तर पहिले आणि दुसरे महायुद्ध जागतिक पातळीवर लढले गेले.

धर्म मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे म्हणून मानवी समाजाच्या संस्कृतीचा इतिहास धर्मभावनेनेच समजतो. आपल्याला असे हि म्हणता येईल कि, जागतिक धर्म आपल्याला मानवाच्या प्रगतीचा, पराक्रमाचा आणि संस्कृतीक घडामोडीचा अर्थ समजण्यास मदत करते. हिंदू, बौद्ध, जैन धर्माच्या अभ्यासाने भारतीय संस्कृती, ख्रिश्चन धर्माने युरोपीय संस्कृती आणि इस्लाम धर्माने अरबस्थानातील संस्कृती समजते.

चांगल्या गोष्टींचे संरक्षण करण्यासाठी जे लढले जाते ते धर्मयुद्ध होय. अन्याय सहन करणे हे गैर आहे. नैतिकतेची लढणे म्हणजे धर्मयुद्ध होय. कारण धर्म हे बाहेरून लादलेले एखादे कर्तव्य नसून व्यक्तीच्या आणि समाजाच्या गरज भागविण्यासाठी आणि सामाजिक व नैतिक स्वास्थ्यासाठी आखून दिलेली व्यवस्था होय, म्हणून धर्माचा समाजमनावर होणार परिणाम असे म्हणण्यापेक्षा लोक व्यवहाराकरिता किंवा लोकहिताकरिता धर्म अस्तित्वात आला आहे म्हणणे अधिक उपयुक्त होईल.

## ३.२ युध्दाचे दोन प्रकार न्याय आणि अन्याय(Just and Unjust War):

"एका देशातील दोन गटामधील किंवा दोन देशांमधील उघड पोश्टर संघर्ष म्हणजे युद्ध होय." मानवी जीवनाचा सर्वसाधारण विकास होण्यासाठी युद्ध आवश्यक आहे. शांतीवादी सिद्धांतानुसार युद्ध हे कोणत्याही परिस्थितीत अनैतिक असून सर्व लवकर आणि शशास्त्रे नाहीशी करावीत .

**न्याय युद्ध:**

सेंट ऑगस्टीन म्हणतात ख्रिस्ताने दिलेल्या प्रेमाच्या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीने स्वरक्षणार्थ देखील दुसऱ्याला ठार मारू नये. परंतु शांतता रक्षणासाठी युद्ध करण्याचा अधिकार राज्यकर्ता आहे. अतिशय गंभीर आक्रमण झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून युद्ध करावे. ते युद्ध देखील चांगुलपणाने द्यावे, तत्त्वाने व शांततेचे उद्दिष्ट ठेऊन लढविले गेले पाहिजे. प्रत्येक राष्ट्राला अंतिम पर्याय म्हणून आपल्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी किंवा आपल्या स्वतःच्या एखाद्या मूलभूत हक्कांचा इतर राष्ट्रांनी भंग केला असता मूलभूत हक्क पुन्हा मिळवण्यासाठी संरक्षण युद्ध करणे योग्य आहे.तरच तेन्याय ठरेल.

**न्याय युद्धांच्या अटी.**

१) युद्ध योग्य अशा सत्ताधाऱ्यांकडून घोषित झालेले पाहिजे.

२) ते उचित अशा कारणासाठी असले पाहिजे.

३) अगदी शेवटचाच पर्याय म्हणून युद्ध करावे.

४) माणुसकी राखून काढले गेले पाहिजे.

**पोप जॉन २३ म्हणतात कि,**

१) संरक्षण युद्ध हे न्याय युद्ध ठरविता येईल कारण मानवी समाजाच्या उत्कर्षासाठी काही हक्क इतके महत्त्वाचे असतात कि त्याच्यावर झालेल्या अन्याय आक्रमणापासून त्याचे संरक्षण करणे हे निःसंशय सर्वथा समर्थनीय आहे.

२) पाशवी हिंसाचाराला आणि सद्सद्विवेक बुद्धीच्या अभावास मुक्त वाव मिळेल.

३) इतर सर्व वाजवी मार्ग संपुष्ठात आले असले पाहिजेत आणि युद्ध हाच शेवटचा मार्ग म्हणून उरला असला पाहिजे.

४) युद्धाचा मार्ग अवलंबिला यशाची खरीखुरी खात्री असावी.

५) बळाचा वापर मर्यादित असावा.

६) युद्धामध्ये विविध गोष्टींचे प्रामुख्याने हिंसेचे तारतम्य राखले जावे.

**जिन्हिवा करार.**

१) निशस्त्र व्यक्तींना हेतुपूर्वक ठार मारू नये.

२) जखमी व्यक्तींना, युद्धकैद्यांनां व नागरिकांना क्रूर वागणूक देऊ नये.

३) अनावश्यक विध्वंस टाळला जावा.

४) निरपराध लोकांची हत्या करू नये.

५) बिगर सैनिकांची निरपराधीपणे गणना करावी.

धर्माचा विचार केला तर कोणताच धर्म अखिल किंवा इतर कोणत्याही युद्धाचे समर्थन करत नाही. अधिक शस्त्राने प्रत्यक्ष संहार करणे हे त्या संहाराचे परिणाम सहन करण्यापेक्षा जास्त वाईट आहे. हक्काचे अतिगंभीर परिणाम झाले असताना युद्धाचे व अणुयुद्धाचे समर्थन न्याय ठरणार नाही.

अन्याय युद्ध आण्विक युद्ध लढणाऱ्या अशक्यतेमुळे जगातील मोठी राष्ट्रे सध्या शीतयुद्धाचा पुरस्कार करताना दिसतात. हे शीतयुद्ध चेतावणी देण्याचा आणि द्वेष पूर्ण कृत्यांचा पद्धतशीर खेळ असून त्यात कोणताही विधायक दृष्टिकोन नाही. विघातक कृत्यांच्या माध्यमातून दृष्टिकोन नाही. विघातक कृत्यांच्या माध्यमातून समोरच्याचे नुकसान करून स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न केला जातो. हे अन्याय युद्धाचे प्रतीक आहे. आधुनिक भारतात महात्मा गांधीनी अत्यंत यशस्वीपणे अहिंसेला आवाहन केले आहे. परंतु, त्यांनी देखील मित्र राष्ट्रांनी जर्मनीविरुद्ध पुकारलेल्या दुसऱ्या महायुद्धातील संरक्षणात्मक युद्धाला नैतिक पाठिंबा दिला. संरक्षणात्मक युद्ध यशस्वीरीत्या लढलेला भारत, आंतरराष्ट्रीय संबंधात शांतता आणि सहिष्णुता सर्व प्रकारे वृद्धिंगत करीत असतानाच महात्मा गांधींचा मर्यादित युद्धाचा सिद्धांत संमभ्रपणे स्वीकारून त्यांची शिकवण अनुसरीत आहे.

**युद्धाची अपरिहार्यता :**

मानवजातीला युद्ध आवश्यक आहे हा एक अज्ञानातून आलेला किंवा आक्रमणाचे समर्थन म्हणून सावरून मांडलेला चुकीचा सिद्धांत आहे. लढाईविना देखील प्रगती होऊ शकते हे समजणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, सागरी संशोधन अवकाश संशोधन वैद्यकीय शाश्त्र तंत्रज्ञान साहित्य, क्रीडा, कला अशी कितीतरी क्षेत्रे आहेत, कि जिथे मानवी पराक्रमाला वाव आहे.

आज जगातील सर्व राष्ट्रांचा मिळून सरंक्षणावर जितका खर्च होतो; तो कित्येक अब्ज डॉलरमध्ये आहे. एवढा पैसे माणसे मारण्यासाठी व माणसांनीच निर्माण केलेले सुंदर जग उध्वस्त करण्यासाठी कोट्यवधी प्रशिक्षित माणसे गणवेश धारण सरून शश्त्रे हातात घेऊन आहेत, हे कितपत योग्य आहे ह्याचा विचार होणे नक्कीच गरजेचे आहे.

जगातील रोगराई आणि दारिद्र नाहीसे करण्यासाठी, माणसाला अधिक मुखी आणि संपन्न जीवन देणारे नवसंजीवन संशोधन करण्यासाठी हे वित्तबळ आणि मनुष्यबळ उपयोगी पडेल, पण हे नजीकच्या काळात घडलंच ह्याची तिळमात्र अपेक्षा नाही कारण आजतागायत सर्वत्र राजकीय क्षितिजावर युद्धाचे स्वतच दिसत आहे.

युद्ध म्हणजे एका समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर किंवा समाजावर जबरदस्तीने केलेली कुरघोडी कि ज्यामध्ये हिंसा, हत्या करणे या गोष्टींचा समावेश होतो. युद्ध म्हणजे वास्तविकता जाणून बुजून केलेले दोन समुदायातील किंवा राष्ट्रातील संघर्ष होय. काही युद्धे देशांतर्गत लढली जातात, त्यांना गृहयुद्ध म्हणून देखील संबोधिले जाते.

कार्टव्हान युद्धाचा पुरस्कार करणारे तत्वज्ञानी म्हणून ओळखतात. त्यांच्यानुसार "युद्ध म्हणजे अशी क्रिया जी दुसऱ्याला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास भाग पडते." युद्धाचे निरनिराळे प्रकार आहेत. जसे टोळी युद्ध, व्यापारी युद्ध, दहशतवादाविरुद्ध युद्ध, शीत युद्ध इत्यादी तसेच जे लोक राजकीय आकांक्षा बाळगतात त्यांच्यामध्ये असते. युद्ध हे नेहमी हिंसकच असते. युद्ध हे केवळ जमिनीचा ताबा मिळविण्यासाठी देखील असते किंवा आर्थिक लाभासाठी किंवा संस्कृतीचे जतन करण्यासाठी देखील लढले जाते.

## ३.३ युद्ध आणि नीतिमत्ता

युद्धाच्या हिंसक परिणामांमुळे काही नैतिक प्रश्न उपस्थित होतात. दुसऱ्याची हत्या करणे संपत्तीचा विनाश करणे आणि त्यासाठी बाळांचा वापर करणे ह्याला काही नैतिक अधिष्ठान आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. जर एखाद्याला जीवाशी मारणे हे अयोग्य आहे तर युद्ध योग्य कसे ठरते, एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रातील अनेक लोकांचे युद्धात जीव घेते त्याचे समर्थन कसे करता येईल. कधीकधी युद्ध हे शहाणपणचे व आवश्यक असते तरीपण ते नीतीला धरून आहे का?

युद्धाला पुढील तीन पारंपरिक आधारित तत्वे आहेत असे मानले जाते.

१) न्यायावर आधारित युद्ध

२) शांतीसाठी आधारित युद्ध

३) वास्तवावर आधारित युद्ध

काही वेळा एखाद्या देशाला युद्ध करण्याचा अधिकार असतो. कारण त्या युद्धाचे कारण न्याय असते व त्यांची कृती नीतीला धरून असते. ह्यात वाईट गोष्टींचा नॅश होतो आणि अन्याय हा नीतीला धरूनच मानला जातो. या सिद्धांतात एक पक्ष अनीतीचा व आत्मघाती मार्गाने चालते असे गृहीत धरले जाते. दुसरा पक्ष त्याला सुधारू इच्छितो. न्याय युद्धाचे पुरस्कर्ते युद्धाच्या मार्गाने गुन्हा करणाऱ्यास शिक्षा मिळते असे मानतात, परंतु प्रत्येक शिक्षेसाठी नियम असायला हवेत, शिक्षा किती असावी ह्याला देखील मर्यादा हवी, या युद्धाचा परिणाम दोन्ही पक्षांना शांतीचा मार्ग स्वीकरण्यास प्रवृत्त करतात.

न्याय युद्धाची मूळ संकल्पना प्लेटो व ॲरिस्टोटल यांच्या लिखाणात आढळते व त्यास सुरुवातीच्या काळातील ख्रिश्चन विचारवंतांनी विशेषकरून ऑगस्टइन आणि ऍक्वेनस व नंतरच्या काळामध्ये गॉरटॉस यांनी चालना दिली.

न्याय युद्धाचे परंपरेनुसार काही नियम आहेत व त्याच्यावर आधारित काही जागतिक नियम करण्यात आले आहेत. त्यास व ह्ग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाची मान्यता आहे. तसेच जिन्हिवा कन्वेन्शनमध्ये मान्यता दिली आहे.

## ३.४ न्यायिक युद्धाची तत्वे

न्यायिक युद्धाचा विचार मुख्यत्वे खालील तत्वे समोर ठेऊन केली गेली आहेत.

१) Just ad Bellum कोणत्या कारणांनी लष्करी साधनांचा वापर केला जावा आणि युद्धाला प्रारंभ करण्याची करणे काय?

२) नैतिक दृष्ट्या युद्ध कसे लढले गेले पाहिजे?

३) Jus and Bello लष्कराचे युद्धात आचरण कसे असावे?

४) Jus post Bellum युद्ध समाप्तीनंतर कशा प्रकारे शांती प्रस्थापित केली जावी?

## ३.५ Jus ad bellum (नैतिकदृष्ट्या युध्द कसे लढले गेले पाहिजे ?)

नैतिक दृष्ट्या युद्ध कसे लढले गेले पाहिजे, युद्धाचा प्रारंभ करण्याची कारणे कोणती?

युद्धाच्या न्यायाची तत्त्वे सामान्यतः न्याय करणे असते, अंतिम पर्याय असणे, योग्य अधिकाराद्वारे घोषित करणे योग्य हेतू असणे यशाची संधी असणे आणि शेवटी वापरलेली युद्धाची साधने प्रमाणात वापरणे. न्याय कारण असणे हि जस ऍड बेलमाची सर्वात महत्त्वाची आणि निर्विवाद अट आहे. बहुतेक सिद्धांतवादी असे मानतात कि, आक्रमक कृत्ये सुरु करणे अन्यायकारक आहे दुसऱ्या राष्ट्राला किंवा देशाला स्वतःला बचावाची संधी देणे गरजेचे आहे. युद्ध हा नेहमीच शेवटचा उपाय असावा. न्याय युद्ध करणाऱ्या राष्ट्राने ते न्यायाच्या कारणासाठी लढले पाहिजे. कांटच्या मते चांगला हेतू असणे हि नैतिककृतीची एकमेव अट आहे.

न्याय कारण आणि योग्य हेतू दिल्यास न्याय युद्ध सिद्धांत असे पतपादन करतो कि यशाची वाजवी संभाव्यता असणे गरजेचे आहे. शेवटी युद्धात वापरलेली साधने प्रमाणात असावीत

आणि त्यानुसारच त्याचा शेवट व्हावा. एकंदरीतच जस्ट अँड बेलम मध्ये अधोरेखित केलेली तत्वे युद्धात उपयुक्त मार्गदर्शकही आहेत.

Jus in bello (लष्कराचे युध्दात आचरण कसे असावे ?)

## ३.६ Jus and Bello लष्कराचे युद्धात आचरण कसे असावे?

युद्धातील न्याय आचरणाचे नियम भेदभाव आणि समानता या दोन तत्वांच्या अंतर्गत येतात. भेदभावाचे तत्व युद्धात कायदेशीर लक्ष्य कोणते याच्याशी संबंधित आहे तर अनुपातीकतेचे तत्त्व नैतिकदृष्ट्या किती योग्य आहे ह्याचा विचार करते. युद्धात जबाबदारी कोणाची आहे याची तपासणी करते.

व्हॉलझर त्याच्या न्याय आणि अन्यायकारक युद्धांमध्ये (१९७७) ह्या पुस्तकात असा दावा करतो, कि ओळख नसल्यामुळे शत्रू राष्ट्राला निष्पाप लोकांना मारण्याचा अधिकार मिळत नाही. शत्रू सैनिकांना ओळखणे हि जबाबदारी त्या सरकारवर किंवा राष्ट्रावर असते, म्हणूनच काही अनिश्चित असेल तर हल्ला होता काम नये. त्यामुळे राजकीय नेत्यांवर आणि लष्करावर नैतिक जबाबदारी असते कारण युद्धात नागरी वसाहतींवर हल्ले होता काम नयेत.

न्याय आचरणाचे दुसरे महत्त्वाचे तत्व म्हणजे कोणतीही आक्षेपार्ह्य कृती इच्छित उद्दिष्टांच्या काटेकोर प्रमाणात असावीत. ह्या तत्त्वात विनाश आणि जीवितहानी कमी करण्यासाठी युद्धाची व्याप्ती आणि हिंसाचार कमी करणे आवश्यक आहे. समानुपतिकता आणि भेदभावाची तत्त्वे युद्धाच्या हिंसाचार आणि श्रेणीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करतात. ह्या तत्वानुसार युद्धातील सैनिक तसेच युद्ध पुकारलेल्या नेत्यांना त्यांच्या कृतीसाठी जबाबदार धरले जाणे गरजेचे आहे आणि त्यांच्या कृती नैतिकतेला जोडणे गरजेचे आहे.

युद्धाच्या कृत्यांची जबाबदारी जस्ट अँड बेलम तसेच जस्ट अँड बेलोच्या तत्त्वांशी संबंधित आहेत. कारण युद्धात जाण्याच्या औचित्यामध्ये जबाबदारी तसेच युद्धात आदेश दिलेल्या आणि वचनबद्ध कृत्यांचा समावेश होतो. लष्करी नीतिमत्तेचे पुनरावलोकन करते.

## ३.७ Jus Post Bellum युध्द समाप्तीनंतर कशाप्रकारे शांती प्रस्थापित करावी ?

युद्धाच्या समाप्तीनंतर तीन शक्यता उदभवतात. एकतर सैन्य पराभूत झाले आहे किंवा विजयी झाले आहे. किंवा युद्ध विरामास सहमती दर्शविली गेली आहे. त्यामुळे वरील कोणत्याही परिस्थितीत न्यायाची तत्त्वे लागू केली जाऊ शकतात.

निरपराध किंवा गैरव्यक्तींवर शिक्षा लादणे टाळण्यासाठी भेदभावाचे तत्त्व लागू करावे, पराभूत राष्ट्रांचे हक्क किंवा परंपरा आदरास पात्र आहेत, विजयाचे दवे युद्धाच्या स्वरूपाच्या प्रमाणात असावेत, नुकसान भरपाईचे दावे भेदभाव आणि अमिपतिकतेच्या तत्त्वानुसार बदलले पाहिजेत. हल्ले झालेल्या प्रदेशातील (नागरी वस्ती ) लोकांचे पुनर्वसन करण्याची गरज आहे, युद्धबंदीशी होणार व्यवहार देखील विचारात घेतला गेला पाहिजे. युद्ध जरी निर्णायक असले तरी शांतता वादातील तत्त्वांचा वापर करूनच युद्ध विरामाचा आलेख

तयार केला जावा कारण युद्धे जीवन आणि पर्यावरण दोन्ही नष्ट करतात. त्यामुळेच युद्ध मानवाच्या नैतिक विवेकाला धक्का देते.

## ३.८ शांततावाद (Pacifism)

शांतीप्रिय लोक युद्धाला नैतिकदृष्ट्या विरोध करतात. कोणालाही जीवे मारणे कुठल्याही सबबीसाठी मारणे अयोग्य आहे. याला त्यांचा संपूर्ण किंवा मर्यादित विरोध आहे.

न्यायिक युद्धाच्या एकदम विरोधात जाऊन युद्धाच्या भयामुळे शांती टिकून राहते याचा विचार करणारा विचार त्यांच्यामताप्रमाणे, युद्धापासून होणारी हानी आणि त्यासाठी लागणार खर्च हा केव्हाही लाभदायक नसतो. त्यांच्यामते युद्धाच्या नावाखाली केलेल्या गोष्टी मुळातच चुकिच्या आहेत व युद्धाच्या सिद्धांताला धरून नाहीत आणि जीवे मारणे कोणत्याही कारणास्तव अयोग्य आहे.

## ३.९ शांततेची नीतीमिमांसा

शांततावादी विचार बाळगणारे लोक ह्या नितीलाच विरोध करतात. नीतितत्त्वावर आधारलेले युद्ध नसते आणि त्यामुळेच ह्या विचाराचा त्याला विरोध आहे. ते प्रत्येक न्यायिकाला हा विरोध करण्याचा अधिकार प्रदान करते. राज्याच्या किंवा राष्ट्राच्या विरोधात युद्ध हे नेहमी नैतिकदृष्ट्या मानव जातीच्या अस्तित्वास धोका निर्माण करते.

शांततावादी तत्वाचा आधारच मुळात असा आहे कि ते कोणत्याही परिस्थितीत न्याय मॅनटा येणार नाही आणि हिंसा नीतीला धरून नाही. शांततेचा पुरस्कार म्हणजेच त्याचा उद्देश स्पष्ट करणे हे चुकिचे आहे. त्याचा उद्देश एखादी समस्या शांतीप्रिय मार्गाने सोडवता येते असा आहे. उदाहरणार्थ, महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग, टॉल्स्टॉय, रसेल, फ्रेक्स इत्यादी.

## ३.१० शांततावादाचा विरोध

बालसरच्या मते शांततावादाचा विचार हा उच्च दर्जाची नीती आहे हा विचार वास्तवापासून दूर नेणारा आहे जास्त खोलात शिरले कि असे दिसते कि, ज्या प्रकारे शांतीप्रिय जगाची कामना केली गेली आहे ते तसे सत्यामध्ये असू शकत नाही. कमीत कमी जवळच्या भविष्यकाळात ते शक्य वाटत नाही. सर्व राष्ट्रांनी नीतिमत्तेचे पालन केले पाहिजे. त्यासाठी युद्धाला सुद्धा नैतिक आधार आहे असे मानावे लागेल.

विरोधकांचा असा विचार आहे कि जर जगामध्ये होणाऱ्या जबरदस्तीला आपण विरोध केला नाही किंवा परिणामकारक विरोध केला नाही तर आपण आक्रमक लोकांना सूट दिली असे होईल. डॉपन रिरिसच्या मते, शांततावादी हा विचार वास्तव जगाचा वाटत नाही, कारण राजकारण हे निरनिराळ्या विचार आणि क्रियांचे एकत्र स्वरूप आहे.

शांतीवादानंतर झालेल्या संबंधातील अटी वास्तवावर आधारित असाव्यात आणि त्याची कलमे जाहीर करावीत किंवा प्रसारित करावीत, त्यामुळेच शांततेचा अर्थ नैतिकदृष्ट्या

चांगला विचार करून मानव जातीच्या अस्तित्वास धोका निम्हण होणार नाही ह्याचा विचार करणे होय.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न१. न्याय आणि अन्याय युध्दातील फरक स्पष्ट करा.

प्रश्न२. न्याय युध्द म्हणजे काय ते स्पष्ट करा.

प्रश्न३. युध्द आणि नीतिमत्तेतील संबंध स्पष्ट करा.

प्रश्न ४.न्यायिक युध्दाची तत्त्वे स्पष्ट करा.

## ३.११ सारांश

एका देशातील दोन गटामधील किंवा दोन देशांमधील उघड सशस्त्र

संघर्ष म्हणजे युध्द होय. युध्दाचे दोन प्रकार आहेत.

**१) न्याय युध्द:** यात युध्द चांगुलपणाने, माणूसकी राखून, दयाळू आणि शांततेने लढले पाहिजे.

**२) अन्याय युध्द:** विधातक कृत्याच्या माध्यमातून समोरच्याचे नुकसान करणे.

## ३.१२ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) युध्द म्हणजे काय? ते सांगून युध्दाचे प्रकार स्पष्ट करा.

२) युध्द अपरिहार्य आहे का नाही ते सांगून आपले विचार सविस्तर मांडा.

३) युध्द आणि नीतीमत्तेतील संबंध सविस्तर स्पष्ट करा.

४) न्यायिक युध्दाची तत्त्वे सविस्तर स्पष्ट करा.

५) शांततावाद म्हणजे काय ते सांगून शांततावादाची संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

६) शांततावादाची नीतीमिमांसा ह्या संकल्पनेची चर्चा करा.

७) शांततावादाचा विरोध नैतिक दृष्टिकोनातून स्पष्ट करा.

८) युध्द आणि शांततावाद ह्यातील संबंध स्पष्ट करा.

**टीपा लिहा:**

१) न्याय युध्द

२) अन्याय युध्द

३) युध्द आणि नीतीमत्ता

४) Jus ad bellum (नैतिक दृष्ट्या युध्द कसे लढले गेले पाहिजे ?)

५) Jus in bello (लष्कराचे युध्दात आचरण कसे असावे ?)

६) Jus post bellum (युध्द समाप्तीनंतर कशाप्रकारे शांती प्रस्थापित करावी ?)

७) शांततावाद

८) शांततावादाचा विरोध

*****

# ४

# विविधतेतील सौहार्दता

**घटक रचना**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ बहुसांस्कृतिवाद

 ४.२.१ भिखू पारेखाचा बहुसंस्कृतीवाद

 ४.२.२ स्थलांतरित संस्कृतीच्या समस्या

 ४.२.३ बहुसांस्कृतिक समाजात उदभवणाऱ्या समस्या

 ४.२.४ बहुसांस्कृतिकवादाची चिकित्सा: ब्रायन बेरी

४.३ स्थलांतरीत आणि निर्वासितांच्या समस्या: मायकल डम्मेट

४.४ एडवर्ड सईदचा प्राच्यवाद

 ४.४.१ प्राच्यवाद

 ४.४.२ एडवर्ड सईद

४.५ सारांश

४.६ विद्यापीठीय प्रश्न

४.७ संदर्भ


## ४.० उद्दिष्ट्ये

सांस्कृतिक विविधिचा आदर आणि प्रशंसा करता येईल.

- अद्वितीय सांस्कृतिक आणि वांशिक वारशाची समज वाढेल.
- विविध संस्कृतींमध्ये कार्य करण्यासाठी वृत्ती, कौशल्ये आणि ज्ञान संपादन करणे सुलभ करण्यासाठी उपयोग होईल.
- भिक्खू पारेख यांचे बहुसांस्कृतिकतेवरील विचार समजून घेता येईल.
- निर्वासितांचे हक्क आणि स्थलांतरितांचे हक्क याबद्दल मायकेल डमेटचे विचार जाणून घेता येईल.
- एडवर्ड सैदचा प्राच्यवादाचा सिद्धांत अभ्यासता येईल.

## ४.१ प्रस्तावना

जागतिक स्तरावर एकमेकांशी जोडलेल्या जगात, मतभेदांबद्दल जागरूकता आणि समज विकसित करणे नैतिक आणि व्यावहारिकदृष्ट्या महत्वपूर्ण आहे. विविधता आणि सार्वजनिक

विद्वत्तेबद्दलचे ज्ञान मिळवून, आमचा संवाद आणि एकमेकांशी सहकार्य करणा-या सामाजिक संदर्भाबद्दलची तुमची समज वाढवली जाईल आणि सांस्कृतिक आव्हानांना प्रतिसाद देण्याची तुमची क्षमता वाढेल. या प्रकरणामध्ये आपि बहुसांस्कृतिकितेच्या सांकल्पनेचा विशेषत: भिक्खू पारेख याच्यां या बहुसांस्कृतिकिचा अभ्यास करू, ब्रायन बॅरी यांनी केलेली टीका, मायकेल डम्मेट यांचे निर्वासितांचे हक्क आणि स्थलांतरितांचे हक्क आणि प्राच्यविद्या या संकल्पनेचा एडवर्ड सैदच्या संदर्भात यांचा अभ्यास करू.

## ४.२ बहुसांस्कृतिवाद (MULTICULTURALISM)

बहुसांस्कृतिकवादाचा सिद्धांत समाजांतर्गत विविध सांस्कृतिक समुह तसेच इतर प्रकारच्या लोकांना केवळ मान्यताच देत नाही. तर त्यापैकी कोणाला उत्कृष्ट वा निकृष्ट मानू नये. असे प्रतिपादन करतो.

आज विश्वातिल अनेक देशांमध्ये बहुसांस्कृतिक समाज एकत्रित राहतात. यामध्ये अनेक संस्कृतीतील लोक तसेच स्वत:ला इतरांपासून अलग ठेवणारे समुह सुद्धा मिळून – मिसळून राहतात.

बहुसांस्कृतिकवादाचा सिद्धांत कोणत्याही समुदायातील अनेकविध संस्कृतींना विकसित होण्यास व एकमेकांचा आदर करण्याची भावना विकसित करण्यास प्रेरणा देतो.

बहुसांस्कृतिकवादासाठी दोन स्तरांवर अमलीकरण होते:

१. देशातिल विभिन्न संस्कृत्यांगर्त सहिष्णूता.

२. समान नागरिक मान्यता.

उदा. भारतात सर्व जाति, धर्म, पंथ, प्रांतातिल लोकांना समान दर्जा दिला जातो. भिन्न राज्यतिल भिन्न संस्कृती येथे पाहिल्या जाते. म्हणून भारतात बहुसांस्कृतिक समाज एकत्र राहतो असे म्हटल्या जाते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात USA म्हणजेच संयुक्त राज्य अमेरीकेमध्ये 'बहुसांस्कृतिक' हा शब्द प्रथम वापरात आला. तो यासाठी की यहुदि – अमेरिकी आणि आयरिश समुदायाचा हिस्सा मानलया जावा अर्थात या शब्दाचा प्रयोग संकेत म्हणून झाला. (15 व्या शतकानंतर युरोपिय लोक अमेरिकेत आले. त्यानंतर तेथे बहुसांस्कृतिक समुदाय निर्माण झाला.)

जर एखादया देशात बहुसांस्कृतिकवादाची भावना विकसित होत नसेल तर तो देश छिन्न – विछिन्न होऊन जाईल. युगोस्लाव्हिया हे त्याचे बोलके उदाहरण आहे. बहुसांस्कृतिवाद भावने अभावी युगोस्लाव्हियाचे सात तुकडे झाले.

**भिखू पारिख:**

भिखू पारेख यांचा जन्म १९३५ मध्ये गुजरातमध्ये झाले. प्रथम मुंबई विद्यापीठातून शिक्षण घेतल्यानंतर लंडन स्कूल ऑफ इकानॉमिक्स मध्ये ते संशोधन करतात. भिखू पारिख यांनी

महत्वाची पदे भूषविली. वडोदरा यूनिव्हासिटीचे ते कुलपती होते. ब्रिटेनच्या लार्ड सभेत २००० मध्ये ते आजीवन सदस्य झाले. 'पारिख रिपोर्ट' नावाने त्यांची एक कृती महत्त्वपूर्ण आहे. The Future of Multi-Ethnic Britain.

### ४.२.१ भिखू पारेखाचा बहुसंस्कृतीवाद:

भिखू पारेख संस्कृतीचे तिन लक्षणे मांडतात:

प्रत्येक मनुष्य हा सांस्कृतिकदृष्टया आपल्या संस्कृतीशी बांधलेला असतो. माणसाची ओळख ही त्याच्या संस्कृतीवरुनच होत असते. मनुष्य आपल्या संस्कृतीची पूर्णत : हेटाळणी करु शकत नाही.

१. कुठलीच संस्कृती पूर्णत चांगली वा पूर्णत: वाईट नसते. प्रत्येक संस्कृतीतला आपल्या विकासाची संधी स्वतंत्ररित्या मिळायला हवी. कारण संस्कृती हा व्यक्तिजीवनाचा अविभाज्य भाग आहे.

२. प्रत्येक संस्कृतिला अंतर्गतरित्या लोकतांत्रिक असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर योग्य सुधारणा व बदलास प्रत्येक संस्कृतीने तत्पर असावयास हवे.

कुठल्याही संस्कृतीस टिकून रहायचे असेल तर तिला सर्वसमावेशक, लोकतांत्रिक आणि सुधारणावादी असणं गरजेचं आहे.

भिखू पारिखांच्या मते बहुसंस्कृतिवाद म्हणजे दूसरे- तिसरे काही नसुन या तिन लक्षणातिल परस्पर सामंजस्य होय.

### ४.२.२ स्थलांतरित संस्कृतीच्या समस्या:

स्थलांतरामुळे एक संस्कृती जेव्हा दुसऱ्या सांस्कृतिक समुहास जाऊन मिळते तेव्हा काही समस्या निर्माण होतात. या प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्याने काय उपाययोजना करायला हव्यात याबद्दल पारिख म्हणतात,

१. सर्व सांस्कृतिक समूहांना समान महत्त्व दयावे

२. स्थलांतरित ज्याही देशात जाईल तिथे तिथल्या संस्कृतीशी त्याने जूळवून घ्यायला हवे.

३. यास्तव वैयक्तिक क्षेत्र वा खाजगी क्षेत्रासाठी वेगळी संस्कृती असायला हवी. तर सार्वजनिक क्षेत्रासाठी वेगळी संस्कृती असासला हवी. जसे की, समान नागरिकता संहिता याबाबतीत राष्ट्राच्या नीतीचे सर्वांनी पालन करावे.

### ४.२.३ बहुसांस्कृतिक समाजात उदभवणाऱ्या समस्या:

#### बहुसंख्याक संस्कृतीचे वर्चस्व:

सांस्कृतिक वर्चस्ववादाचा परिणाम वेगवेगळया पातळयांवर होतांना दिसुन येतो. उदा. एखाद्या राष्ट्राची भाषा कोणती असावी, याचा निर्णय घेतांना बहुसंख्यांकाची भाषा तीच

राष्ट्रभाषा बनते. एखादा कायदा बनवतांना सुद्धा सांस्कृतिक वर्चस्ववादाचा प्रभाव दिसून येते. ज्या संस्कृतीचे लोक संसदेत अधिक असतील त्या संस्कृतीनुसार कायदे करणे सोपे होऊन जाते.

सांस्कृतिक समुहांत संस्कृतीच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वावरून संघर्ष निर्माण होतो. याच्या निराकरणार्थ भिखू पारिख Diological Theory चे प्रतिपादन करतात. या सिद्धांतानुसार संस्कृतीअतर्गत व आंतरसांस्कृतिक संवाद घडवून आणला जातो. संवादातूनच समस्यांचे निराकरण होऊ शकते. संवादातूनच समस्येचा उलगडा होतो. प्रत्येकांने आपल्या संस्कृतितील समस्या ओळखून मान्य करुन ती दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. आमच्या संस्कृतीत समस्याच नाही, ही भाषा आंतरसांस्कृतिक संवादातिल अडथळा आहे. तेव्हा उदार अंत:करणाने स्वसंस्कृतीतील समस्या मान्य करून आपापसात समन्वय, सामंजस्य निर्माण केले पाहिजे. कट्टरवादी भूमिकेतून विवाद निर्माण होतात. म्हणून अशी मनोवृत्ती सोडून बदलास खूल्या मनाने तयार असायला हवे. संस्कृतीअंतर्गत समस्या सुद्धा याच मार्गाने सोडवल्या जाऊ शकतात. उदा. एखाद्या संस्कृतीत महिलावर अनन्वित अत्याचार होत असतील तर अशा संस्कृतिला तिच्या सदस्यांनी बदलवायला हवे. नसता त्यातून सांस्कृतिक विनाश ठरलेलाच. प्रत्येक संस्कृतीने आपल्या संस्कृतीतील समस्यापूर्ण भागाचा त्याग करायला हवा. या सिद्धांतास सर्व अल्पसंख्यांकास लागू करता येते. हे फक्त स्थलांतरितापूरते मर्यादित नाही. Minority लोकासाठीही हे उपयूक्त आहे.

जर एखादी संस्कृती स्वत:ला इतर संस्कृतीहून वेगळी करत असेल. तर तिचा आणि इतर संस्कृतीचा संवादच संपतो. अशा प्रकारे एखाद्या संस्कृतीने स्वत:ला तटस्थ करण्याचे कारण म्हणजे त्यांच्या मनातिल साशंकता होय. त्यांना असे वाटत असते की जर आपण इतरांमध्ये मिसळलो आपली संस्कृती नष्ट होईल वा तिची स्वतंत्र ओळख राहणार नाही किंवा ती प्रदूषित होईल.

इतरांच्या संस्कृतीकडून आपणास काही शिकायला मिळेल अशी भावना वृद्धिंगत झाली म्हणजे आंतरसांस्कृतिक संवाद शक्य होईल.

हे मान्य असणे गरजेचे आहे की कुठलीही संस्कृती ही परिपूर्ण नसते. इतरांच्या संस्कृतीकडून आपण काही शिकू शकतो. संस्कृती ही शिकण्याचे एक माध्यम आहे. चांगले विचार कुणाकडून ही येत असतील तर ते स्विकारण्याचे औदार्य आपणाकडे असायला हवे. असेच काही भिखू पारिखांना या ठिकाणी म्हणावयाचे आहे.

भिखू पारिखांच्या मते, एखाद्या देशामध्ये सर्व अल्पसंस्ख्यांकांना, स्थलांतरितांना समान नागरिकता दिल्यानेच केवळ बहुसांस्कृतिकता निर्माण होऊ शकत नाही. तर त्यासाठी समाजाने प्रत्येक संस्कृतीचा स्विकार करणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्कृतीचा आदर करणे गरजेचे आहे, जर एखाद्या संस्कृतीमध्ये आपण कोणीतरी इथल्यापेक्षा वेगळे आहेत असा भाव निर्माण होत असेल तर त्यास बहुसांस्कृतिकता म्हणता येत नाही. बहुसंख्याक आपल्या अनुकूल ध्येयधोरणे अवलंबित असेल तर असा भाव उत्पन्न होणे साहजिक असते. असे म्हटल्या जाते की अमेरिकेतील नीग्रो समुदाय, तसेच भारतात मुस्लीम व इंग्लडमध्ये रशीयाई व कैरिबियन समुदायात हा भाव दिसून आला. बहुसांस्कृतिक राष्ट्रनिर्माणासाठी हा भाव अडथळा आहे.

बहुसांस्कृतिक समुदायांच्या एकता व विविधतेसंदर्भातिल मागण्यांना अशाप्रकारे एकत्र करायला हवे की ज्याने सांस्कृतिक एकते अभावीसुद्धा राजकीय एकता प्रस्थापित करायला हवी. यामधून नागरिकांमध्ये समाजाप्रती निष्ठा तर असायलाच हवी पण इतर संसकृतीबद्दल आदरही असायला हवा. सर्व अल्पसंख्यांकांना आपले सांस्कृतिक आधिकार मिळायला हवे, असे भिखू पारेख म्हणतात.

(Rethinking On Multiculturalism)

## ४.२.४ बहुसांस्कृतिकवादाची चिकित्सा- ब्रायन बेरी:

ब्रायन बेरीने मांडलेला पहिला मुद्दा म्हणजे बहुसांस्कृतिकतेचा समाजाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे.

आपण एका समाजात राहतो आणि या समाजाची ओळख एक समूह म्हणून आहे, ज्याला आपण राष्ट्र म्हणतो. जेव्हा आपण एक राष्ट्र म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की त्या राष्ट्राच्या सर्व सदस्यांसाठी सर्वकाही समान असले पाहिजे. याला समतावादी धोरण म्हणतात. याचा अर्थ असा की जात, वर्ग, पंथ, रंग आणि लिंग यांच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही, त्यासाठी कोणतेही विशेषाधिकार दिले जाणार नाहीत. समान राष्ट्रातील प्रत्येकाला प्रगतीच्या प्रत्येक बाबतीत समान संधी मिळेल, जे राष्ट्र बनवते. उलट बाजूने याचा अर्थ असाही होतो की पोशाख, शिष्टाचार, रीतिरिवाज, सण, सुट्ट्या आणि जे काही विशिष्ट गटासाठी पारंपारिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित आहे, ते राष्ट्रीय अजेंडाचा भाग होणार नाही. परंपरा, संस्कृती आणि धर्म या खाजगी बाबी आहेत आणि त्या कुटुंबाच्या मर्यादेत काटेकोरपणे ठेवल्या पाहिजेत.

दुसरी न्यायव्यवस्था आहे. संपूर्ण देशात एकसमान नागरी संहिता स्वीकारली जाईल, एकसमान कायदा व्यवस्था सामाजिक शास्त्रांवर आधारित असेल, धार्मिक चालीरीतींवर आधारित नाही. स्थलांतरित लोक तिथली सांस्कृतिक ओळख सोडून राष्ट्रीय अस्मिता स्वीकारण्यास तयार असतील तर ते राष्ट्राचा भाग होऊ शकतात. संस्कृतींमधील संवाद विधायक असला तरी मतभेद कधीही सोडवू शकत नाही. अशी परंपरा असणार आहे, जी दुसऱ्याच्या अगदी विरुद्ध असेल. यावर तोडगा काढण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एकसमान न्यायव्यवस्था असणे आणि संस्कृतीला गौन मानणे आवश्यक आहे. सर्वोत्कृष्ट राज्य ते असेल ज्यामध्ये सर्व नागरिकांना एक राष्ट्रीय ओळख असेल आणि सांस्कृतिक विविधता नसेल.

### टीका:

ब्रायन बेरी याकडे दुर्लक्ष करतात की प्रत्येक व्यक्ती एका विशिष्ट संस्कृतीचे उत्पादन आहे. संस्कृती ही माणसाला ओळख देते. त्याच्या आकलनातून व्यक्तिमत्व आणि चारित्र्य दोन्ही विकसित होतात. जर सांस्कृतिक ओळख नष्ट झाली तर एखादी व्यक्ती चेहरा आणि आवाज नसलेली असेल.

सर्वोच्च राजकीय पदावर विराजमान व्यक्ती राष्ट्रासाठी कायदे बनवते. जे नेहमी त्याच्या स्वतःच्या संस्कृतीचे, त्याच्या संगोपनाचे एक बेशुद्ध उत्पादन असेल. वरचे लोक जसे बदलतील तसे कायदेही बदलतील.

## ४.३ स्थलांतरीत आणि निर्वासितांच्या समस्या: मायकल डम्मेट

निर्वासितांच्या दुर्दशेवर प्रोफेसर डम्मेटच्या तीव्र चिंतनानूसार जगभर विकसित होत असलेल्या स्थलांतरितांच्या विरोधी नीतिमत्तेला आव्हान देण्याची गरज आहे. 'थिंकिंग इन ॲक्शन' या योग्य नावाच्या मालिकेचा एक भाग म्हणून प्रकाशित केलेले, हे पुस्तक राज्याच्या इमिग्रेशनवरील काही धोरणांच्या प्रतिरोधक आधारांची एक वेळोवेळी आठवण करून देणारे आहे. कोणत्याही अनिश्चित अटींमध्ये पुस्तकातील हे छोटे रत्न दाखवते की तत्त्वज्ञानाच्या युक्तिवादाची स्पष्टता गोंधळलेल्या विचारसरणीचे जाळे कसे काढून टाकू शकते, जे सहसा राजकीय आणि सामाजिक समस्यांचे योग्य आकलन करतात. हे आम्हाला माहिती देते, आम्हाला उत्तेजित करते आणि आम्हाला सर्व लोकांमधील सर्वात वाईट वागणूक मिळालेल्या लोकांच्या वतीने कार्य करण्यास प्रेरित करते.

स्थलांतरित आणि निर्वासितांबद्दलच्या दृष्टिकोनावर नियंत्रण ठेवणारी काही तत्त्वे या पुस्तकात आहेत. यामध्ये प्रथम श्रेणीचा नागरिक होण्याचा अधिकार आणि कोणतेही राज्य किंवा वंश, धर्म किंवा भाषा त्याच्या ओळखीसाठी आवश्यक म्हणून न घेणे हे त्याचे पूरक आहे. पहिले तत्व राज्याला सर्व नागरिकांच्या संरक्षणाचे कर्तव्य बजावते आणि कोणत्याही नागरिकाचा छळ, अत्याचार किंवा भेदभाव होणार नाही याची खात्री करण्याची जबाबदारी आहे. प्रत्येकाला हक्क आहे, अशा देशात राहण्याचा, ज्या देशात तो देश ज्याच्या सार्वभौमत्वाखाली येतो त्या राज्याशी तो पूर्णपणे ओळखू शकतो. तो अशा स्थितीत राहतो की नाही हा प्रश्न "शेवटी त्या व्यक्तीला तो स्वतःचा आहे असे वाटते की नाही यावर निर्णय घेतला जातो." हा एक कठोर निकष आहे आणि तो छळ न करण्याच्या आणि भेदभाव न करण्याच्या पुराव्याचे ओझे ज्या राज्यातून व्यक्ती सुरक्षित देशात पळून जाऊ शकते. दुसरे तत्व वंश, धर्म किंवा भाषेच्या राज्याद्वारे त्याच्या नागरिकांच्या ओळखीसाठी आवश्यक म्हणून वापरण्यास प्रतिबंधित करते कारण अन्यथा ते त्याच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्यांपैकी काहींना द्वितीय श्रेणीतील नागरिकांपर्यंत कमी करण्याचा धोका निर्माण करेल. हे सामान्य तत्त्व हे एक उपयुक्त साधन आहे ज्याद्वारे गृहसचिव डेव्हिड ब्लंकेट यांच्या इंग्रजीमध्ये प्राविण्य ही ब्रिटिश नागरिकत्वाची चाचणी घेण्यासाठी सतत दबाव आणण्याच्या सध्याच्या धोरणाला आव्हान देण्यासाठी आहे.

यजमान देशात आधीपासून राहणाऱ्या लोकांच्या हक्कांच्या संदर्भात डम्मेट हे मंजूर करते की 'बुडून न जाण्याचा अधिकार असावा.' हा महत्त्वाचा मुद्दा चुकीचा न समजणे महत्त्वाचे आहे. जगभरातील अनेक उदाहरणे जिथे दडपशाही राजवटींनी विद्यमान लोकसंख्या बुडवण्याचा प्रयत्न केला आणि इतर देशांतील लोकांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून औपनिवेशिक अधिकार्यांनी स्थानिक लोकसंख्येला बुडविण्याचा प्रयत्न कसा केला हे दर्शविते. मलायामध्ये आणि पूर्व तिमोर आणि तिबेटमध्ये फिजी सरकारने पद्धतशीरपणे अल्पसंख्याकांना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. डुबण्याचा असा धोका काही ठिकाणी खरा आणि उपस्थित असू शकतो हे लक्षात घेऊन, स्थलांतराबद्दलच्या तथ्यांच्या प्रकाशात

आपण विशिष्ट यजमान देशामध्ये त्याच्या अस्तित्वाबद्दल विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. ब्रिटनला मात्र असा धोका नाही.

उदयास आलेला आणि विचार करण्यायोग्य असा सर्वसाधारण मुद्दा असा आहे की कोणत्याही देशाला इमिग्रेशन मर्यादित करण्याचा अधिकार असला तरी, स्थानिक लोकसंख्येला झपाट्याने दबून जाण्याचा गंभीर धोका असल्यास, हळूहळू ओघ हा धोका नाही. निर्वासितांच्या गरजांसह यजमान देशाच्या नागरिकांच्या कायदेशीर भीतीचा विचार समतोल करणे ही पुढची पायरी आहे. छळापासून निर्वासित होण्याच्या प्रत्येक माणसाच्या अधिकारावर अधोरेखित करत, जे १९५१ च्या जिनिव्हा कन्व्हेन्शननुसार आश्रयासाठी स्वीकारलेले मैदान आहे, डम्मेट एक ठळक व्याख्या प्रदान करते. तो असा युक्तिवाद करतो की सर्व परिस्थिती ज्या एखाद्या व्यक्तीला कमीत कमी परिस्थितीत जगण्याची क्षमता नाकारतात, सभ्य मानवी जीवनासाठी इतरत्र आश्रय घेण्याचे कारण असले पाहिजे.

त्याचा सशक्त युक्तिवाद या आधारावर आधारित आहे की अन्यायाने ग्रस्त किंवा धोक्यात आलेल्या इतरांना मदत नाकारणे म्हणजे त्या अन्यायाशी सहयोग करणे आणि त्यामुळे त्याच्या जबाबदारीचा चुकीचा भाग आहे. अशा प्रकारे, तो प्रवेशाच्या स्वातंत्र्याच्या बाजूने असलेल्या गृहितकाचे समर्थन करतो की प्रत्येक राज्याने निर्वासितांना प्रवेश दिला पाहिजे जोपर्यंत ते नकाराची वैध कारणे देऊ शकत नाहीत.

नकाराची फार कमी कारणे वैध आहेत. लोकसंख्येच्या विरुद्ध, निर्लज्जपणे वर्णद्वेषी प्रचाराने युक्त, लोकसंख्याशास्त्रीय प्रोफाइल दाखवतात की वृद्ध लोकसंख्येच्या कामाच्या बदलत्या गुणोत्तराची भरपाई करण्यासाठी EU ला बाहेरून कार्यरत वयाच्या ५ ३ लाख लोकांची गरज आहे. ४:१ च्या वृद्ध लोकसंख्येचे काम करण्याचे सध्याचे प्रमाण २०५ 0 पर्यंत २:१ पर्यंत घसरून ५:१ गुणोत्तराच्या गणनेवर आधारित कल्याण प्रणाली धोक्यात येईल. त्यामुळे प्रत्यक्षात काम करणाऱ्या लोकांच्या सेवनाची गरज आहे.

ब्रिटनने अनेक निर्वासितांना घेतलेल्या आणखी एका सामान्य गैरसमजाचा प्रतिकार करताना, डमेट आम्हाला आठवण करून देतात की ज्या देशांनी सर्वाधिक निर्वासित घेतले आहेत ते म्हणजे पाकिस्तान, इथिओपिया आणि सुदान. १९९६ मध्ये यूकेने केलेल्या आश्रय अर्जांबद्दल (%) स्वीकृतीचा भयावह दरही तो हायलाइट करतो.

| | **श्रीलंका** | **झैरे** | **सोमालिया** |
|---|---|---|---|
| यूके | 0.२ | १ | 0.४ |
| कॅनडा | ८२ | ७६ | ८१ |

समान आंतरराष्ट्रीय निकष वापरल्यास, स्पष्टपणे यूके आणि तिथल्या या फरकांमध्ये फरक आहे.

मित्र आणि कुटुंबाच्या वैयक्तिक अनुभवांवर बरेच वाचक सहमत असतील, अगदी थोडक्यात भेटी देखील नाकारल्या जातात. १९९७ मध्ये, ऑस्ट्रेलियातील 0.१८% च्या तुलनेत

घानामधील ३0% पर्यटकांना यूकेमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. तथापि, कॅनडाप्रमाणेच यू टर्न शक्य आहे. ऑस्ट्रेलियाप्रमाणेच, श्वेत ऑस्ट्रेलिया धोरणासह, कॅनडामध्येही १९७0 च्या दशकापूर्वी वर्णद्वेषी इमिग्रेशन धोरणे होती.

ब्रिटन शरणार्थींच्या विरुद्ध पूर्वग्रह भडकावून त्यांना परावृत्त करण्याच्या सर्व उपकरणांपैकी 'सर्वात नैतिकदृष्ट्या कुचकामी' असे डुमेटने यथायोग्य वर्णन केलेले उपकरण वापरण्याचा प्रयत्न केला. ही वृत्ती आश्रय शोधणाऱ्यांना सतत 'बोगस' किंवा केवळ 'आर्थिक स्थलांतरित' असे लेबल लावताना दिसून येते. ब्रिटीश वर्णद्वेषाच्या इतिहासात आजच्या काळातील दोन आश्रय साधकांची वृत्ती किती खोलवर रुजलेली आहे, हे या पुस्तकांतून दिसून येते.

प्रोफेसर डमेटच्या युक्तिवादांमुळे छळापासून पळून जाणाऱ्या लोकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची मागणी करण्याचा मार्ग मोकळा होतो. हे छोटेसे पुस्तक सामान्य लोकांद्वारे तसेच मानवी हक्कांसाठी प्रचारक, विशेषत: निर्वासित आणि आश्रय शोधणाऱ्यांच्या हक्कांचे समर्थक यांच्याद्वारे व्यापक वाचनास पात्र आहे. निर्दोष तार्किक युक्तिवाद आणि प्रशंसनीय राजकीय प्रेरणांच्या गुणवत्तेवर ते उचलण्यास प्रवृत्त नसलेले शैक्षणिक, सार्वजनिक हिताच्या तातडीच्या व्यावहारिक समस्येवर स्पष्टपणे, संक्षिप्तपणे, मन वळवून आणि धैर्याने कसे लिहावे याबद्दल प्रेरणा घेण्याचा विचार करू शकतात.

## ४.४ एडवर्ड सईदचा प्राच्यवाद

### ४.४.१ प्राच्यवाद (Orientalism):

प्राच्यवाद (Oriantlism) हा पश्चिम विचारवंतांचा पूर्वकडील लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन आहे. हा शब्द Orient या लॅटिन शब्दापासून बनला असुन त्याचा अर्थ पूर्वेकडिल राष्ट्रे असा होतो. Orient मध्ये आशिया, उत्तर आफ्रिका, भारत या देशांचा समावेश होतो. या भूभागातिल लोकांची भाषा, इतिहास, साहित्य, विचारधारा, सामाजिक जीवन यांचा अभ्यास करणाऱ्या पाश्चिमात्य विचारवंतांना Orientalist असे. म्हणतात. अशा प्रकारे Orientalism समजून घेत असतांना Orient ,Orientalist आाणि Orientalism या सकल्पणा माहित असणे गरजेचे आहे.

कधी-कधी असा गैरसमज होतो की Orient मध्ये राहणारे ते Orientalist. पण तसे नसून पश्चिमेत वास्तव्य असूनही जे पूर्वेचा अभ्यास करतात अशांना orientalist असे म्हणतात. पाश्चिमेत राहणाऱ्यांना Occident असे म्हणतात. Occident हा Orient च्या विरुद्धअर्थी शब्द आहे.

वसाहतवादाच्या सुरूवातीच्या काळात जेव्हा संयुक्त राज्य अमेरिकेचे (USA) जगात कोठेही राज्य नव्हते. ब्रिटिश आणि फ्रान्सच्या वसाहती त्यावेळेसे आशियामध्ये होत्या. त्यांनी साम्राज्यवादी धोरण अवलंबले होते. फ्रान्सच्या तुलनेत ब्रिटिशांच्या जास्त वसाहती होत्या. असं महटल्या जाते की, हे लोक वसाहतींच्या कुठल्याही ज्ञानाशिवाय तिथे आले होते, परंतु त्यांनी असा विचार केला होता की आम्ही जिथेही जाऊ तिथल्या मुळ भाषेतिल

पुस्तकांचा अभ्यास करुन त्यांचे साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान भाषा आणि विषयांच्या अभ्यास करुन तिथले ज्ञान मिळवू वसाहत-वाद्यांनी पोर्वात्यांचे साहित्य अभ्यासले व ते अभ्यासल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपण यांच्यापेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहोत, आपला इतिहास श्रेष्ठ आहे. या विचारवंतानी म्हणजेच Orientalidt नी मग आपल्या पद्धतीने पोर्वात्यांचे वर्णन केले. यांमध्ये प्रामुख्याने स्वत:च्या इतिहासाला श्रेष्ठ, विकसित, सभ्य असे चितारले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मात्र Orientilism चा अभ्यास युरोपकडून USA कडे आला बऱ्याच समाजशास्त्रांच्या विभागात त्याचे अध्ययन झाले. संयुक्त राज्य अमेरिकेने भाग Orient चे वास्तवदर्शन घडवण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश व फ्रान्सच्या विचारवंतांच्या दृष्टिकोनाची चिकित्सा होऊ लागली.

### ४.४.२ एडवर्ड सईद:

एडवर्ड सईद या **खिश्चन** विद्वानाने Orientalism ची चिकित्सक मांडणी केली. १९३५ मध्ये जन्मलेल्या  सईदचे बालपणीचे शिक्षण इजिप्तमध्ये झाले. पूढे USA मध्येच ते Pectures झाले. नंतर ते कोलंबिया विद्यापीठात प्रोफेसर झाले. त्यांनी पूर्व आणि पश्चिमेच्या साहित्य, संस्कृती व समाजजीवनाचा अभ्यास केला. सईद हे अतिशय अभ्यासू व्यक्तिमत्व होते. १९७८ मध्ये त्यांनी Orientalism ची केलेली त्यांची मांडणी वेगळी होती. तो म्हणतो Orientalism ही पाश्चिमाच विचारवंतांची रचना आहे. म्हणजे पाश्चिमात्य विचारवंतांनी जे Orientalist म्हणवल्या जातात, त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या पद्धतीने पूर्वेचा इतिहास, संस्कृती, साहित्य, लोकजीवन इत्यांदीचे वर्णन केले आहे. त्यात प्रामुख्याने त्यांनी पौर्वात्यांना अशिक्षित, असभ्य, अविकसीत लेखले आहे व त्यांच्या तुलनेत स्वत:स मात्र सुशिक्षित विकसीत व सभ्य असे मानले आहे. स्वत:चे श्रेष्ठत्व सिद्ध करणे व इतरांना तुच्छ लेखणे या त्यांच्या मनोवृत्तीचे दर्शन त्यातून होते. आता अशीही मांडणी होते की जो वाचेल तो विचार तर माडणारच ना ! परंतू सईदच्या मते पाश्चिमात्यांनी पुर्वेचे अध्ययन केले, हे खरे असले तरी त्यांनी पुर्वेबद्दल मांडलेला विचार हे कुठल्या निश्चित सैद्धांतिक आधारावर निर्माण झालेला नाही. हे विचार अन्यायकारक व मनमर्जीनुसार बनवलेले आहेत. पूर्वेकडिल लोक अशिक्षित, असभ्य आहेत, असा पूर्वग्रह ठेवूनच लिखाण झालेले आहे.

सईदच्या मते Orientalist नी १८ व्या शतकामध्ये पूर्वेकडील कलेची नकला करण्यास सुरुतात केली. कविता, चित्र, संगीत, कथा आदिंच्या माध्यमातून त्यांनी लोकांच्या मनात पूर्वेबद्दलचे चित्र उभे केले. त्यांनी जसे वाचले तशी प्रतिमा उभी केली. पण सईदच्या मते वाचनातून पूर्ण सत्य कळत नाही. अर्धवट ज्ञानावर त्यांनी पूर्वेबद्दल प्रतिमा उभी केली की हे लोक असेच असतात. १९ व्या शतकात त्यांनी जी पूस्तके वाचली त्याप्रमाणे त्यांनी त्या पुस्तकांचे जगासाठी इंग्रजीत भाषंतर केले. जसे त्यांना अर्धवट ज्ञान होते तसाच त्यांचा हेतूही शुद्ध नव्हता. पूर्वेकडिल लोकांना कमी दाखवून त्यांनी स्वत: जणु असभ्य, अशिक्षित, अविकसित लोकाना सभ्य, विकसित करायला येथे आलो आहोत, असे दाखवले. त्यापाठीमागे त्यांच्यावर स्वत:कडून होणारे अत्याचार, अन्याय त्यांना झाकायचा होता. त्याचबरोबर त्यांना पूर्वेवर अधिपत्य गाजवायचे होते.

पूर्वेचे या लोकांनी अवास्तव चित्रण करत आसतांना हे लोकं नग्न राहतात, नागाचे, माकडाचे खेळ करतात, येथील स्त्रिया बेली डान्स करतात, मध्य आशियाचे वर्णन करतांना

तेथील मुसलमान हे कसे अतिरेकी आहेत, महिलांवर अत्याचार करणारे आहेत, अनेक महिलांना रखेल म्हणून ठेवणारे आहेत असे वर्णन ते करतात.

सईद मात्र यास आव्हान देतात व म्हणतात हे Orientalist चे षडयंत्र आहे. ते स्वता:स श्रेष्ठ सिद्ध करुन स्वत:च्या वसाहतवादी धोरणाचे समर्थन करु इच्छितात. एकदा हे सिद्ध झाले की हे पाश्चिमान्य श्रेष्ठ आहेत, मग ते अधिपत्य गाजवण्यास योग्य आहेत हे आपसूकच सिद्ध होते. १९ व्या शतकापासून फ्रान्स व ब्रिटनच्या वसाहतवाद्यांनी पूर्वेवर आपले वर्चस्व गाजवले. २ या महायुद्धानंतर मात्र अमेरिकेने त्यांची जागा घेतली.

१९७८ मध्ये एडवर्ड सईद यांचे Orientalism हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकामध्येच एडवर्ड सईदने Orientalism वर आपली वरिल मते मांडली आहेत. यामध्ये ते असे म्हणतात की वसाहतवाद ही फक्त राज्य करणे नव्हते. तर यामध्ये पश्चिमी राष्ट्रे ही कशी पूर्वेपेक्षा श्रेष्ठ आहेत हे ठसवण्याचा प्रयत्न होता.

हे पुस्तक तिन भागात विभागलेले आहे:

१. Scope of Orientalism

२. Orientalistic Structure and restructure

३. Orientalism now

सईदच्या मते हे पुस्तक वास्तवदर्शक राजकीय दृष्टिकोन आहे. पहिल्या भागात पाश्चिमात्यांनी पूर्वेकडिल राष्ट्रांवर कशा पद्ध्तीने राज्य केले व त्यावेळेस पूर्वेची स्थिती कशी होती याचे वर्णन आहे.

दुसऱ्या भागात पाश्चिमात्यांनी कशापद्धतीने आपले विचार पुर्वेकडिल लोकांवर थोपवले. सुधारणेच्या नावाखाली, व्यापाराचे कारण दाखवून कशा वसाहती केल्या, Orientalist चे पूर्वेबद्दलेचे लिखाण या गोष्टीचा समावेश आहे.

तिसऱ्या भागात आधुनिक Orientallism चे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर ब्रिटिश आणि फ्रेंच Orientalism ची चर्चा केली आहे.

या पुस्तकात सईद Orientalism बरोबरच वंशवादासंदर्भात चर्चा करतात. पाश्चिमात्य लोक हे पौर्वात्यांबरोबर वर्णभेद (काळा-गोरा) करत असत. स्वत:ला नेहमी उदारवादी दाखवत व याचा आसरा घेऊन हिंसेचे समर्थन करत. सईद म्हणतात वसाहतींचा अंत झाला. मात्र वसाहतवादी विचार मागे तसेच राहिले. जेव्हा संयूक्त राष्ट्रे वैश्विक सत्तेत मिळाली, तेव्हाही हे संपले नाही. वसाहतवादी गेले मात्र लोकांच्या डोक्यात आपला विचार सोडून गेले. Orientalist लेखंकांनी पूर्वेचे वास्तव दर्शन घडवले नाही. ज्या राष्ट्रावर पश्चिमेचे राज्य होते, त्या राष्ट्राच्या चांगल्या गोष्टी जाणीवपूर्वक दर्शवल्या नाहीत. फक्त आम्ही राज्य केले व या लोकांना उन्नत करण्याचा प्रयत्न केला, हेच दाखविले. या पुस्तकात सईदने त्यांना उघडे पाडले आहे. शेवटी सईद म्हणतो, आपल्या इतिहासाची, संस्कृतीची मांडणी आपणच चांगल्या प्रकारे करु शकतो. आपल्यापेक्षा दुसरे कोणीही आपणास चांगल्याप्रकारे जाणू

शकत नाही. म्हणून पूर्वेकडील लोकांनी स्वत:च स्वत:वर लिखाण करायला हवे. सईदच्या मते पूर्वेकडे स्वत:चे असे सौंदर्य आहे.

## ४.५ सारांश

बहुसांस्कृतिकितेचा सिद्धांत कोणत्याही समुदायात बहुसांस्कृतिकतेला प्रेरणा देतो आणि परस्पर आदराची भावना विकसित करतो. बहुसांस्कृतिकितेमध्ये सहिष्णूता आणि समान नागरी मान्यता आवश्यक आहे. जर एखाद्या देशात बहुसांस्कृतिक समुदाय एकत्र राहत असतील, परंतु बहुसांस्कृतिकतेची भावना विकसित होत नसेल, तर तो देश विस्कळीत होईल. भिकू पारीख यांच्या मते, कोणतीही सांस्कृती टिकून राहण्यासाठी ती सर्वसमावेशक, लोकशाही आणि सुधारणावादी असणे आवश्यक आहे. शभकू पारीख याच्या मते, बहुसांस्कृतिकतेसाठी समाजाने प्रत्येक सांस्कृतीचा स्विकार करणे, प्रत्येक सांस्कृतीचा आदर आणि सन्मान करणे आवश्यक आहे. कोणतीही सांस्कृती परिपूर्ण नसते हे मान्य केले पाहिजे. इतरांच्या सांस्कृतीतून आपण काही शिकू शकतो. सांस्कृती हेही शिकण्याचे माध्यम आहे. बहुसांस्कृतिकवर टीका करताना, ब्रायन बॅरी म्हणतात, सांस्कृतींमधील संवाद जरी विधायक असला तरी कधीही मतभेद सोडवू शकत नाही. अशी परांपरा असणार आहे जी दुसऱ्याच्या अगदी विरुद्ध असेल. एकसमान न्यायव्यवस्था असणे आणि सांस्कृती गौण बनवने, हा उपाय आहे. राज्यातील सर्व नागरिकांची एकच राष्ट्रीय ओळख असायला हवी आणि सांस्कृतिक विविधिता नसायला पाहिजे. प्रो. एम. डम्मेट प्रवेशाच्या स्वातंत्र्याच्या बाजूने असलेल्या गृहितकाचे समर्थन करतात की प्रत्येक राज्याने निर्वासितांना प्रवेश दिला पाहिजे जोपर्यंत ते नकाराची वैध कारणे देऊ शकत नाहीत. नकाराची फार कमी कारणे वैध आहेत. प्रोफेसर डमेटच्या युक्तिवादांमुळे छळापासून पळून जाणाऱ्या लोकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची मागणी  करण्याचा मार्ग मोकळा होतो. प्राच्यविद्या हा पाश्चात्य विचारवंतांचा पूर्वेकडील लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. पश्चिमेत राहूनही पूर्वेचा अभ्यास करणा-यांना प्राच्यविद्यावादी म्हणतात. प्राच्यविद्यावाद्यांनी नंतर त्यांचे त्यांच्या पद्धतीने वर्णन केले. यामध्ये त्यांनी प्रामुख्याने स्वत:चा इतिहास श्रेष्ठ आणि पूर्वेकडील लोकांना कनिष्ठ मानले. एडवर्ड सैदच्या मते, पाश्चात्य लोकांनी पूर्वेचा अभ्यास केला हे खरे आहे, परंतु पूर्वेबद्दलचे त्यांचे विचार कोणत्याही निश्चित सैद्धांतिक आधारावर आधारित नव्हते. हे विचार अन्यायकारक आणि मनमानी आहेत. पूर्वेकडील लोक अशिक्षित आणि उद्धट आहेत असे पूर्वग्रह ठेवून लिहिले आहे. हे पाश्चिमात्य लोक श्रेष्ठ आहेत हे एकदा सिद्ध झाले की ते वर्चस्वाला पात्र आहेत हे स्वयंस्पष्ट होते. प्राच्यविद्यावादी लेखकांनी पूर्वेचे प्रत्यक्ष दर्शन घडवले नाही. ज्या राष्टांवर पाश्चिमात्य राज्य होते त्यांच्या चांगल्या गोष्टी जाणीवपूर्वक दाखवल्या जात नाहीत. आपण राज्य केले आणि या लोकांचे उत्थान करण्याचा प्रयत्न केला हेच दाखवून दिले. तर सैद सुचवतो, पूर्वेकडील लोकांनी स्वत:हून आपल्याबद्दल लिहावे.

## ४.६ विद्यापीठीय प्रश्न

१. बहुसांस्कृतिकतेबद्दल भिक्खू पारेख यांचे मत स्पष्ट करा.

२. ब्रायन बॅरी बहुसांस्कृतिकतेवर टीका कशी करतात?

३. प्राच्यविद्याविषयी एडवर्ड सैडचे विचार थोडक्यात स्पष्ट करा.

४. निर्वासितांचे हक्क आणि स्थलांतरितांचे हक्क याबद्दल मायकेल डमेटचे विचार थोडक्यात स्पष्ट करा.

५. टीपा लिहा.

- बहुसांस्कृतिकता
- प्राच्यविद्या
- स्थलांतरितांचे हक्क

## ४.७ संदर्भ


1. Charles Taylor “The Politics of Recognition” in Colin Farrelly (ed) Contemporary Political Theory: A Reader (Sage Publishers, 2004)
2. Bhiku Parekh. “Equality of Difference” in Colin Farrelly (ed) Contemporary Political Theory: A Reader (Sage Publishers, 2004)
3. Brian Barry, “Liberalism and Multiculturalism” in Ethics
4. George Crowder, Theories of Multiculturalism: An Introduction, chapter3
5. Bill Ashcroft and Pal Ahluwalia, Edward said (Routledge Critical Thinkers Series) chapter 3.
6. Moustafa Bayoumi and Andrew Rubin (ed.) The Edward Said Reader chapter 4.
7. Michael Dummett Immigration and Refugees Routledge London and New York, 2001 (chapters 1-5)


*****